बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव ने संचलित

# मारूतरावजी घुले पाटील महाविद्यालय

## अहमदनगर

# क्षितिज

२०१७-२०१८



जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. आमदार डॉ. नरेंद्रजी घुले पाटील साहेब यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएच.डी. पदवी मिळाल्याबद्दल सत्कार करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी. एम.वराट समवेत ज्ञानेश्वर सह. साखर कारखान्याचे जनरल मॅनेजर श्री. काकासाहेब शिंदे, प्रा. डॉ. आर. आर. सासवडे, इंजिनियर श्री. आर. एन. मोटे व मान्यवर



रसायनशास्त्र विषयाच्या दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे उद्घाटन करताना शेवगांव पंचायत समिती सभापती डॉ. क्षितिज घुले पाटील समवेत प्राचार्य डॉ.बी.एच.झावरे, प्रशासकीय अधिकारी श्री. के.के. पवार, डॉ. आर.आर. सासवडे व प्राचार्य डॉ.टी.एम.वराट

# पुणे विद्यापीठ गीत

ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान

पुण्यमयी दे आम्हा अक्षर वरदान
ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान

जातिभेद, धर्मभेद, वंशभेद दूर
लाख लाख कंठांतुनि हाच एक सूर
करुणेच्या चरणांशी नत हो विज्ञान

माणुसकी धर्माचा अर्थ जाणतो
श्रमनिष्ठा हे पवित्र तीर्थ मानतो
हृदयांतुनि समतेचा निर्भय अभिमान

सेवेतच मुक्ती ही मंगल दीक्षा
न्यायास्तव जागृति ही सत्त्वपरीक्षा
हे विश्वचि घर अमुचे मंत्र हा महान

मंगेश पाडगांवकर




## वार्षिक नियतकालिक २०१७-१८

Online College Code No - C02430
ID No. PU/AN/ACS/111/2009
College Code No. 893
Pun. Code-CAAA017120

## दि प्रेस रजिस्ट्रेशन ॲक्ट नियम ८ फॉर्म नं.४ प्रमाणे आवश्यक माहिती

**प्रकाशन स्थळ :**
मारूतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, नागापूर, अहमदनगर
फोन : ०२४१-२७७९४९७
Email : mgpcollege@gmail.com
website : www.mgpcollege.com

**प्रकाशन काल :** वार्षिक

**राष्ट्रीयत्त्व :** भारतीय

**प्रकाशक व संपादक :**
प्राचार्य डॉ. टी. एम. वराट

**राष्ट्रीयत्त्व :** भारतीय

**पत्ता :** मारूतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, नागापूर, अहमदनगर

**कार्यकारी संपादक :**
प्रा. डॉ. किसन रंगनाथ पिसाळ

**राष्ट्रीयत्त्व :** भारतीय

**पत्ता :** मारूतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, नागापूर, अहमदनगर

**मालकी :** मारूतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, नागापूर, अहमदनगर

**मुद्रक :** निट प्रिंटस्, एम.आय.डी.सी. अहमदनगर

मी, प्राचार्य डॉ. टी. एम. वराट जाहिर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या समजूतीप्रमाणे बरोबर आहे.

प्राचार्य डॉ. टी. एम. वराट


हा अंक खाजगी वितरणासाठी आहे. त्यातील मते व्यक्तिगत आहेत व ललित लेखन स्वतंत्र आहे.

# श्रद्धेय




## लोकनेते स्वर्गीय मारूतरावजी घुले पाटील साहेब

(१९३०-२००२)

संस्थापक, अध्यक्ष : जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगांव-ने
संस्थापक, चेअरमन : श्री. ज्ञानेश्वर सह.सा.का.लि. ज्ञानेश्वर नगर
संस्थापक, अध्यक्ष : श्री. मारूतराव घुले पाटील शिक्षण संस्था, ज्ञानेश्वरनगर

# आधारस्तंभ व प्रेरणास्थान



## मा. आमदार डॉ. नरेंद्रजी घुले पाटील

अध्यक्ष : जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगांव-ने
ता. शेवगांव, जि. अहमदनगर

# कृतिशील नेतृत्त्व



## मा.आमदार श्री. चंद्रशेखरजी घुले पाटील

सचिव : जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगांव-ने
ता. शेवगांव, जि. अहमदनगर

# मार्गदर्शक



## मा.सौ. राजश्रीताई चंद्रशेखर घुले पाटील

उपाध्यक्ष - जिल्हा परिषद अहमदनगर

# आशास्थान



## मा.श्री. डॉ. क्षितिजभैय्या नरेंद्रजी घुले पाटील

तज्ज्ञ संचालक – श्री. ज्ञानेश्वर सह. सा. का. लि. भेंडा
सभापती – पंचायत समिती शेवगाव, जि. अ.नगर



## मा. श्री. के. के. पवार

प्रशासकीय अधिकारी
जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगांव-ने




## डॉ. टी.एम. वराट

प्राचार्य
मारुतरावजी घुले पाटील महाविद्यालय, अ.नगर

जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव ने संचलित

# मारूतरावजी घुले पाटील महाविद्यालय, नागापूर, अहमदनगर

## विश्वस्त मंडळ

| अ.क्र. | नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १. | मा.आ. डॉ.नरेंद्र मारूतराव घुले पाटील | अध्यक्ष |
| २. | मा. ॲड. सतिष किसनराव पाटील | उपाध्यक्ष |
| ३. | मा. आ. चंद्रशेखर मारुतराव घुले पाटील | सचिव |
| ४. | मा.श्री. रामनाथ जगन्नाथ राठी | खजिनदार |
| ५. | मा.श्री. गुलाबराव तात्यासाहेब घुले | विश्वस्त |
| ६. | मा.श्री. सुभेदार बाबुराव शेख | विश्वस्त |
| ७. | मा.श्री. शब्बीर छन्नुभाई शेख | विश्वस्त |
| ८. | मा.श्री. मच्छिंद्र बारकू काळे | विश्वस्त |
| ९. | मा.श्री. सुधाकर गबाजी कांबळे | विश्वस्त |

जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव ने संचलित

# मारूतरावजी घुले पाटील महाविद्यालय, नागापूर, अहमदनगर

## महाविद्यालय विकास समिती

| अ.क्र. | नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १. | मा.आ. डॉ.नरेंद्र मारूतराव घुले पाटील | अध्यक्ष |
| २. | मा.आ. चंद्रशेखर मारुतराव घुले पाटील | सदस्य |
| ३. | मा. ॲड. सतिष किसनराव पाटील | सदस्य |
| ४. | मा.श्री. गुलाबराव तात्यासाहेब घुले | सदस्य |
| ५. | मा.श्री. कुंडलिक कडू पवार | सदस्य |
| ६. | मा.श्री. रामनाथ जगन्नाथ राठी | सदस्य |
| ७. | मा.डॉ. तुकाराम माणिकराव वराट | सदस्य सचिव |
| ८. | प्रा. अविनाश कारभारी आहेर | शिक्षक प्रतिनिधी |
| ९. | प्रा. पुरुषोत्तम आप्पासाहेब फटांगरे | शिक्षक प्रतिनिधी |
| १०. | श्री. प्रविण विष्णु दळवी | शिक्षकेतर सेवक प्रतिनिधी |

# प्राचार्यांचे मनोगत...

प्रिय विद्यार्थी मित्रहो,

आपल्या महाविद्यालयाचा 'क्षितिज' हा दुसरा वार्षिक अंक आपल्या हाती देताना मनस्वी आनंद होत आहे. सहकारमहर्षि लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांनी समाजातील विविध घटकातील मुलामुलींना शिक्षणाची सुविधा प्राप्त व्हावी, त्यांचा बौद्धिक व आर्थिक विकास व्हावा, त्यांच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन व सामाजिक बांधिलकी निर्माण व्हावी तसेच शिक्षण हे समाज परिवर्तनाचे अत्यंत प्रभावी साधन आहे, शिक्षणामुळे व्यक्ती, कुटुंब व समाज यांचा सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक विकास होतो, या विचाराने प्रेरित होऊन ६ जून १९५९ साली जनता शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेची स्थापना दहिगांव ने ता. शेवगांव जि. अ.नगर या ठिकाणी केली. याच भूमिकेतून आणि पारंपारिक शिक्षणाचा वसा कायम ठेवून संस्थेने अहमदनगर या ऐतिहासिक शहरात मारूतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व विज्ञान या महाविद्यालयाची स्थापना जून २००९ साली केली.

समाजातील दुर्बल, वंचित, गोरगरीब, कष्टकरी आणि आर्थिकदृष्ट्या मागास कुटुंबातील मुलामुलींना उच्च शिक्षणाची सोय करून त्यांना स्वावलंबी, सक्षम, सबल करणे हे या महाविद्यालयाचे उद्दिष्ट्य आणि ध्येय आहे. या उद्दिष्टांना व विचाराला अनुसरुन संस्थेचे अध्यक्ष मा.आ.डॉ. नरेंद्र घुले पाटील व संस्थेचे सचिव मा.आ. चंद्रशेखर घुले पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार महाविद्यालय यशस्वीपणे वाटचाल करीत आहे.

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये महाविद्यालयाचे नवीन इमारतीत स्थलांतर झाले असून अध्ययन-अध्यापन ही प्रक्रिया अधिक दर्जेदार व प्रभावीपणे होण्यासाठी अद्ययावत प्रयोगशाळा, सुसज्ज वर्ग खोल्या, समृद्ध ग्रंथालय, प्रशस्त क्रीडांगण आणि उच्च शिक्षित व अनुभवी प्राध्यापक वर्ग यामुळे शैक्षणिक दर्जा उंचावून विद्यार्थ्यांची जडणघडण होण्यास मदत होत आहे. याबरोबरच शिक्षणपूरक अनेक उपक्रमांचे महाविद्यालयात आयोजन केले जाते. विविध क्षेत्रातील रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा द्याव्या लागतात. ही गरज लक्षात घेऊन महाविद्यालयाने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु केलेले आहे.

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सहकार्यातून 'रसायनशास्त्र' विषयाचे राज्यस्तरीय दोन दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या चर्चासत्राचे उद्घाटन मा. डॉ. क्षितीज घुले पाटील यांचे शुभहस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणुन न्यू आर्टस् कॉलेज अ.नगरचे मा. प्राचार्य डॉ. बी. एच. झावरे उपस्थित होते. तसेच निर्भय कन्या अभियान कार्यशाळेच्या उद्घाटनासाठी सौ. राजश्रीताई चंद्रशेखर घुले पाटील (उपाध्यक्ष जिल्हा परिषद, अहमदनगर) व प्रमुख पाहुण्या म्हणुन श्रीमती स्मिता पानसरे उपस्थित होत्या. याबरोबरच या वर्षात व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा, डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला, वाङ्‌मय मंडळ उद्घाटन असे विविध उपक्रम घेण्यात आले. यावर्षी विशेष आनंदाची बाब म्हणजे महाविद्यालयाचा एफ.वाय.बीएस्सी वर्गातील स्मितेश गाडगे हा विद्यार्थी किशोर वैज्ञानिक प्रोत्साहन योजना परीक्षेत (K.U.P.Y) महाराष्ट्र राज्यात पहिला व देशात १४७ वा आला. त्याचा महाविद्यालयास सार्थ अभिमान वाटतो. या शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयास लेखी व प्रात्यक्षिक परीक्षेचे केंद्र म्हणुन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची परवानगी मिळाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्राची उत्तम अशी सुविधा प्राप्त झाली आहे.

शैक्षणिक वर्षामध्ये झालेल्या महाविद्यालयातील अध्ययन, अध्यापन, संशोधन, विस्तारकार्य, अभ्यासक्रम व अभ्यासक्रमपूरक, सांस्कृतिक, साहित्य, कला व क्रीडा या बाबतच्या उपक्रमांचे प्रतिबिंब महाविद्यालयाच्या वार्षिक अंकात दिसून येत असते. महाविद्यालयातील विविध विभाग, समित्या, मंडळे यांच्या विविध उपक्रमातून महाविद्यालयास गुणवत्ता प्राप्त होते. त्या सर्वांची नोंद वार्षिक अंकात घेतली जाते. महाविद्यालयातील गुणवंत, यशवंत विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात मिळविलेले यश, प्राध्यापकांनी वाढविलेली गुणवत्ता, त्यांचे संशोधन, लेखन यांचीही नोंद विभाग अहवालाच्या माध्यमातून वार्षिक अंकात ठेवली आहे. विद्यार्थ्यांच्या साहित्यिकदृष्ट्या सुप्त गुणांना, विचारांना, भावनांना व्यक्त करण्यासाठी त्यांचे लेख, कविता, कथा व इतर साहित्य या वार्षिक अंकात प्रकाशित केले आहे. त्याचा आपण उदार अंतःकरणाने रसास्वाद घेऊन कौतुक कराल असे वाटते. विद्यार्थ्यांचा गुणात्मक विकास व त्यांच्या ज्ञानाची क्षितिजे अधिक समृद्ध, संपन्न व व्यापक करण्यासाठी महाविद्यालय वचनबद्ध आहे.

**डॉ. टी. एम. वराट**
प्राचार्य व संपादक

# संपादकीय...

महाविद्यालयातील युवा शक्तीच्या विचार मंथनातून साकारलेला 'क्षितिज' नियतकालिकाचा हा दुसरा अंक आपल्या हाती सुपूर्त करताना मला खूप आनंद होत आहे. जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे सन्माननीय अध्यक्ष मा.आ. डॉ. नरेंद्र घुले पाटील व संस्थेचे सन्माननीय सचिव मा.आ. चंद्रशेखर घुले पाटील तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी. एम. वराट यांच्या मौलिक मार्गदर्शनातून हा अंक साकार झाला आहे. आपण 'क्षितिज' या पहिल्या अंकाचे जसे मनापासून स्वागत केले तसेच या दुसऱ्या अंकाचेही स्वागत कराल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

मानवी जीवनामध्ये साहित्याचे महत्त्व अनमोल आहे. मानवी जीवन, समाज व साहित्य यांचे अतूट असे नाते आहे. साहित्य निर्मितीसाठी शब्द व त्यातून व्यक्त होणारा अर्थ महत्त्वाचा आहे. म्हणूनच शब्दांचे श्रेष्ठत्त्व प्रतिपादन करताना संत तुकाराम महाराज आपल्या अभंगात लिहितात,

''आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने।

शब्दांचीच वस्त्रे यत्ने करू ॥

शब्दचि आमुच्या जीवीचे जीवन।

शब्द वाटे धन जनलोका ॥

विद्यार्थ्यांच्या ठायी असणारे हे शब्दरूपी धन आपणांस सुपूर्त करीत आहोत. त्यातील मौल्यवान विचार, भावना आत्मसात करून त्या शब्दातून काहीअंशी समाज परिवर्तन घडेल अशी अपेक्षा करतो.

साहित्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार व्हावेत. त्यांची सामाजिक जाणीव जागृत होऊन विचार मंथन व्हावे. यासाठी विद्यार्थ्यांकडून त्यांचे स्वतःचे साहित्य लेखन मागविण्यात आले. त्यास विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. या अंकात त्यातील निवडक लेखांनाच स्थान देण्यात आले. या शिवाय महाविद्यालयातील काही प्राध्यापकांनीही या अंकासाठी लेख देऊन विचार व्यक्त केले आहेत. त्यामुळे या अंकाची मौलिकता अधिक वाढलेली दिसून येते.

या अंकामध्ये साहित्य विश्वाबरोबरच महाविद्यालयात राबविल्या जात असलेल्या शिक्षणपूरक उपक्रमांचा परिचय करून दिला आहे. त्यामुळे महाविद्यालयातील प्रत्येक घटकाशी आपली जवळीक निर्माण होऊन ऋणानुबंध अधिक दृढ होतील असे वाटते.

'क्षितिज' या दुसऱ्या वार्षिक अंकाच्या निर्मितीसाठी जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे सन्माननीय अध्यक्ष मा.आ.डॉ. नरेंद्र घुले पाटील व संस्थेचे सन्माननीय सचिव मा.आ. चंद्रशेखर घुले पाटील यांनी प्रेरणा व प्रोत्साहन दिले. तसचे नेहमी आम्हांला मार्गदर्शन करणाऱ्या अहमदनगर जिल्हा परिषद उपाध्याक्षा सौ. राजश्रीताई चंद्रशेखर घुले पाटील व शेवगाव पं.स. सभापती युवा नेते डॉ. क्षितिज घुले पाटील यांचे मार्गदर्शन उपयुक्त ठरले. जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे विश्वस्त मंडळ, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी मा.श्री. के.के. पवार, मारूतरावजी घुले पाटील शिक्षण संस्था, भेंडे, ज्ञानेश्वर सह. साखर कारखाना जनरल मॅनेजर श्री. काकासाहेब शिंदे, मॅनेजर श्री. अनिल शेवाळे, जनसंपर्क अधिकारी श्री. कल्याणराव म्हस्के, संस्थेचे समन्वयक प्रा.डॉ. आर.आर. सासवडे, इंजिनियर श्री. आर.एन. मोटे, महाविद्यालय विकास समिती या सर्वांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाले. त्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने मी सर्वांचे आभार मानतो.

संपादक मंडळाचे अध्यक्ष माननीय प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांनी अंकाच्या सुरुवातीपासूनच योग्य मार्गदर्शन केले. त्यामुळे अंकाच्या कामात नीटनेटकेपणा आला. तसेच संपादक मंडळातील सदस्य प्रा.एस.व्ही. मरकड, प्रा.पी.ए. फटांगरे, प्रा.एस.बी. दहातोंडे, प्रा.एन.एन.झिंज, प्रा.के.बी. ताके, प्रा.बी.बी. माताडे, प्रा. ए.के. आहेर, प्रा. श्रीमती एम.एस.गवारे व श्री. पी.व्ही. दळवी यांनी अंक निर्मितीसाठी विशेष सहकार्य केले. याशिवाय महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्रशासकीय सेवकवृंद या सर्वांचे अनमोल सहकार्य लाभल्यामुळे हा अंक वेळेत पूर्ण होऊ शकला. तसेच अंकासाठी साहित्य देणारे विद्यार्थी, प्राध्यापक या सर्वांसह ज्ञात अज्ञात अशा ज्यांचे ज्यांचे सहकार्य लाभले, त्या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो. त्याचप्रमाणे या अंकाची सजावट व मुद्रण करणारे निट प्रिंटस् व त्यांचे सर्व सहकारी, कर्मचारी वृंद यांच्या ऋणात राहणेच मला अधिक आवडेल.

**प्रा. डॉ. के. आर. पिसाळ**
कार्यकारी संपादक, क्षितिज

जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव ने संचलित

## मारूतरावजी घुले पाटील महाविद्यालय, नागापूर, अहमदनगर

प्राचार्य, प्राध्यापक आणि प्रशासकीय सेवकवृंद

प्राचार्य डॉ. टी. एम. वराट

## कला शाखा

- मराठी विभाग

१. प्रा. डॉ. के. आर. पिसाळ
२. प्रा. आर. ए. नेटके

- हिंदी विभाग

१. प्रा. एस. बी. दहातोंडे
२. प्रा. एस. ए. काळे

- इंग्रजी विभाग

१. प्रा. पी. ए. फटांगरे

- इतिहास विभाग

१. प्रा. एस. व्ही. मरकड
२. प्रा. श्रीमती जी. एस. सोनवणे

- अर्थशास्त्र विभाग

१. प्रा. श्रीमती ए.आर. पाऊलबुद्धे
२. प्रा. एन.एन. झिंज

- भूगोल विभाग

१. प्रा. श्रीमती व्ही.डी. मोरे

- राज्यशास्त्र विभाग

१. प्रा. श्रीमती व्ही. डी. मेघडंबर

## वाणिज्य शाखा

वाणिज्य विभाग

१. प्रा. के. बी. ताके
२. प्रा. श्रीमती के. आर. ढोबे
३. प्रा. श्रीमती पी. एस. साबळे
४. प्रा. एम.बी. चोपडे

# विज्ञान शाखा

- **रसायनशास्त्र विभाग**
  १. प्रा. अे.यू. डोंगरे
  २. प्रा. श्रीमती ए.एन. सांगळे
  ३. प्रा. श्रीमती बी.एस.पवळे
  ४. प्रा. श्रीमती पी.ए. सैंदणशिव

- **भौतिकशास्त्र विभाग**
  १. प्रा. एस. बी. डोईफोडे
  २. प्रा. श्रीमती डी.आर.गायकवाड

- **वनस्पतीशास्त्र विभाग**
  १. प्रा. बी. बी. माताडे

- **प्राणीशास्त्र विभाग**
  १. प्रा. के. डी. जगताप

- **गणित विभाग**
  १) प्रा. एफ. बी. खान  २) प्रा. श्रीमती एन.एफ. खान

- **संगणकशास्त्र विभाग**
  १) प्रा. श्रीमती एम.एस.गवारे  २) प्रा. श्रीमती आर.बी. तांबे  ३) प्रा. एच.एस. सय्यद

- **क्रीडा विभाग**
  १) प्रा. ए.के. आहेर

- **ग्रंथालय विभाग**
  १) प्रा. श्रीमती के.व्ही. येवले

## प्रशासकीय सेवकवृंद

| | |
|---|---|
| १. श्री. पी. व्ही. दळवी | मुख्य लिपिक |
| २. श्री. एस. ए. भोर | लिपिक |
| ३. श्री.झाडे ए.जी. | लिपिक |
| ४. श्री. एन. बी. शिरसाट | शिपाई |
| ५. श्रीमती एस. आर. वाळके | शिपाई |
| ६. श्रीमती व्ही. एन. उंडे | शिपाई |

# मारूतरावजी घुले पाटील महाविद्यालय, नागापूर, अहमदनगर
## शैक्षणिक वर्ष - २०१७-२०१८

# विद्यार्थी परिषद

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | वर्ग | पदाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | सनी लहानु सप्रे | तृतीय वर्ष विज्ञान | महाविद्यालय-विद्यापीठ प्रतिनिधी |
| २ | अक्षय गिताराम सोनवणे | प्रथम वर्ष कला | प्रतिनिधी |
| ३ | पूजा विजय भोर | प्रथम वर्ष वाणिज्य | प्रतिनिधी |
| ४ | ऋषिकेश सुनिल फटांगडे | प्रथम वर्ष विज्ञान | प्रतिनिधी |
| ५ | शबनम इब्राहिम शेख | प्रथम वर्ष संगणक शास्त्र | प्रतिनिधी |
| ६ | आरती बाबासाहेब ताडे | द्वितीय वर्ष कला | प्रतिनिधी |
| ७ | शितल बाबासाहेब वाबळे | द्वितीय वर्ष कला | प्रतिनिधी |
| ८ | श्रध्दा बबन लबडे | द्वितीय वर्ष विज्ञान | प्रतिनिधी |
| ९ | शुभम सुरेश वाघ | द्वितीय वर्ष संगणक शास्त्र | प्रतिनिधी |
| १० | पूजा उमेशसिंग रजपूत | तृतीय वर्ष कला | प्रतिनिधी |
| ११ | स्वाती दत्तात्रय केंगार | तृतीय वर्ष वाणिज्य | प्रतिनिधी |
| १२ | वैशाली संजय वाघचौरे | तृतीय वर्ष विज्ञान | प्रतिनिधी |
| १३ | निळकंठ सुखदेव शिंदे | तृतीय वर्ष संगणक शास्त्र | प्रतिनिधी |
| १४ | भाऊसाहेब सुभाष म्हस्के | तृतीय वर्ष कला | सांस्कृतिक प्रतिनिधी |
| १५ | अक्षदा विलास थोरात | द्वितीय वर्ष विज्ञान | प्राचार्य नियुक्त प्रतिनिधी अनुसूचित |
| १६ | पूनम दत्तात्रय सोनटक्के | द्वितीय वर्ष कला | प्राचार्य नियुक्त प्रतिनिधी अनुसूचित |
| १७ | नवनाथ बापुराव नवघरे | प्रथम वर्ष वाणिज्य | रा.से.यो. प्रतिनिधी |

**महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६ नुसार स्थापन**

# भावपूर्ण श्रध्दांजली

या शैक्षणिक वर्षात स्वातंत्र्य सेनानी, थोर नेते, संशोधक, शास्त्रज्ञ, डॉक्टर, साहित्यिक, कलावंत, शिक्षणतज्ज्ञ व सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, सहकार, शैक्षणिक क्षेत्रातील व्यक्ती तसेच आपल्या संस्थेचे हितचिंतक दिवंगत झाले, त्यांना नम्रतापूर्वक अभिवादन करून भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहोत.



# गुणवंत-यशवंत




**प्रा. पुरुषोत्तम फटांगरे**
सेट परीक्षा उत्तीर्ण



**प्रा. महेश चोपडे**
सेट परीक्षा उत्तीर्ण



**प्रा.अनुराधा पाऊलबुध्दे**
पेट परीक्षा उत्तीर्ण



**सनी सप्रे**
विद्यापीठ प्रतिनिधी



**स्मितेश गाडगे**
के.व्ही.पी. वाय. परीक्षा
महाराष्ट्र राज्य प्रथम



**ओमकार खुंटाळे**
वादविवाद व उत्कृष्ट सूत्रसंचालन



**सीताराम वैराळ**
रा.से.यो.विद्यापीठ कॅम्प व
वादविवाद स्पर्धा सहभाग



**नवनाथ नवघरे**
रा.से.यो. विद्यापीठ कॅम्प सहभाग



**आशुतोष लोंढे**
बॉक्सिंग स्पर्धेत विभागीय निवड



**प्रफुल्ल मतकर**
रा.से.यो.उत्कृष्ट स्वयंसेवक




**प्राजक्ता खेडकर**
रा.से.यो. उत्कृष्ट स्वयंसेवक



**भाऊसाहेब म्हस्के**
रा.से.यो. उत्कृष्ट स्वयंसेवक

# गुणवंत-यशवंत



**प्रा. पुरुषोत्तम फटांगरे**
सेट परीक्षा उत्तीर्ण



**प्रा. महेश चोपडे**
सेट परीक्षा उत्तीर्ण



**प्रा.अनुराधा पाऊलबुध्दे**
पेट परीक्षा उत्तीर्ण



**सनी सप्रे**
विद्यापीठ प्रतिनिधी



**स्मितेश गाडगे**
के.व्ही.पी. वाय. परीक्षा
महाराष्ट्र राज्य प्रथम



**ओमकार खुंटाळे**
वादविवाद व उत्कृष्ट सूत्रसंचालन



**सीताराम वैराळ**
रा.से.यो.विद्यापीठ कॅम्प व
वादविवाद स्पर्धा सहभाग



**नवनाथ नवघरे**
रा.से.यो. विद्यापीठ कॅम्प सहभाग



**आशुतोष लोंढे**
बॉक्सिंग स्पर्धेत विभागीय निवड



**प्रफुल्ल मतकर**
रा.से.यो.उत्कृष्ट स्वयंसेवक



**प्राजक्ता खेडकर**
रा.से.यो. उत्कृष्ट स्वयंसेवक



**भाऊसाहेब म्हस्के**
रा.से.यो. उत्कृष्ट स्वयंसेवक

# गुणवंत विद्यार्थी

## कलाशाखा



आरती ताडे
प्रथम वर्ष, कला (प्रथम)



पूजा रजपूत
द्वितीय वर्ष, कला (प्रथम)



चंद्रकला ठाणगे
तृतीय वर्ष, कला (प्रथम)

## वाणिज्य शाखा



शितल वाबळे
प्रथम वर्ष, वाणिज्य (प्रथम)



स्वाती केंगार
वादविवाद स्पर्धा सहभाग, द्वितीय वर्ष वाणिज्य (प्रथम)



किशोर धोत्रे
तृतीय वर्ष, वाणिज्य (प्रथम)

## विज्ञान शाखा



श्रध्दा लबडे
प्रथम वर्ष, विज्ञान (प्रथम)



वैशाली वाक्चौरे
द्वितीय वर्ष, विज्ञान (प्रथम)



अविनाश शेवाळे
तृतीय वर्ष, विज्ञान (प्रथम)

## संगणक विज्ञान



आकाश शर्मा
प्रथम वर्ष, संगणक (प्रथम)



निकिता भोर
द्वितीय वर्ष, संगणक विज्ञान (प्रथम)



सोनी पालवे
तृतीय वर्ष, संगणक विज्ञान (प्रथम)


# मान्यवरांच्या भेटी



महाविद्यालयाच्या नवीन इमारतीची पाहणी करताना संस्थेचे अध्यक्ष मा. आमदार डॉ. नरेंद्रजी घुले पाटील साहेब समवेत प्रा. डॉ. आर. आर. सासवडे, इंजिनियर आर. एन. मोटे व प्राचार्य




श्री. काकासाहेब शिंदे जनरल मॅनेजर, ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना, भेंडे, महाविद्यालय सदिच्छा भेट प्रसंगी मार्गदर्शन करताना



रसायनशास्त्र विभाग आयोजित दोन दिवसीय चर्चासत्रास कु.डॉ. निवेदिता चंद्रशेखर घुले यांनी भेट दिली असता सत्कार करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम.वराट व प्रशासकीय अधिकारी श्री. के.के. पवार



महाविद्यालय परीक्षा केंद्राची पाहणी करताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अशोक चव्हाण, डॉ. प्रमोद भडकवाडे व इतर मान्यवर



संगणक विभाग प्रात्यक्षिक परीक्षा केंद्र मंजूरीसाठी भेट दिली असता प्रा.डॉ. अरूण नागवडे यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. टी. एम. वराट समवेत डॉ. अरूण गांगर्डे



विज्ञान विभाग प्रात्यक्षिक परीक्षा केंद्रास भेट दिली असता प्रा. डॉ. एस. ए. पिंगळे, प्रा.डॉ. बी.ए. पाटील, प्रा.डॉ. सौ. एस. वाय. सरदार, प्राचार्य व महाविद्यालयीन प्राध्यापिकावृंद

# विशेष व्याख्यानमाला



राष्ट्रीय सेवा योजना व इतिहास विभाग आयोजित महात्मा गांधी जयंती कार्यक्रम प्रसंगी विचार व्यक्त करताना प्रा.डॉ. मोहनराव देशमुख (माजी तत्वज्ञान विभाग प्रमुख न्यु आर्टस कॉलेज, अ.नगर) प्राचार्य डॉ. टी.एम.वराट, प्रा. एस.व्ही. मरकड (कला शाखा प्रमुख)




हिंदी विभाग द्वारा आयोजित हिंदी पखवाडा समारोह के अवसरपर विचार व्यक्त करते हुए मा. प्राचार्य डॉ. सुरेश बाबर, प्राचार्य डॉ.टी. एम. वराट हिंदी विभाग अध्यक्ष प्रा. एस.बी. दहातोंडे



मराठी विभाग आयोजित विशेष व्याख्यानमाला प्रसंगी प्रा. डॉ. दत्तात्रय गंधारे (अॅड. एम. एन. देशमुख महाविद्यालय, राजुर) यांचा सत्कार करताना मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. के. आर. पिसाळ



वनस्पती शास्त्र विभाग आयोजित विशेष व्याख्यानमाला प्रसंगी प्रा. श्रीमती बी.ए. कार्ले (न्यु आर्टस कॉलेज, अ.नगर) यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. टी.एम. वराट




भूगोल विभाग आयोजित विशेष व्याख्यानमाला प्रसंगी मार्गदर्शन करताना प्रा.डॉ. शरद बोरूडे (अ.नगर कॉलेज अ.नगर)



वाणिज्य विभाग आयोजित विशेष मार्गदर्शन प्रसंगी प्रा. एन.बी. गोयल यांचा सत्कार करताना वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. के.बी. ताके व प्रा. के. आर. ढोबे


# विद्यार्थी विकास मंडळ



विद्यार्थी विकास मंडळ आयोजित विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा उद्‌घाटन प्रसंगी प्रतिमापूजन करताना प्रा.बी.एन. शिंदे समवेत प्राचार्य, विद्यापीठ प्रतिनिधी सनी सप्रे व प्राध्यापक वृंद



विद्यार्थी विकास मंडळ आयोजित विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा प्रसंगी मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. मंगशे वाघमारे, समवेत प्राचार्य डॉ.टी.एम. वराट, प्रा.के.बी. ताके व प्रा. गायकवाड



विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा प्रसंगी मार्गदर्शन करताना प्रा. बी.एन. शिंदे एक क्षण



विद्यार्थी विकास मंडळ व मराठी विभाग आयोजित मराठी भाषा दिनानिमित्त प्रतिमापूजन करताना प्रा. डॉ. संजय नगरकर समवेत विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी प्रा.आर.ए. नेटके व प्राध्यापक वृंद



एन.एस. एस. व विद्यार्थी विकास मंडळ आयोजित महाविद्यालय प्रांगणात वृक्षारोपण करताना प्राचार्य डॉ. टी.एम.वराट व प्राध्यापक वृंद



स्वच्छ भारत अभियान अंतर्गत महाविद्यालय परिसराची स्वच्छता करताना कमवा व शिका योजनेतील विद्यार्थी व मान्यवर

# निर्भय कन्या अभियान



विद्यार्थी विकास मंडळ आयोजित निर्भय कन्या अभियान प्रसंगी उद्घाटन करताना अ.नगर जिल्हा परिषद उपाध्यक्षा सौ. राजश्रीताई घुले पाटील, सौ. स्मिता पानसरे, प्राचार्य डॉ.टी.एम. वराट, प्रा. संजय भुसारी, प्रा. आर.ए. नेटके




निर्भय कन्या अभियान प्रसंगी अ.नगर जिल्हा परिषद उपाध्यक्षा सौ. राजश्रीताई घुले पाटील यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ.टी.एम. वराट



विद्यार्थी विकास मंडळ आयोजित निर्भय कन्या अभियान प्रसंगी मार्गदर्शन करताना अ.नगर जिल्हा परिषद उपाध्यक्षा सौ. राजश्रीताई चंद्रशेखर घुले पाटील



निर्भय कन्या अभियान प्रसंगी 'महिला सबलीकरण' या विषयी विद्यार्थीनींना मार्गदर्शन करताना सौ. स्मिता पानसरे



निर्भय कन्या अभियान प्रसंगी 'महिला विषयक कायदे' या विषयावर मार्गदर्शन करताना ॲड. श्रीमती अनिता दिघे समवेत प्रा. श्रीमती के. आर. ढोबे व प्रा. श्रीमती जी.एस. सोनवणे



निर्भय कन्या अभियान प्रसंगी ॲड. अनिता दिघे यांचे समवेत महाविद्यालयीन विद्यार्थीनी एक क्षण...

# राष्ट्रीय सेवा योजना



राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी शिबीर, कर्जुने खारे शिबिराचे उद्घाटन करताना प्रमुख पाहुणे मा.श्री. विनोद चव्हाण (पी.एस.आय.) तसेच उद्घाटक मा.श्री. काकासाहेब शिंदे (जनरल मॅनेजर) श्री. अंबादास शेळके, श्री. अनिल देशमुख व प्राचार्य




राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबीर कर्जुने खारे उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना मा.श्री. काकासाहेब शिंदे (जनरल मॅनेजर ज्ञानेश्वर सह.सा. कारखाना, भेंडे)



युवान संस्था आयोजित कॅन्सर मुक्ती अभियान रॅलीमध्ये सहभागी झालेले मा. सभापती डॉ.क्षितिज घुले पाटील व राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी



राष्ट्रीय सेवा योजना उद्घाटनप्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक मा.श्री. काकासाहेब शिंदे (जनरल मॅनेजर) यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. टी.एम. वराट समवेत प्रमुख पाहुणे मा.श्री. विनोद चव्हाण (पी.एस.आय.)



विशेष श्रम संस्कार सात दिवसीय शिबीरामध्ये योगा करताना रा.से.यो. स्वयंसेवक विद्यार्थी व विद्यार्थीनी



विशेष श्रमसंस्कार शिबीर कर्जुने खारे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा परिसर स्वच्छ करताना एन.एस.एस. विद्यार्थी समवेत मा.श्री. अंबादास शेळके व रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ.के.आर. पिसाळ

# राष्ट्रीय सेवा योजना



विशेष श्रमसंस्कार शिबीर प्रसंगी व्याख्यान मालेत प्रास्ताविक करताना रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.के.आर. पिसाळ समवेत व्याख्याते प्रा.डॉ. आनंद त्रिपाठी व प्रा.एन.एन. झिंज




विशेष श्रमसंस्कार शिबीर प्रसंगी प्रमुख व्याख्याते प्रा. अमोल सायंबर यांचा सत्कार करताना प्रा.एस.ए. काळे समवेत प्रा.एस.बी. दहातोंडे व कार्यक्रम अधिकारी



विशेष श्रमसंस्कार शिबीर प्रसंगी उत्कृष्ट स्वयंसेवक गटाचा सत्कार करताना संस्था समन्वयक प्रा.डॉ. आर.आर. सासवडे समवेत उपस्थित मान्यवर



विशेष श्रमसंस्कार शिबीर प्रसंगी प्रमुख पाहुणे मा.श्री. विनोद चव्हाण (पी.एस.आय.) यांचेसमवेत प्रा. एस.व्ही. मरकड व रा.से.यो. स्वयंसेवक विद्यार्थी



विशेष श्रमसंस्कार शिबीर समारोप प्रसंगी प्रतिमापूजन करताना प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. आर.आर. सासवडे, कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.श्री. अंबादास शेळके (संचालक, खरेदी विक्री संघ, अ.नगर) प्राचार्य, कार्यक्रम अधिकारी व ग्रामस्थ




विशेष श्रमसंस्कार शिबीर समारोप प्रसंगी मार्गदर्शन करताना अ.नगर रा.से.यो. ओ.टी.आय प्रमुख प्रा. डॉ. शरद बोरूडे, संस्था समन्वयक प्रा. डॉ. आर.आर. सासवडे, प्राचार्य डॉ.टी.एम. वराट व कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. के.आर. पिसाळ

# राष्ट्रीय सेवा योजना



विशेष श्रमसंस्कार शिबीर समारोप प्रसंगी रा.से.यो. ए.टी. आय. प्रमुख प्रा.डॉ. शरद बोरूडे (अ.नगर कॉलेज, अ.नगर) प्रा.डॉ. आर.आर. सासवडे, मा.श्री. अंबादास शेळके, प्राचार्य, कार्यक्रम अधिकारी व सर्व महाविद्यालयीन प्राध्यापक वृंद



विशेष श्रमसंस्कार समारोप प्रसंगी रा.से.यो. ए.टी.आय प्रमुख प्रा.डॉ. शरद बोरूडे, प्रा. डॉ. आर.आर. सासवडे, मा.श्री. अंबादास शेळके, प्राचार्य, कार्यक्रम अधिकरी व सर्व शिबीरातील सहभागी स्वयंसेवक विद्यार्थी

# शैक्षणिक सहल




कला व वाणिज्य शाखा आयोजित शिवनेरी-भीमाशंकर सहलीत सहभागी झालेले प्राध्यापक व विद्यार्थी



कुकडी नदी पात्रात तयार झालेले जगप्रसिध्द रांजणखळगे, निघोज या ठिकाणास महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भेट दिली असता अनुभवलेला एक क्षण



जग प्रसिध्द कैलास लेणे वेरूळ या ठिकाणास विज्ञान शाखा शैक्षणिक सहलीतील विद्यार्थ्यांनी भेट दिलेला एक क्षण



औरंगाबाद जिल्ह्यातील थंड हवेचे ठिकाण म्हैसमाळ येथे शैक्षणिक सहलीत आनंद घेताना शास्त्र शाखेतील विद्यार्थी व प्राध्यापकवृंद

# दिन विशेष कार्यक्रम



भूगोल दिनानिमित्त प्रा.डॉ. शरद बोरूडे (अ.नगर कॉलेज, अ.नगर) यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ.टी. एम. वराट समवेत प्रा. श्रीमती व्ही.डी. मोरे, प्रा.डॉ. के.आर. पिसाळ



१९ फेब्रुवारी शिवजयंती दिनानिमित्त 'छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनकार्य' या विषयी विचार व्यक्त करताना प्रा.एस. एल. नवथर (न्यु आर्टस् कॉलेज शेवगांव) समवेत प्रा.डॉ.के. एम.अंबाडे, प्राचार्य व प्रा.एस.व्ही. मरकड (इतिहास विभाग प्रमुख)



महाविद्यालयात वेषभूषा दिन साजरा करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट, मराठी विभाग प्रमुख डॉ. के.आर. पिसाळ व महाविद्यालयीन विद्यार्थी



आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन प्रसंगी विद्यार्थीनी कु. अक्षदा थोरात हिस एन.एस.एस. माहितीपत्रक देताना प्राचार्य डॉ. टी.एम. वराट समवेत प्रा. एस.ए. काळे, प्रा. डॉ. के.आर. पिसाळ व प्रा. पी.ए. फटांगरे



५ सप्टेंबर शिक्षक दिनानिमित्त महाविद्यालयातील प्राध्यापकांचा गुलाब पुष्प देऊन सत्कार करताना विद्यार्थी



राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विचार व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट समवेत विज्ञानशाखा प्रमुख प्रा.अे.यु. डोंगरे, प्रा.बी.बी. माताडे व प्रा. श्रीमती बी.एस. पवळे

# दिन विशेष कार्यक्रम



स्व. मारूतरावजी घुले पाटील (संस्थेचे संस्थापक) यांचे १५ वे पुण्यस्मरण दिनी विनम्र अभिवादन करताना प्राचार्य डॉ.टी.एम. वराट, महाविद्यालयीन प्राध्यापक वृंद, प्राध्यापकेतर सेवकवृंद व विद्यार्थी



लोकनेते सहकारी महर्षी स्व. मारूतरावजी घुले पाटील यांच्या ८७ व्या जयंती निमित्त प्रतिमापूजन करताना प्रमुख पाहुणे मा.श्री. मच्छिंद्र काळे (संस्था विश्वस्त) श्री. गायकवाड साहेब, प्राचार्य व प्राध्यापक वृंद



स्व. मारूतरावजी घुले पाटील यांच्या जयंतीचे औचित्य साधून दोन दिवसीय रांगोळी स्पर्धेचे उद्घाटन करताना संस्थेचे विश्वस्त मा.श्री. मच्छिंद्र काळे मा.श्री. गायकवाड साहेब व प्राचार्य



स्व. मारूतरावजी घुले पाटील यांच्या जयंतीचे औचित्य साधून रांगोळी स्पर्धेचे परीक्षण करताना संस्थेचे विश्वस्त मा.श्री. मच्छिंद्र काळे, मा.श्री. गायकवाड साहेब, प्राचार्य व प्राध्यापक वृंद

# निरोप समारंभ



तृतीय वर्ष वाणिज्य निरोप समारंभ प्रसंगी महाविद्यालयास भेट वस्तू देताना वाणिज्य शाखेतील विद्यार्थी, प्राचार्य डॉ.टी.एम. वराट व वाणिज्य शाखा प्रमुख प्रा.के.बी. ताके व प्रा.पी.ए. फटांगरे



तृतीयवर्ष कला निरोप समारंभ प्रसंगी ग्रंथालयास पुस्तके भेट देताना कला शाखेतील विद्यार्थी, प्राचार्य, कलाशाखा प्रमुख प्रा. एस.व्ही. मरकड व प्रा. एफ. बी. खान

# विविध उपक्रम



महाविद्यालय वार्षिक अंक 'क्षितिज' प्रथम अंकाचे प्रकाशन करताना प्रशासकीय अधिकारी मा.श्री. के.के. पवार, संस्था समन्वयक प्रा.डॉ. आर आर. सासवडे, मा.श्री. किसन भिंगारदिवे (नगरसेवक), प्राचार्य व प्राध्यापकवृंद



महाविद्यालयातील आधुनिक सुसज्ज संगणक कक्षाचे उद्‌घाटन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी. एम. वराट समवेत संगणक शास्त्र शाखा प्रमुख प्रा. श्रीमती मनिषा गवारे, प्रा. एच. एस. सय्यद व प्राध्यापकवृंद



अ.नगर येथील युवा निर्माण संस्थेच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय पथनाट्य स्पर्धेत 'महिला व मुलींवर होणारे अत्याचार' या विषयावर उत्तेजनार्थ पारितोषिक देताना मा.श्री. देवाशिष शेडगे व पथनाट्यातील विद्यार्थी



महाविद्यालय वाङ्मय मंडळाचे उद्‌घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे प्रा.डॉ. बाळकृष्ण लळीत (चां.ता.बोरा कॉलेज, शिरूर), प्राचार्य डॉ. टी.एम. वराट, वाङ्मय मंडळ प्रमुख प्रा.डॉ. के.आर. पिसाळ व प्राध्यापकवृंद




महाविद्यालय व इतिहास विभागाकडून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ इतिहास अभ्यास मंडळावर नियुक्ती झाल्याबद्दल प्रा.डॉ.के. एम. अंबाडे (इतिहास विभाग प्रमुख न्यु आर्टस् कॉलेज अ.नगर) यांचा सत्कार करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी. एम.वराट समवेत प्रा. सोपान नवथर (शेवगाव)



इंग्रजी विषयात सेट परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.पी.ए. फटांगरे यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. टी.एम. वराट

# विविध उपक्रम



क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ वर्धापन दिना निमित्त संस्थेचे अध्यक्ष मा. आ.डॉ. नरेंद्रजी घुले पाटील यांनी ग्रंथालयास पुस्तके भेट दिली. पुस्तके स्विकारताना कला शाखा प्रमुख प्रा. एस.व्ही. मरकड व इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.पी.ए. फटांगरे



संगणकशास्त्र शाखेतील विद्यार्थी संगणक कक्षामध्ये प्रात्यक्षिक करताना एक क्षण



१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त कार्यक्रमात सहभागी झालेले महाविद्यालयीन विद्यार्थी व प्राध्यापकवृंद



२६ जानेवारी प्रजासत्ताकदिनी राष्ट्रध्वजास मानवंदना देताना प्रमुख पाहुणे संस्था समन्वयक प्रा.डॉ. आर.आर. सासवडे, प्राचार्य डॉ.टी. एन.बराट व प्राध्यापक वृंद



स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र आयोजित 'स्पर्धा परीक्षेला सामोरे जाताना' या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा.एस.जी. सोनटक्के समवेत प्राचार्य व स्पर्धा परीक्षा केंद्रप्रमुख प्रा. श्रीमती पी.एस. साबळे



क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त अभिवादन करताना रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. के.आर. पिसाळ, प्राध्यापकवृंद व श्री. पी.व्ही. दळवी (वरिष्ठ लिपिक)

# विविध उपक्रम



संस्थेचे अध्यक्ष मा.आ.डॉ. नरेंद्रजी घुले पाटील यांनी ग्रंथालयास भेट दिली असता पाहणी करताना एक क्षण



अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या सल्लागार मंडळावर सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल मा.प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांचा महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकेतर सेवक सत्कार करताना



तृतीय वर्ष पदवी ग्रहण समारंभ प्रसंगी विद्यार्थ्यांस पदवी प्रदान करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट, संस्था सचिव मा.श्री. अनिल शेवाळे, डॉ.एस. एन. पठाण, प्राचार्य डॉ. बी. जे. अप्पाराव व मान्यवर.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ तृतीय वर्ष पदवी ग्रहण समारंभ प्रसंगी पदवी प्रमाणपत्र स्विकारल्या नंतर महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राचार्य डॉ.टी. एम. वराट व परीक्षा अधिकारी प्रा.एस.बी. दहातोंडे



१ मे २०१८ महाराष्ट्र दिनानिमित्त राष्ट्रीय ध्वजास मानवंदना देण्यासाठी उपस्थित असलेले प्राचार्य डॉ.टी.एम. वराट, प्राध्यापक व प्रशासकीय सेवक वृंद



मराठी भाषा संवर्धन पंधरवडा व स्वामी विवेकानंद जयंती निमित्त वाङ्मय मंडळ व ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ग्रंथ प्रदर्शनास भेट देताना प्राचार्य डॉ.टी. एम. वराट, प्रा. एस.व्ही. मरकड प्रा.डॉ. के.आर. पिसाळ व विद्यार्थी

# राज्यस्तरीय चर्चासत्र




१२ व १३ फेब्रुवारी २०१८ रोजी दोन दिवसीय रसायनशास्त्र चर्चासत्र प्रसंगी मान्यवरांचे स्वागत करताना महाविद्यालयीन विद्यार्थी



दोन दिवसीय राज्यस्तरीय रसायनशास्त्र चर्चासत्र प्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक शेवगाव पंचायत समिती सभापती मा.डॉ. क्षितिज घुले पाटील यांचा सत्कार करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट समवेत प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ.बी. एच. झावरे, प्रशासकीय अधिकारी श्री. के.के. पवार व प्रा.डॉ. आर.आर. सासवडे



रसायनशास्त्र चर्चासत्र उद्घाटन प्रसंगी मनोगत व्यक्त करताना शेवगाव पंचायत समिती सभापती मा. डॉ. क्षितिज घुले पाटील व मान्यवर



दोन दिवसीय राज्यस्तरीय रसायनशास्त्र चर्चासत्र प्रसंगी विचार व्यक्त करताना प्रमुख पाहुणे मा. प्राचार्य डॉ. बी. एच. झावरे (न्यु आर्टस् कॉलेज, अ.नगर) व मान्यवर



दोन दिवसीय राज्यस्तरीय रसायनशास्त्र चर्चासत्र समारोप प्रसंगी मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ.डी.डी. पाटील (राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अ.नगर) समवेत प्रा. डॉ. अे.इ. आठरे (रसायनशास्त्र विभाग प्रमुख न्यु आर्टस् कॉलेज, अ.नगर) व प्राचार्य



राज्यस्तरीय रसायनशास्त्र चर्चासत्र समारोप प्रसंगी मा. प्राचार्य डॉ.टी.एम. वराट समवेत प्राचार्य डॉ. डी.डी.पाटील व प्रा. डॉ. अे. इ. आठरे

# जयकर व्याख्यानमाला व ज्ञान विज्ञान वाचन चळवळ



डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला उद्‌घाटन प्रसंगी 'ग्राहक राजा जागा हो' या विषयावर व्याख्यान देताना प्रा. एन.जी. टकले समवेत प्राचार्य डॉ.टी.एम. वराट, केंद्रप्रमुख प्रा.श्रीमती जी.एस. सोनवणे व प्राध्यापक




जयकर व्याख्यानमालेत दुसरे पुष्प गुंफताना डॉ. बाबासाहेब खराडे यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ.टी.एम. वराट, केंद्र प्रमुख प्रा. श्रीमती जी.एस. सोनवणे, प्रा. पी.ए. फटांगरे



ज्ञान विज्ञान वाचन चळवळ कार्यक्रम प्रसंगी व्याख्याते प्रा.डॉ. सुधाकर शेलार (अ.नगर कॉलेज अ.नगर) यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. टी. एम. वराट



ज्ञान विज्ञान वाचन चळवळ समारोप प्रसंगी दिप प्रज्वलन करताना प्रा.डॉ. अतुल मोरे (अ.नगर न्यु लॉ कॉलेज, अ.नगर), प्राचार्य व प्राध्यापक वृंद

# क्रीडा विभाग



वाघोली जि. पुणे येथे ६० किलो वजन गटात झालेल्या बॉक्सिंग स्पर्धेत आशुतोष लोंढे याची विभागीय पातळीवर निवड



प्रथम वर्ष कला, वाणिज्य व शास्त्र शारीरिक शिक्षण परीक्षा प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा.डॉ. शरद मगर, शारीरिक शिक्षण संचालक (न्यू आर्टस कॉलेज अ.नगर) समवेत प्रा. ए.के. आहेर (शारीरिक संचालक) व प्रा. डॉ. के. आर. पिसाळ

# गद्य विभाग

# गद्य विभाग


| अ.क्र. | लेखाचे नाव | लेखकाचे नाव |
|---|---|---|
| १ | लोकनेते मारूतरावजी घुले पाटील एक आदर्श नेतृत्त्व | राणी अशोक जाधव |
| २ | छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्री विषयक दृष्टिकोन | गणेश रामभाऊ सोनवणे |
| ३ | कॉम्प्युटर सायन्स (BCS) पदवी करिअरच्या संधी | प्रा. मनिषा गवारे |
| ४ | पहिलं नमन सावित्रीला | पूजा विजय भोर |
| ५ | तरूणांपुढील आदर्श व आव्हाने | भाऊसाहेब म्हस्के |
| ६ | जीवन एक चिंतन | प्राजक्ता रमेश कराळे |
| ७ | महिला सबलीकरण | रेणुका जालिंदर घोलप |
| ८ | वाट चुकलेली तरूणाई | माधुरी संजय शिंदे |
| ९ | स्त्री जन्माची कहाणी | आरती बाबासाहेब ताडे |
| १० | भारत व आंतरराष्ट्रीय संबध | वैशाली संजय वाकचौरे |
| ११ | स्त्री भ्रूणहत्या | उर्मिला संजय घोगरे |
| १२ | बाप | आश्विनी सुरेश मंचरे |
| १३ | गुगलची माहिती | पूनम शेळके |
| १४ | शेतकरी कर्जमाफी | आशा मदन मोरे |
| १५ | एडवर्ड जेन्नर | प्रा. बी. बी. माताडे |
| १६ | विद्यार्थी करिअर | प्रा. के.बी. ताके |
| १७ | A Call For Equal Rights for Women | वैशाली संजय वाकचौरे |
| १८ | Now Is the time to Change the World | आरती बाबासाहेब ताडे |

# लोकनेते मारूतरावजी घुले पाटील एक आदर्श नेतृत्त्व

महाराष्ट्राच्या भूमीत अनेक थोर रत्ने जन्माला आली. त्यांच्या कार्यकर्तृत्वाने महाराष्ट्राचा कायापालट झाला. अशाच थोर व्यक्तींमध्ये मारूतरावजी घुले पाटील हे एक आदर्श नेतृत्त्व होते. त्यांचा जन्म श्रीरामपूर तालुक्यात पडेगाव येथे १५ सप्टेंबर १९३० साली झाला. त्यांचे संपूर्ण नाव विश्वनाथ दादापाटील बनकर असे होते.

मारूतरावजी घुले पाटील यांना लहानपणापासूनच समाजसेवेची आवड होती. शालेय जीवनात ते अनेक विद्यार्थ्यांच्या अडी-अडचणी समजून घेत असत. गरीब मुलांना ते वसतिगृहात जाऊन मदत करायचे. या काळात त्यांना समाजातील अनेक समस्यांचा जवळून परिचय झाला. लोकांच्या समस्या निवारण करण्यासाठी आपण काहीतरी केले पाहिजे असे त्यांना सतत वाटत असे.

इ.स. १९४५-४६ मध्ये माध्यमिक शाळेत शिक्षण घेत असताना राष्ट्रभक्त अच्युतराव पटवर्धन, एस.एम.जोशी, रावसाहेब पटवर्धन आदींची भाषणे ऐकण्याची त्यांना संधी मिळाली. तो काळ स्वातंत्र्य चळवळीने भारलेला होता. अनेक नेते स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले होते. याच काळात नगर जिल्ह्यात काँग्रेस व राष्ट्रसेवा दलाचे कार्य जोमाने सुरु होते. या सर्व गोष्टींचा परिणाम त्यांच्या मनावर झाला. परिणामी यातूनच पुढे ते राष्ट्र सेवा दलाच्या कार्यामध्ये सहभागी झाले. त्यांनी सातारा येथे राष्ट्रसेवा दलाच्या माध्यमातून समाजासाठी उत्कृष्ट कार्य केले.

मारूतरावजी घुले पाटील यांचे कार्यकर्तृत्त्व पाहून इ.स. १९४९ रोजी शेवगाव तालुक्यातील दहिगाव ने येथील शंकरराव घुले पाटील यांनी त्यांना दत्तक घेतले. त्यामुळे त्यांचे नामांतर मारूतरावजी शंकरराव घुले पाटील असे झाले. याच काळात त्यांना संत साहित्याचे गाढे अभ्यासक व थोर विचारवंत बाळासाहेब भारदे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांना आदर्श मानून सहकार क्षेत्रात कार्यास प्रारंभ केला.

**सामाजिक व शैक्षणिक कार्य :–**

मारूतरावजी घुले पाटील यांनी इ.स. १९५४ रोजी दहिगाव ने येथे आपल्या गावी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीची स्थापना केली. त्यानंतर इ.स. १९५८ मध्ये त्यांनी शेवगाव सहकारी खरेदी विक्री संघाची स्थापना केली. ग्रामीण भागातील गोरगरिब शेतकरी, शेतमजूर, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी यासाठी त्यांनी दहिगाव ने येथे इ.स. १९५९ रोजी जनता शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. तसेच नवजीवन विद्यालय व वसतिगृहाची स्थापना करून ग्रामीणभागातील विद्यार्थ्यांची शिक्षण व राहण्याची सोय केली.

शिक्षण क्षेत्राबरोबरच सहकारी क्षेत्रातही त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला. अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या स्थापनेच त्यांचा मोठा वाटा होता. बँकेच्या स्थापनेपासून ते अखेरपर्यंत संचालक होते. त्यांनी केलेल्या कामामुळे बँकेचे नाव देशात प्रसिध्द झाले. इ.स. १९६६ साली जायकवाडी प्रकल्पग्रस्त बेरोजगार तरूणांसाठी शेवगाव या ठिकाणी औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु केली. त्यामुळे अनेक तरूणांना कायमस्वरूपी रोजगार मिळाला.

**राजकीय कारकीर्द :–**

मारूतरावजी घुले पाटील यांनी केलेल्या सामाजिक कार्यामुळे त्यांचे नाव जनमाणसात प्रसिध्द झाले. त्यातून त्यांना राजकीय क्षेत्रात काम करण्याची संधी मिळाली. इ.स. १९६२ साली ते शेवगांव, नेवासा मतदार संघातून आमदार म्हणून निवडून आले. याकाळात त्यांनी शेतकरी, धरणग्रस्त, कामगार, व्यापारी, गोरगरीब यांच्यासाठी भरीव कार्य केले. पुढे इ.स. १९७२ ते १९७८ या काळात त्यांनी विधान सभा व विधान परिषदेत आमदार म्हणून काम पाहिले. याकाळात त्यांनी मागासवर्गीय तरूणांना पंचायत राज संस्थेमध्ये प्रतिनिधित्व देऊन आदर्श निर्माण केला. त्यामुळे त्यांचे नाव सर्व महाराष्ट्राला परिचित झाले. याशिवाय मुळा आणि जायकवाडी धरणग्रस्तांसाठी पुर्नवसनाचा कायदा करावा यासाठी त्यांनी आग्रह धरला. आपल्या न्याय्य मागणीसाठी पाठ पुरावा करून हा कायदा त्यांनी अंमलात आणला. एवढेच कार्य करून ते थांबले नाहीत तर इ.स. १९७० मध्ये शेतकऱ्यांसाठी ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याची स्थापना भेंडा, ता. नेवासा येथे केली. त्यातून आपल्या भागातील शेतकऱ्यांचा त्यांनी आर्थिक व सामाजिक कायापालट केला. त्यांनी केलेल्या या कार्यामुळे त्यांचे नाव अहमदनगर जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्रात प्रसिध्द झाले.

**पुरस्कार –**

मारूतरावजी घुले पाटील यांनी केलेल्या कार्यामुळे त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले. इ.स. १९९४ मध्ये ऑल इंडिया नॅशनल युनिटी कॉन्फरन्स नवी दिल्ली यांचा इंदिरा गांधी प्रियदर्शिनी पुरस्कार मिळाला. त्यानंतर १९९६ मध्ये असोसिएशन नवी दिल्ली यांचा 'भारतीय उद्योगरत्न' पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. तसेच १९९७ मध्ये सहकार व सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल जिल्हा सहकारी बँकतर्फे 'सहकार भूषण' पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले.

**समारोप –**

सहकार महर्षी, लोकनेते स्व. मारूतरावजी घुले पाटील यांनी शिक्षण, सहकार, समाज व राजकीय क्षेत्रात मोलाचे योगदान दिलेले आहे. त्यांनी केलेले कार्य हे समाजासाठी आदर्श व प्रेरणादायी ठरत आहे. त्यांच्या नेतृत्त्वास व कृर्तत्त्वास शतशः प्रणाम...

**– राणी अशोक जाधव**
एस.वाय.बी.कॉम

# छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्री विषयक दृष्टिकोन

मध्ययुगीन भारताच्या इतिहासात अनेक राज्यकर्ते होऊन गेले. या काळात ज्या राजांचा पराभव होत असे; त्यांच्या स्त्रियांची विटंबना ठरलेली होती. स्त्रियांना गुलाम बनविणे. त्यांना विकणे, दासी बनविणे अशा गोष्टींमुळे स्त्रियांची स्थिती दयनीय बनली होती. या सर्व परिस्थितीला मूठमाती देण्यासाठी एक आदर्श राज्य निर्माण होणे आवश्यक होते. अशा काळात १९ फेब्रुवारी १९३० रोजी शिवाजी महाराजांचा जन्म झाला. शिवाजी महाराजांचे वडील शहाजीराजे कर्नाटकात नोकरीस असल्यामुळे बाल शिवाजीवर संस्कार करण्याचे काम जिजाऊंनी केले. त्यामुळे शिवाजी महाराजांच्या मनावर आई जिजाऊंची छाप पडली. दया, न्याय, उदारता, धर्म, सहिष्णूता अशा गुणांचे संस्कार जिजाऊंनी बाल शिवाजीवर केले. त्यातूनच शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन निर्माण झाला.

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्यातील स्त्रियांची शत्रूबरोबरच स्वकीयांकडून कुचंबना, अन्याय, अत्याचार होणार नाही याची काळजी घेतली. त्यासाठी त्यांना कठोर नियम घालून गुन्हेगारांना शिक्षा दिली. स्वराज्यात जर स्त्रियांवर अत्याचार करणाऱ्या घटना घडल्या तर शिवाजी महाराज गुन्हेगारांना हातपाय तोडणे, डोळे काढणे, कडालोट करून देह दंडाची शिक्षा देणे यासारख्या शिक्षा देत असत. शिवकाळात घडलेल्या काही घटना पाहिल्या तर शिवाजी महाराजांचा स्त्री विषयक दृष्टिकोन कसा होता याचा प्रत्यय येतो. पुण्याजवळील रांझेगाव येथे बाबाजी भिकाजी गुजर हा तेथे पाटीलकी करीत होता. त्याने एकदा एका गरीब शेतकऱ्यांच्या मुलीला दिवसाढवळया सर्वांसमक्ष उचलुन नेऊन अत्याचार केला. ही बातमी शिवाजी महाराजांना समजल्यानतंर त्यांना भयंकर संताप आला. त्यांनी बाबाजी पाटलांचे हात पाय तोडण्याची शिक्षा देऊन त्याची पाटीलकी जप्त केली. तसेच कर्नाटक मोहिमेच्या काळात बेलवडीच्या किल्ल्याला सखुजी गायकवाड याने वेढा दिला होता. तेथे सावित्रीबाई ही विधवा स्त्री आतून आपल्या सैन्यासह प्रचंड प्रतिकार करीत होती. तिने २७ दिवस हा किल्ला लढविला. अखेर तिचा पराभव झाल्यानंतर सखुजी गायकवाड याने किल्ला ताब्यात घेऊन तिच्यावर बलात्कार केला. ही घटना जेव्हा शिवाजी महाराजांना समजली तेव्हा त्यांनी सखुजी गायकवाड यांचे डोळे काढून भयंकर शिक्षा दिली. तसेच घेतलेला किल्ला सावित्रीबाईस परत देऊन तिचा सन्मान केला.

छत्रपती शिवाजी महाराजांचे स्त्रिया विषयीचे धोरण व कार्य सर्वांना परिचित आहे. याशिवाय स्त्रियांच्या सती जाण्याच्या प्रथेलाही त्यांनी विरोध केला. जेव्हा शहाजीराजांचे निधन झाले. तेव्हा जिजाऊ माँसाहेब सती जाण्यास निघाल्या. त्यावेळी त्यांनी जिजाऊ माँसाहेब यांना सती जाण्यापासून परावृत्त केले. या घटनामुळे संपूर्ण स्वराज्यात परिवर्तन झाले. स्वराज्यातील सर्व स्त्रियांची सती जाण्याच्या दुष्ट प्रथेतून मुक्तता झाली.

छत्रपती शिवाजी महाराजांचे पूरोगामी विचार व त्यांनी केलेलीअंमलबजावणी केवळ महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण भारत वर्षाला मार्गदर्शक ठरली. त्यामुळेच साडेतीनशे

वर्षापूर्वी त्यांनी अनुसरलेले विचार आजही आवश्यक आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे हे मोठेपण त्यांच्या कट्टर शत्रूंनीही मान्य करून त्यांचे कौतुक केलेले दिसून येते. त्यामुळेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर औरगजेब बादशहा म्हणाला की, ''स्त्रियांची कदर करणारा एक महावीर मरण पावला'' म्हणुनच प्रत्येक स्त्रीने आपल्या मुला-बाळांना शिवरायांची शिकवण देणे काळाची गरज आहे असे वाटते.

**– गणेश रामभाऊ सोनवणे**
एस.वाय.बी.कॉम

# कॉम्प्यूटर सायन्स (BCS) पदवी करिअरच्या संधी

आजचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे. अलिकडे आपले सर्वांचे लाडके पंतप्रधान नरेंद्र मोंदीजींच्या (Digital India) घोषणे नंतर प्रत्येक क्षेत्रात कॉम्प्युटरचा वापर झपाटयाने वाढत आहे. जिकडे पहावे तिकडे कॉम्प्युटरशिवाय पर्याय नाही. सर्व कामे कॉम्प्युटरवरच करावी लागतात. लाईट बिल भरणे, परीक्षा फार्म भरणे असो वा आधार कार्ड, पॅन कार्ड नोंदणी, सगळीकडेच सर्रास कॉम्प्युटरचा वापर वाढत आहे. आजकाल नोकरीमध्येही कॉम्प्युटरचे बेसिक ज्ञान विचारात घेतले जाते. शासकीय नोकरीत एम.एस.सी.आय टी. सक्तीचे झाले आहे. आपणास फक्त बेसिक ज्ञान असून कॉम्प्युटरच्या क्षेत्रात रोजगार सहजासहजी उपलब्ध होत नाही. केवळ ६ महिने अथवा १ वर्ष कॉम्प्युटर कोर्स करण्यापेक्षा कॉम्प्युटर सायन्सची तीन वर्षांची पदवी घेतलेली कधीही चांगली. हा पदवी कोर्स आय.टी. क्षेत्रात रोजगार मिळवण्यासाठी खूप चांगला पर्याय आहे. पदवी पुर्ण केल्यानंतर, तुम्हाला शिक्षणाच्या एका विशिष्ट प्रवाहात श्रेष्ठ ज्ञान मिळालेले असते. कोणतेही करिअर निवडतांना त्या क्षेत्रातील वाढीची संभावना, स्पर्धा,नोकरीची उपलब्धता कार्य, आवश्यकता इत्यादी माहिती असणे आवश्यक असते.

भूतकाळापासून भारताला संशोधकांची जननी मानली जाते. शून्याचा शोध ही भारताच्या मातीत लागला आणि परम ८००० हया सूपर कॉम्प्युटरचा शोधही भारताच्या डॉ. विजय भटकर यांनी लावला.

कॉम्प्युटर सायन्सच्या पदवीनंतर खालीलप्रमाणे प्रगतीच्या व करिअरच्या वाटा उपलब्ध आहेत. तुम्ही आवडेल त्या क्षेत्रात पदार्पण करू शकता.

- सॉफ्टवेअर डेव्हलपर
- प्रोग्रमर विश्लेषण
- शिक्षक
- माहिती तंत्रज्ञान (आयटी) व्यवस्थापक
- सिद्धांत
- संशोधक
- प्रकल्प व्यवस्थापक (आयटी)
- तांत्रिक समर्थन विकसक / प्रोग्रामर
- बँका
- संगणक कंपन्या
- डेस्कटॉप प्रकाशन
- Consultancies
- शासकिय एजन्सी
- आर्थिक संस्था
- विमा प्रदाते
- सुरक्षा आणि Detective Aqencies
- तांत्रिक समर्थन
- शाळा आणि महाविद्यालये
- सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट कंपनी
- प्रणाली देखभाल

## Higher Studies after B.C.S

There are many post graduate courses the candidate can pursue after completing B.C.S. The candidates can opt for M.Sc. Computer Science, Master of Computer Application (M.C.A) or Master of Computer Management (M.C.M) The candidates who are interested in management can opt for Master of Business Administration. There are many other option for higher studies after B.C.S. some of them are listed below.

- Advanced Diploma in Multi-lingual

Computer Programming (ADMCP)
- 3D Animation and Visual Effects
- CCNA
- Certification Program for Telecom Software Testing
- Advance Diploma in Hardware and Networking (ADHN)
- Certification Program for Network planning and Optimization
- Database Administration
- IHT Certified Network Professional
- Certified Professional for the web Development
- HCS+ (Hardware Courser)
- Red Hat Certified Engineer (RHCE)
- TCNP Certification
- Information Security and Ethical Hacking
- IIJT Certified Networking Expert (IC-Next) (PC NEXT)
- Integrated Master of Computer Application (IMCA)
- Master of Science Information Technology MSc (IT)
- Web And Software Engineering
- SAP Courses
- MBA Telecommunication System Management
- Microsoft Certified System Engineer (MCSE)
- Robotics Course

## Job Opportunities after B.C.S

The aspirants can find many job opportunities after completing B.C.S. The different Employment areas where the aspirants can find the job are listed below.

- Banks
- Computer Manufacturing Firms
- Desktop Publishing
- Consultancies
- Government Agencies
- Financial Initiation
- Insurance Providers
- Security and Surveillance Companies
- Technical Supports
- School and Colleges
- Software Development Companies
- System Maintenance
- Traffic Light Management

The job type of the candidates after completing Bachelor of Computer science are listed below.

- Software Developer
- Programmer Analyst
- Teacher
- Information Technology (IT) Manager
- Theorist
- Researcher
- Project Manager (IT)
- Technical Support Developer / Programmer

## Job Opportunities in Government Sector

The Candidates find job opportunities in Government Sector as well as in private Sector. In government sector the candidates Find opening is C-DAC, C-DIT, etc. The candidates can also apply for various test conducted by the central government like UPSC, PSC, RRB, etc. The candidates can also apply for various posts in public sector banks. In government Sector the candidates can expert a salary of around Rs. 3 lakhs per annum.

Job Opportunities in Private Sector

In private sector the aspirants can find opportunities in different Software companies. Some of the Software companies recruiting B.C.S. graduated are T.C.S., Infosys, I.B.M., wipro, oracal, Accentors, etc. The candidates can find job opportunities in ITES and BPO division as well. The remunerations for candidates after completing B.C.S. vary from company to company. In private sector the aspirants can expects a starting salary of about Rs.3.5 lakh per annum. The candidates can get good remuneration after some years of experience.

**Prof. Manisha Gaware**
Head of Computer Science Department

# पहिलं नमन सावित्रीला

हा एक संवाद आहे. स्त्री-पुरूष समानतेचा सहिष्णुतेचा आणि शांततेचा. जगभर स्त्री पुरूष विषमता आहे. त्या विषमतेच्या विरोधातील चळवळीही आहेत. या चळवळींना हजारो वर्षाचा इतिहास आहे. व्यक्ती म्हणून अनेक स्त्री-पुरूषांनी या विषमतेच्या विरोधात बंड पुकारलं. आपल्या लिखाणातून, कामातून जग बदलण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नांना यशही आलं समाज बदलत गेला. स्त्री बदलली. पुरूषही काही प्रमाणात बदलला. स्त्री-पुरूष नातं ही काही प्रमाणात बदललं. या बदलाच वेध आपण घेतला पाहिजे आपणच वर्तमानही समजून घेतला पाहिजे आणि भविष्यातील दिशा ही शोधल्या पाहिजे.

३ जानेवारीला आपण सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करतो. भारतीय स्त्रीला शिक्षणाची दारे उघडण्यात महात्मा फुले आणि सावित्रीबाईचे योगदान आहे. त्याचा परिणाम आज महिला शिकू लागल्या स्वतःच्या पायावर उभे राहुन स्वअस्तित्व सिद्ध करू लागल्या. आणि आज उच्च शिक्षणात मुलीची संख्या मुलांपेक्षा जास्त वाढली आहे. एका सर्वेक्षणानुसार मुलांची संख्या १.९ कोटी तर मुलींची संख्या १.६७ कोटी इतकी आहे. याचा परिणाम देशातील विद्यापीठांची संख्या ७९९ वरून ८६४ वर गेलेली दिसून येते.

''ज्ञान नाही विद्या नाही ते घेणेची गोडी नाही.
बुद्धी असुनि चालत नाही, तयास मानव म्हणावे का?''

असे विचारणाऱ्या सावित्रीबाई बुद्धी, ज्ञानाशिवाय मानव जन्म व्यर्थ आहे असं सांगतात. स्त्री-शूद्रांना शिक्षण मिळावं म्हणून आपल सारं आयुष्य देतात. मला सावित्रीबाईच्या जीवनाविषयी नेहमी कुतूहल वाटतं. महात्मा फुले यांच्या सारखा गुरू मिळाल्यानंतर या बाई केवळ लिहायला - वाचायला शिकल्या नाहीत, तर मोठया जिद्दीनं मुलींची शाळा चालवली. किती कठीण होतं हे काम? सासऱ्यांनी घराबाहेर काढलेलं. किती सनातन्यांचा विरोध. साथीदार नाहीत. शेण दगडांचा मार तर त्यांनी झेललाच पण वाटेल तसे वागणेही सहन केले. पण शांतपणे कोणतीही तक्रार न करता मोठया सहिष्णुतेने आपलं काम सुरू ठेवलं. ज्यांनी दगड मारले त्यांच्याविषयी एकही अपशब्द वापरला नाही. मात्र त्या कोणाला घाबरल्या नाहीत. निर्भीडपणे आपली वाट चालत राहिल्या. हे जग बदलावं म्हणुन धडपडणाऱ्या आम्ही सर्वच स्त्रिया आपल्याला 'सावित्रीच्या लेकी' म्हणवून घेतो. खरंच या मातेनं आम्हाला निर्भयतेचा आणि सहिष्णूतेचा मोठा वारसा दिला आहे. महात्मा फुल्यांची पत्नी एवढीच ओळख सावित्रीबाईसाठी पुरेशी नाही. जोतीरावांच्या सहवासात ज्ञानप्राप्तीची संधी मिळाल्याने सावित्रीबाई जोतिबा फुले यांची सावली म्हणून जगल्या नाहीत. जोतिरावांच्या खांद्याला खांदा लावून स्त्री शिक्षणाचे व समाज परिवर्तनाचे काम त्यांनी केले.

बालहत्या प्रतिबंधक गृहातील अनाथ मुलांचा सांभाळ केला. विधवा काशीबाईचा मुलगा यशवंतला दत्तक घेतलं. सावित्रीबाईंनी डोळसपणे जोतीरावांच्या विचारांचा स्वीकार केला. त्याचं व्यक्तिमत्त्व आपल्या पतीशी जोडलेलं होतं, तरीही स्वतंत्र होतं. सावित्रीबाईचं लेखन, भाषण व कवितांमधून त्यांची स्वतंत्र प्रज्ञा लक्षात येते. 'नवस' या कवितेत त्या म्हणतात,

''गोटयाला शेंदुर फासुनि तेलात! वसति देवात दगड तो!!
म्हसोबा खेसोबा भयंकर देव! तयावर भाव ठेवोनिया!!
नवस करिती बकर मारीन! नवस फेडीत बाळजन्मी !!
धोंडे मुले देवी नवसा पावती! लग्न का करती नारी नर!!
सावित्री वदते करी विचार! जीवन साकार करूनी घ्या!!

महात्मा फुले यांनी १९४९ मध्ये पुण्यात उस्मान शेख यांच्या वाडयात प्रौढासांठी शाळा सुरू केली होती. उस्मान शेख यांची बहिण फातिमा शेख यांनी सावित्रीबाई व सगुणाबाई क्षिरसागर यांच्यासह फुले दाम्पत्यांनी सुरू केलेल्या ट्रेनिंग स्कूलमध्ये प्रशिक्षण घेतलं होतं. कठीण परिस्थितीत सावित्रीबाईनी फतिमाबाईना साथ दिली. आधुनिक भारतातील पहिली मुस्लिम शिक्षिका असा फातिमा शेख यांचा गौरव करायला हवा. महात्मा फुले व सावित्रीबाईच्या शाळेत मातंग समाजातील मुक्ता साळवे शिकली. चौदाव्या वर्षात तिनं १९५५ च्या ज्ञानोदय मासिकांच्या दोन अंकामध्ये मांग महारांच्या दुःखाविषयी निबंध लिहिला. सावित्रीबाईच्या कार्याची जाणीव जोतीरावांच्या सहकाऱ्यांना होती. जोतिरावांच्या मृत्यूनंतर १८९१ मध्ये नारो बाबाजी महाधट-पाटील यांनी महात्मा जोतिराव फुले यांचे 'अमरजीवन' या नावाचं पुस्तक लिहलं. पुस्तकाची अर्पणपत्रिका सावित्रीबाईच्या कार्याची यथोचित गौरव करणारीच आहे.

जोतिबा व सावित्रीबाई या दांम्पत्याचं परस्परांमधील नातं, संवाद हे त्या काळातच नाही; तर आजही आश्चर्यचकित करणारं आहे. दोघंही स्त्री-पुरूष समानतेच्या वाटेवरचे प्रवासी आहेत. पत्नीला अक्षर ओळख करून देणारे जोतिराव सावित्रीबाईंचे मित्र, सखा, मार्गदर्शक बनले. समाजातील स्त्री-शूद्रांवरील अन्यायविरूद्ध संघर्ष करण्याची प्रेरणा या पती-पत्नीमध्ये होती. या प्रेरणेनं दोघाचंही व्यक्तिमत्त्व फुलवलं. आपल्या या कार्यात सावित्रीबाईचं असलेलं योगदान जोतिराव जाणून होते. वेळप्रसंगी त्यांनी तो व्यक्तही केला आहे. १८५२ मध्ये विश्रामबाग वाडयात जोतिरावांचा स्त्री शिक्षणाच्या कार्याबद्दल सत्कार झाला. त्या वेळी जोतिराव म्हणाले, 'मी शाळा स्थापण्यास कारणमात्र आहे. सावित्रीबाईनी अनेक संकटांशी सामना देत या शाळा चालवल्या. त्याचा मला अभिमान वाटतो.'

महाराष्ट्र शासन, विविध संस्था व संघटनांकडून महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाईची जयंती, पुण्यतिथी साजरी केली जाते. महात्मा फुले यांचा महाराष्ट्र म्हणताना या राज्यातील किती जोडप्यांना जोतिबा व सावित्रीबाई सारखं सहजीवन जगावसं वाटतं? एकमेकांसोबत वाढलेले परस्परांमध्ये मैत्री असलेले हे जोडपे आपला आदर्श हवा. सावित्री व जोतिबा संवाद नावाच्या कवितेत सावित्रीबाईंनी या नात्याविषयी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. या कवितेतून दोघांमधील स्नेहपूर्ण मैत्री जाणवते.

ज्योतिबाःखरे तुज बोल हटला अंधार !शुद्रादी महार जागे झाले!!
दीनदलितांनी अज्ञान सहावे! अमानुष व्हावे घुबडेच्छा!!
कोंडला कोंबडा तरी आरवतो! पहाट सांगतो लोकांना !!
सावित्रीः काळरात्र गेली अज्ञान पळाले!!
सर्व जागे केले सूर्याने या! शुद्र या क्षितिजा जोतिबा हा सूर्य!!
तेजस्वी अपूर्व उगवला! जाऊ चला गाऊ
मानवता केंद्र! मनुष्यत्व इंद्रपदी जाऊ!!

जोतिरावांच्या मृत्यूनंतरही सावित्रीबाईनी खंबीरपणे सामाजिक कार्य सुरू ठेवले. इ.स. १८९३ मध्ये झालेल्या सत्याशोधक समाज परिषदेच्या त्या अध्यक्ष होत्या. आपल्या भाषणांमधून व लिखाणातून त्यांनी सत्य, सदाचार, नीती यांचा पुरस्कार केला. इ.स. १८९६ ला महाराष्ट्रात पडलेल्या दुष्काळात सावित्रीबाईंनी अन्नछत्र चालवून जीवाची पर्वा न करता रूग्णांची सेवा करताना त्यांना प्लेगची लागण झाली. या आजारात त्यांना मृत्यू आला. प्रज्ञा व करूणेचा सुरेख संगम सावित्रीबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग होता. त्यांनी निर्माण केलेल्या या समतेच्या वाटेवरून चालताना ऊर भरून येतो. कळत-नकळत त्यांची प्रेरणा आपल्याही जीवनाचा भाग बनते. जात, धर्म, भेदापलिकडे जाणारे सावित्रीबाईंचे कार्य मानवतेचा जागर करणारे आहे. सावित्रीबाईंना पहिलं नमन करून आपण या संवादाला सुरूवात करूयात.

**– पूजा विजय भोर**
एफ.वाय.बी.कॉम

# तरूणांपुढील आदर्श व आव्हाने

स्वामी विवेकानंद म्हणतात की ,''मला एक असा तरूण मिळवून द्या की, जो शरीराने तंदुरूस्त आहे, त्याच्या इच्छा व विकार त्याच्या ताब्यात आहेत. त्याचे मन आरशासारखे पारदर्शक व स्वच्छ आहे. तर मी जगात कोणताही चमत्कार करून दाखवेन.''

खरं आहे, आजच्या जगाला विकसित करणारा एकमेव सक्षम घटक म्हणून तरूणाईकडे पाहिले जाते. सामाजिक उत्थानाची जबाबदारी असलेल्या या तरुणांपुढे काय आदर्श व आव्हाने आहेत? हा प्रश्न एखादया वयस्कर माणसाला विचारला तर त्याचे उत्तर कदाचित असे असेल की, आजच्या तरूणांना आदर्श बघवत नाहीत आणि आव्हाने पेलत नाहीत. खंरच अशी परिस्थिती आहे का? आजची तरूण पिढी ही उद्याची मार्गदर्शक पिढी असेल. त्यामुळे या तरूणांना काही मुलभूत आव्हाने पेलणे आवश्यक आहेत. तरूण वर्गाविषयी विचार व त्यांना देण्यात येत असलेले महत्त्व वेगळ्या प्रकारचे आहे.

समाजाचा विचार करताना वर्गानुसार, जातीनुसार गट पाडून विश्लेषण केले जाते. वयानुसार समाजाची विभागणी करून युवक हा वेगळा सामाजिक गट निर्माण करण्याची प्रवृत्ती नवीन आहे. त्याचप्रमाणे तरूण माणसांनाही आपण युवक म्हणुन कोणीतरी वेगळे आहोत, वेगळी

सामाजिक जबाबदारी आपल्यावर आहे व समाज परिवर्तनाच्या कार्यात आपल्याला विशेष स्थान आहे ही जाणीव होत आहे. मात्र ही जबाबदारी पार पाडत असताना काही गोष्टींचे भान तरूण वर्गाने ठेवले पाहिजे. यामध्ये प्रमुख म्हणजे नैतिकता, विचारसरणी व आदर्शवाद. आपण जसे वागणार आहोत, जी कार्य करणार आहोत, ती इतर कुणाला लक्षात ठेवावीशी वाटली नाहीत तरी गत काळ व इतिहास यांना मात्र निश्चितच नोंद घ्यावी लागेल. इतिहास हा संदर्भासाठी असतो. जेव्हा नवीन पिढी गतकाळाची पाने उलगडून बघेल, त्यावेळेस आत्ताचा इतिहास त्यांना सामोरा येईल. माणूस अणुकरण प्रिय जरूर आहे. मात्र बऱ्याच वेळेस वाईट गोष्टींचेच अनुकरण जास्त होते. उद्या एखादया चुकीच्या प्रथेचा पायंडा पडू नये याची खबरदारी घेणे हे प्रत्येक तरूण पिढीसमोरील प्रथम आव्हान आहे. त्यामुळे आज ज्या वाटेवर आपण चाललोय ती नैतिक की अनैतिक हे बघणे गरजेचे आहे.

बरं हे निकष लावताना कशाचा आधार घ्यावयाचा! याबाबत सुनिता देशपांडेंचे विचार पहा - कशाला वाईट म्हणावे व कशाला चांगले? कशापेक्षा काय बरं, अगर कशापेक्षा काय वाईट? आपल्या हाती समांतर आयुष्य थोडंच आहे? शिवाय आपली मतं देखील बदलत असतात. विशेषतः परतीचे वारे वाहु लागले की, त्यांची चाहूल संवेदनशील माणसांना लगेच लागते. मग सिंहावलोकन सुरु झालं की सगळं उलट्याचं पालटं दिसू लागते. यावेळी उपयोगी पडतात ते आदर्श. जगातील प्रत्येक माणूस नियतीने नेमलेली कामे करत असतो. तो आदर्श आहे का नाही हे त्याने केलेल्या कामाच्या यशावर अवलंबून असते. आदर्शवादानेच बघायला गेले तर प्रत्येक माणूस हा आपल्यातच एक आदर्श बनत असतो.

एका प्रसिद्ध वाक्यामध्ये सांगायचे म्हटले तर "We don't need follwers, we need ideals" पण तरीसुद्धा मान्यता पावलेले आदर्श व्यक्तिमत्त्व आपल्याला नेहमी उपयुक्त ठरेल. भारतीय युवकांच्या दृष्टीने स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी व डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा उल्लेख होईल. यांनाच आदर्श का म्हणावे यामागची काही कारणे विशद करणे मला महत्त्वाचे वाटते. त्यांचे नुसते ज्ञानच प्रचंड आहे, एवढेच नाही तर त्यांची नैतिकता व सखोल विचार करण्याची प्रवृत्ती गौतम बुद्धांनी केलेल्या, ''मी सांगतो आहे म्हणुन माझ्यावर विश्वास ठेवू नका, धर्मग्रंथात आहे म्हणून आंधळेपणाने स्वीकार करू नका तर सर्व विचार तुमच्या बुद्धीवर तपासून पहा आणि योग्य, अयोग्य काय ते ठरवा.'' या उपदेशाचे तंतोतंत त्यांनी पालन केले. साधे जीवन जगत उच्च विचारसणी जोपासली. त्यांची काम करण्याची पद्धत, सचोटी, जगाकडे व जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन काहीतरी बनून दाखविण्याची मनिषा व आपण जगाला काहीतरी देणे लागतो आहे ही भावना हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या अनेक पैलूपैकी काही आहेत.

ही आदर्श व्यक्तिमत्त्व घराघरात नुसती पोहचवणेच नव्हे तर ती तिथे रूजवणे व निर्माण करणे युवकांपुढे प्राथमिक कर्तव्य आहे. हे घडविताना काही जोड आव्हाने, उदाहरणार्थ प्रबोधन, शिक्षण, बेरोजगारी सारखी युवा वर्गासमोरील मोठी समस्या आहे. आदर्शवाद व वैचारीक जडण-घडण इत्यादी विचारात घेणे आवश्यक आहे. आजची पिढी रूळ सोडून धावते आहे असे स्वर कानी पडतात. अशा या द्रुतगतीने धावणाऱ्या गाडीला एका चालकाची गरज आहे व तो चालक म्हणून आपल्याला युवा प्रबोधनाकडे पाहता येईल. १९ व्या शतकात ज्या प्रकारे युरोपची उन्नती झालेली दिसते. त्यामध्ये युवा प्रबोधनामुळे झालेले चमत्कार ठळकपणे दिसून येतात. भारतामध्येही असे प्रबोधन गेल्या काही वर्षात वेगाने झाले. पण यास परंपरागत व पार्श्वभूमीची सांगड होती. त्यामुळे हे प्रबोधन वरचेवर राहिले व त्याची सामान्य तरूणांवर तितकिसी पकड बसली नाही. तेव्हा खेडयापाडयातील तरूणांना प्रबोधित करणे हे एक महत्त्वाचे व आकाराने मोठे असे आव्हान म्हणता येईल.

या प्रबोधनाचे फलित म्हणून आपणास युवक चळवळीकडे बघता येईल. स्वातंत्र्य चळवळीनंतर देशव्यापी स्वरूपावर फक्त संपच दिसतात. युवकांना राजकारणी लोक केवळ मतदार म्हणुन पाहतात व राजकीय फायद्यासाठी त्यांचा उपयोग बरेचदा करून घेतात. त्यांच्या समस्याकडे खऱ्या अर्थाने पाहिले जात नाही. युवकांचे सामाजिक प्रबोधन, रोजगार उपलब्धता, व्यक्तिमत्त्व विकास यांकडे कानाडोळा केला जातो. ही परिस्थिती हाताबाहेर जाण्याआधीच युवकांना जागृत करणे गरजेचे आहे व त्यांच्या इच्छाशक्तीला प्रबळ चालना देणे गरजेचे आहे. तरुण पिढीला ध्येयवादी व

आदर्शवादी बनविण्याची ताकद त्यांच्या इच्छा शक्तीच्या विचारात आहे.

"ध्येयाच्या वेदना मनाला होऊ दे
वार तुझ्या प्रत्येक क्षणास होऊ दे,
अशक्य सुद्धा म्हणेन शक्य आहे,
इतका गर्व तुझ्या मी पणास होऊ दे."

जेव्हा या तरूणांना ध्येयाने पछाडले जाईल, संकटांना सामोरे जाण्यासाठी निधडी छाती निर्माण होईल, आकाशाला गवसणी घालण्याचे सामर्थ्य अंगी येईल, त्यावेळेस उज्वल भारतवर्षाची निर्मिती होऊ शकेल. ही जबाबदारी पेलणे हे जबरदस्त आव्हान नियतीने तरूणांसमोर ठेवले आहे. या आव्हानाला सामोरे जाताना दुसरे पुढे ठाकणारे आव्हान म्हणजे समाजकारण व राजकारणात युवा शक्तीचा सहवास. ढोबळमानाने युवा समाजाचा विकास हाच उद्याच्या समाजाचा विकास आहे. फायद्याच्या राजकारणापासून स्वतःला दूर ठेवणे व समाजाच्या फायद्यासाठी काम करणे हेच हितावह ठरेल. पाश्चात्त्य युवक चळवळीपासून एकांगी व असमज धडा घेणारे मुठभर विद्यार्थी, मुर्ख तरूण, तथाकथित संतप्त तरूण, साहित्यिक व राजकीय पक्षांच्या अधीन असलेल्या गटांच्या मोहजालातून सुटणे व या घटकांना सरळ करणे कालप्राप्त ठरेल.

सामाजिक क्रांती व संस्कृती यांचा सरळ संबध आहे. काळानुरूप विज्ञानाची कास धरून विकसित पावताना सांस्कृतिक वारसा जपणे हे ओघाने आलेच. भारताचा विचार करता, जिथे ७०% टक्क्याहून अधिक जनता खेडयामध्ये राहते, तिथे दर्जेदार ग्रामव्यवस्थेचा वारसा जपणं व सद्यःपरिस्थितीतील ग्राम संस्कृतीची जपवणूक करणे. त्यात कालानुरुप मात्र योग्य बदल करणं, हे सुदूधा युवा खांदयावरील कर्तव्य आहे. महात्मा गांधींनी त्यांच्या 'युवक हे आव्हान स्वीकारतील काय?' या निबंधात लिहलंय, "देशातील युवक जर त्यागमय जीवनास तयार होतील तरच ग्रामप्रधान संस्कृतीतील दोषांचे निवारण करण्याचे मी सुचवलेले उपाय कार्यान्वित होऊ शकतील. तसे ते करू इच्छित असतील तर युवकांना त्यांच्या जीवनक्रमात आमूलाग्र बदल घडवून आणावा लागेल." शहरी भागातील तरूणांनी इतर खेडूत भागातील युवकांना शिक्षित व संघटित करून, तेथील जनतेशी निरोगी संबंध निर्माण करण्यासारख्या प्रयत्नांवरच इतर आव्हाने पेलण्याची सक्षमता येऊ शकेल. खेडयातील तरूणांमध्ये संघर्ष करण्याची भावना प्रज्वलित ठेवणं हे त्यांच्या प्रगतीतील महत्त्वाचे अस्त्र ठरू शकेल.

संघर्षाच्या आधीच हार मानलीस तू,
कर्तबगारी आधीच गमावलीस तू,
जीवन हा संघर्ष आहे , तोच नको म्हणतोस तू,
अरे जगण्याच्या आधीच संपलास तू!

या कुसुमाग्रजांच्या म्हणण्याप्रमाणे या शक्तीला वेळेआधीच नष्ट होण्यापूर्वी एका परमशक्तीमध्ये परावर्तीत करणे हे युवकांच्या अग्रक्रमात असणे आवश्यक आहे. बऱ्याचदा शिक्षण घेऊन काही कामधंदा वा नोकरी नसल्याने वैफल्यग्रस्त होणाऱ्या तरूणांमध्ये जिद्द निर्माण करणे हे ही या प्रयत्नामध्ये ओघाने आलेच. नैतिकता, वैचारिक जडणघडण वा प्रबोधन काहीही असो या सर्वांनाच भांडवल हे शिक्षणातून पूरविले जाते. शिक्षण म्हणजे योग्य व अयोग्य यामधील फरक समजणे व व्यवहार ज्ञान प्राप्त करणे. युवकांना पडणारा नित्याचा प्रश्न म्हणजे काय करावे व काय करू नये? हा प्रश्न सोडवण्यासाठी शिक्षण, अनुभव व कौशल्य यांची सांगड घालणे महत्त्वाचे. बऱ्याचदा माहितीचा अभाव हे कारण आर्थिक विकासाच्या अभावामागे दिसून येते. माहिती व तंत्रज्ञानाचा वापर सुयोग्य पद्धतीने हा तरूण वर्ग करताना दिसून येत नाही. स्वतःचा विकास स्वतःच करणे व त्यासाठी लागणारे भांडवल शिक्षणातून उभे करणे गरजेचे आहे.

या कलेचा सर्वोकृष्ट उपयोग युवकांच्या एका समस्येवर करता येईल व ती समस्या म्हणजे बेकारी. स्वतःचा आर्थिक विकास, सामाजिक बांधिलकी, देशाचा विकास, स्वतःच्या ज्ञानात भर घालणे इत्यादी बाबींना जोडणारा दुवा म्हणजे स्वयंरोजगार. स्वयंरोजगार स्वतःच्या विकासाबरोबरच इतर तरूणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देतो. त्यांचे जीवनमान उंचवण्यास मदत करतो व भरभराटीला चालना देतो. उत्तम व्यावसायिकतेचे लक्षण म्हणजे भरभराट. भारतीय तरूणांची मते याबाबतीत काहीशी उदासीन दिसतात. रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयातील बेकारांची आकडेवारी बोलकी आहे. उदयोगधंदा

चालविताना येणारी महत्त्वाची अडचण म्हणजे व्यवस्थापन. व्यवस्थापनामध्ये तरबेज होणे हे केवळ व्यवसायाच्यादृष्टीने नव्हे तर नित्य जीवनात सुद्धा उपयुक्त आहे. स्वावलंबनाकडे अग्रेसर होण्याचा सर्वात सोपा मंत्र युवकांसमोर काहीअंशी आव्हान व बऱ्याच अंशी कर्तव्य ठरू शकेल.

सर्वात शेवटची आणि तितकीच महत्त्वाची बाब म्हणजे कर्तव्यपालन. स्वार्थातून परमार्थाकडे या दृष्टिकोणातून पाहताना जर आपली कर्तव्ये आपण योग्य प्रकारे पार पाडली तरच परमार्थ करण्यासाठी वेगळे श्रम घ्यावे लागणार नाहीत. देश व त्याची प्रगती सर्वांवर अवलंबून आहे. त्यावेळी असे म्हणून चालणार नाही की, मी एकटाच आहे, मी हे सर्व का करणार? प्रत्येकाचा हातभार विकासात हवा असतो. त्यासाठी प्रत्यकाने आपले कर्तव्य ओळखले पाहिजे व कर्तव्यपुर्तीला प्राधान्य देऊन, तिला तन,मन,धन अर्पण केले पाहिजे. तरूणांकडे आव्हाणे पेलण्याची ताकद निश्चितच आहे, नव्हे ती फक्त त्यांच्यामध्येच आहे. गरज आहे प्रबळ इच्छाशक्तीची व इरेस पेटून उठण्याची. अजूनही वेळ गेलेली नाही म्हणूनच बा.भ. बोरकर म्हणतात,

**''तुला एवढे कसे कळत नाही**
**फुलत्या वेलीस वय नाही!**
**क्षितीज ज्याचे सरले नाही,**
**त्यास कसलेच भय नाही !''**

**–भाऊसाहेब म्हस्के**
टी.वाय.बी.ए

# जीवन एक चिंतन

जीवन म्हणजे एक संघर्ष. जीवन म्हणजे केवळ पहिला श्वासापासून शेवटच्या श्वासापर्यंत जगलेले आयुष्य नाही तर त्या प्रत्येक श्वासाबरोबर उराशी बाळगलेले स्वप्ने, ध्येय, आशा, अपेक्षा, नित्याची पूर्तता. प्रत्येक क्षणी आपल्या वाट्याला येणारे सुख-दुःख, मानपमान येणाऱ्या असंख्य अडचणी आणि त्यांना दयावे लागणारे तोंड. म्हणुनच असंही जगून बघायचं.

खळखळून हसायचं आणि हसवायचं...
हसुन जगायचं आणि क्षणात विसरायचं...
नेहमी खुष आणि सकारात्मक राहायचं...
सगळ्यांना सुध्दा खुष ठेवायचं...
जे आवडतं ते सगळं करायचं...
आवडतं त्याला नतमस्तक राहायचं...
राग आवरायला शिकायचं...
इतरांनाही समजून घ्यायचं...
असंही एकदा जगून बघायचं...
नव काहीतरी करून बघायचं...
मात्र....
प्रत्येक क्षणात भरभरून जगायचं...

चोऱ्या, लबाड्या करून पोट भरणारा चोर जीवन जगत असतो तर अत्यंत प्रामाणिकपणे काबाडकष्ट करून कमावणारा मजूरही जीवनच जगत असतो. तर प्रत्येकाचा जीवनविषयक दृष्टिकोन निरनिराळा आहे. अनेकांना युवावस्थेत नवीन दिशा घ्याव्या लागतात. माझ्या मते या वयातच जीवनविषयक दृष्टिकोन ठरविणे आवश्यक आहे. कारण या अवस्थेतील युवक युवती समाजात एक व्यक्ती म्हणून आकार घेत असतात. त्यांना समाजाची जाणीव होऊ लागते. म्हणून जीवनाला आयुष्य हे नाव दिले आहे.

''जगा इतके की आयुष्य कमी पडेल,
हसा इतके की आनंद कमी पडेल ,
काही मिळाले की नशीबाचा खेळ आहे,
पण प्रयत्न इतके करा की परमेश्वराला
देणे भागच पडेल''

पायातल्या चपला काढल्यानंतर त्यांना इथवर आणले म्हणुन त्यांना नमस्कार करणारा माणुस आपल्याला दिसतो. तर चप्पल म्हणजे केवळ संरक्षणासाठीची वस्तु असते. असे मानून काम झाल्यावर त्या फेकणारा माणूस ही आपल्याला याच जीवनात भेटतो. थोडक्यात काय तर व्यक्ती तितक्या प्रवृत्ती प्रमाणे प्रत्येकाचा दृष्टिकोन तेवढाच

वेगवेगळा असतो.

जीवनात असलेल्या परिस्थितीशी समरस होऊन तिच्याशी जुळवून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. असे असल्यास आपण स्पर्धात्माक युगात टिकाव धरू शकतो. आयुष्य म्हणजे काय? तर त्याचे उत्तर हे पुढीलप्रमाणे.

आयुष्य म्हणजे आव्हान. आयुष्य म्हणजे देणगी. आयुष्य म्हणजे धाडस. आयुष्य म्हणजे दुःख. आयुष्य म्हणजे गुंतागुंत. त्याला तोंड देणे गरजेचे आहे. तसेच आयुष्य म्हणजे कर्तव्य, खेळ,गीत, संधी,प्रवास, वचन, प्रेम, सौंदर्य. आयुष्यात आपल्याला अनेक गोष्टींना सामोरे जाणे गरजेचे असते. म्हणुनच म्हटले आहे की,

''जीवन म्हणजे खेळ नव्हे, फुकट मिळालेला वेळ नव्हे
आयुष्य कोडं आहे, सोडवाल तितकं थोडं आहे
म्हणूनच म्हणते आयुष्यात येऊन माणसं मिळवावी
एकमेकांची सुख-दुःखे एकमेकांना कळवावी''
आपलं जगणं दुसऱ्यासाठी जेवणातल्या मिठासारखं असावं
पाहिलं तर दिसत नाही पण नसलं तर जेवणच जात नाही

जीवनात आलेल्या परिस्थितीशी समरस होऊन तिच्याशी जुळवून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. असे असल्यास आपण स्पर्धात्मक युगात टिकाव धरून राहू शकतो.

''महापुरे वृक्षे जाती। तिथे लव्हाळे वाचती''

जर लव्हाळे प्रवाहच्या दिशेने वाकले नाही तर त्यालाही वृक्षाप्रमाणे आपले जीवन तेथेच संपवावे लागेल. जीवनात आपण नेहमी सर्वांना सोबत घेऊन चालायचे तसेच आपल्यामुळे इतरांना काही वाईट वाटणार नाही याचा आपण विचार करणे गरजेचे आहे. असे म्हणतात ना की तलवारीच्या धारीपेक्षा शब्दांची धार ही अधिक तीक्ष्ण असते. म्हणून व्यक्तीने नेहमी शब्द जपून वापरावे. कारण त्या शब्दांना अर्थ असतो. त्यामुळे आपल्याला आयुष्यात अनेक समस्यांना सामारे जाता येईल.

खरेच तुम्ही चांगले असता तेव्हा तुम्ही फक्त तुम्ही असता. आपण का म्हणून कोणाचे अनुकरण करायचे. जीवन आपले आहे आणि ते आपल्या पद्धतीने जगू शकतो. त्यासाठी आपल्याला कधी कधी मोठयांचा विचार घेणे गरजेचे असते.

जेव्हा ईश्वराने मानवाची निर्मिती केली,
तेव्हा त्याने मानवाला तीन पाने दिली.
पहिल्या पानावर जन्म लिहिला,
तिसऱ्या पानावर मृत्यू लिहिला.
जे दुसरे पान कोरे ठेवले
ते मानवाच्या हातात आहे.
मानव जसा जगत जातो
तसे ते पान भरत जाते.
या दुसऱ्या पानालाच जीवन म्हणतात.

जे दुसरे पान ईश्वराने कोरे ठेवले आहे. ते आपण आपल्या चांगल्या कर्मानि भरून आपल्या आयुष्यात चांगल्या वळणावर घेऊन जाणे. आयुष्यात अनेक वाईट गोष्टी घडतात पण त्यांना सामोरे जाणे गरजेचे आहे. त्यामुळे जीवनात अनेक सुख-दुःख मिळण्याची शक्यता असते. हे सर्व पार करून जाणाऱ्याला त्याच्या जीवनातील सर्व आनंदी गोष्टी मिळतील.

**– प्राजक्ता रमेश कराळे**
टी.वाय.बी.कॉम.

# महिला सबलीकरण

**''युगान् युगाची गुलामी चाले।**
**सांभाळिता चूल नि मूल।।**
**दास्याचा तुरुंग फोडते।**
**तोडते मानेवरील झूल।।**

आठ मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो. भारतातही तो मोठया प्रमाणात साजरा केला जातो. महिला सबलीकरण होण्यासाठी त्यांचा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व बौद्धिक विकास होणे गरजेचे आहे. त्यासाठी शासनाने ठोस पाऊले उचलली पाहिजे. शिक्षणामुळे स्त्रीला हक्क, कर्तव्य यांची जाणीव होते. स्थानिक स्वराज्य संस्थेने ३०% आरक्षण दिले आहे

याचीच ही पावती आहे. स्त्रियांचे सबलीकरण वर्ष म्हणून जरी आपण साजरे केले तरी महिलांच्या समस्या ज्या आहेत; त्या आहेतच. स्त्री विकासाला प्रेरणा देण्यासाठी, इतरही महिलांना सबलीकरणाचे सशक्त करणारे महत्त्व आत्मसात केले पाहिजे यातच स्त्रीचा खरा उद्धार आहे.

महिला सबलीकरणात उत्तम निर्णय घेणे, ही एक महत्त्वाची बाब आहे. कित्येक ठिकाणी ग्रामीण भागात आज स्त्रिला पाहिजे त्या प्रमाणात स्वातंत्र्य नाही. तिला हक्क नाही परंतु आपल्या भारतीय संविधानात प्रत्येकाला स्वयंनिर्णयाचा हक्क आहे असे नमूद केलेले असून देखील स्त्रीला यापासून वंचित ठेवले जाते. स्त्री असेल तर बालपणी पित्याचा, तरूण वयात पतीचा आणि म्हातारपणी पुत्राचा आधार का घ्यावा लागतो. मग आपल्याला स्वातंत्र्य मिळूनही अजुनही स्त्रीला अधिकार नाही. त्यामुळे महिला सबलीकरणावर जोर दयावा लागतो. त्याचे नारे पुकारावे लागतात.

एका आईचे उद्‌गार-

''लेक जन्माला आली, बाप म्हणतो कचरा।
आई म्हणते असू दया, माझ्या जीवाला आसरा।''

अशा प्रकारे आजही महिला सबलीकरणाची, सशक्तीकरणाची भावी पिढीला गरज वाटत आहे. ७३ वी घटना दुरूस्तीमध्ये महिलांना ३३% आरक्षण मिळाले. राजकरणातही पण कुटुंबाच्या काळजीमुळे कितीतरी स्त्रिया वंचित राहिल्या. घटनादुरूस्ती आणि पंचायत राज यांचा विचार करता महिलांना स्थान मिळाले मात्र त्याची अवस्था पंख छाटलेल्या पक्षाप्रमाणे केलेली आहे.

स्त्री कल्याण, महिला मंडळ याबाबत एक दृष्टिकोन ठेवण्यात आला आहे. स्त्रियांनी आपल्या कलमांचा वापर करून, तिला आपले स्थान निर्माण करणे अवघड आहे परंतु आपल्या नोकरीबद्दल, लग्नाबद्दल मानसिकतेबद्दल, ताणतणावाबद्दल, या सर्व गोष्टीविषयी मोकळेपणाने व कोणाच्याही दबावाखाली न राहता स्वतःचे निर्णय घेणे म्हणजे सबलीकरण होय.

शहरांमध्ये महिलांचे साक्षरतेचे प्रमाण चांगले आहे पण खेडयात हे प्रमाण कमी आहे. ते वाढविण्यासाठी सर्वांना सहकार्य करणे गरजेचे आहे ग्रामीण भागात महिलांचे साक्षरता प्रमाण वाढले तर समाजाचा पाया भक्कम होईल. समाज सक्षम शिक्षित स्वयंपूर्ण असा उभा राहिल म्हणुनच-

''चला निघू या सरसावोनी देशाच्या उद्धारणी''

असे आव्हान स्त्रियांनी करणे गरजेचे आहे. सुशिक्षित स्त्रियांना व्यवसाय नोकरी करण्याची इच्छा असुनही, त्यांना परिस्थितीमुळे करता येत नाही. ग्रामीण भागातही ग्रामसेविका, परिचारीका, शिक्षिका इ. अनेक व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. अशा अन्यायाविरूद्ध एकटीला लढा द्यावा लागतो परंतु आज स्त्रियांनी काही प्रमाणात जागृतता स्विकारली आहे. त्यामुळे स्त्रिया एकत्र होऊन समस्या सोडवू लागल्या आहेत. त्यामुळे महिला सबल आणि सशक्त बनू लागल्या आहेत.

''जुना इतिहास पलटूया आणि महिला सबलीकरण
व सशक्तीकरण करण्यावर विजयी पताका फडकू या।।''

– **रेणुका जालिंदर घोलप**
एस.वाय.बी.कॉम

# वाट चुकलेली तरूणाई

आजचं युग हे विज्ञानाचे युग आहे. या मध्ये सर्वच गोष्टीची रेलचेल मोठ्या प्रमाणात दिसून येते. दिवसेंदिवस लोकसंख्येचे प्रमाणही वाढत चाललेले आहे. वाढत्या लोकसंख्येत मोबाईलचा वापर मोठ्या प्रमाणात होतांना दिसतो. खरंच आजची तरूणाई मोबाईलच्या एवढी अधीन गेली आहे की, तिला भविष्याचे भान राहिले नाही.

मोबाईलचे जेवढे फायदे आहेत तेवढे तोटे ही आहे. आजचे पाल्य आपल्या पालकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक करतात परंतु या गोष्टीला काही पालकही कारणीभूत असतात. काही मुली-मुलं आपले स्वतःचे करिअर करण्यासाठी बाहेर शिक्षणासाठी जातात. काही मुला-मुलींना त्याचे पालक स्वतःचे व्यवसाय सुरू करून देतात. त्या पालकांनाही त्यांच्या म्हणण्याप्रमाणे असे वाटते की, त्यांच्याकडे मोबाईल आवश्यक आहे. पालकही त्यांचे

वेळोवेळी म्हणणे मानतात; त्यांची इच्छा पुर्ण करतात. ही परिस्थिती सर्व स्तरावरील व्यक्तिंमध्ये दिसुन येते. काही मुलं-मुली घरी कोणत्याही प्रकारचे काम न करता सतत मोबाईलवर मॅसेजद्वारे चॅटींग करत राहतात. त्यांच्या पालकांच्या लक्षात आले तर काही पालक आपल्या मुली-मुलांना विचारतात की, तू नेहमी मोबाईलवर काय करत असतो? परंतु आई-वडिल अडाणी असल्याचा फायदा घेऊन मुलं-मुली उत्तर देतात की, काही नाही. माझ्या कामाबद्दल माहिती मिळवतो. अशा प्रकारचे उत्तर ऐकून अडाणी आई-बाप शांत राहतात. काही मुले-मुली रस्त्याने चालल्या तरी त्यांची चॅटींग चालूच असते. आपण रस्त्यावरून चालतोय याचेही त्यांना भान नसते. रात्री पालक झोपल्यानंतरही रात्रभर त्यांचा मोबाईलवरून हात सुटत नाही. त्यामुळे ते सकाळी लवकर उठत नाहीत. आईला ही वाटते दिवसभर दमतात; काम करतात म्हटल्यावर आई काही कामही सांगत नाही. तरी ही या तरूणाईला काही वाटत नाही. पालक आपल्या लेकरासाठी दिवसभर काम करतात आणि ही मुलं-मुली त्याचा गैरफायदा घेतात. हे सर्व पाहून खूप राग येतो. आपले विचित्र प्रकारचे फोटो काढून व्हॉटस ॲपला टाकतात. काय मिळते त्यातुन त्यांना? चार चांगले शब्द सांगितले तर ते शब्द त्यांना वाईट वाटतात. फक्त एन्जॉयमेंट म्हणूनच प्रत्येक गोष्टीकडे आज पाहिले जाते. या सर्वांचा परिणाम भावी आयुष्यात भोगावाच लागतो. शिक्षणासाठी बाहेर राहणाऱ्या मुलं-मुली एन्जॉयमेंट करण्यातच दंग असतात. नाच, गाणं आणि मोबाईल एवढंच त्याचं जीवन असतं. त्यामुळे पालकांनी जागरूक राहणं आवश्यक आहे. अशी ही आजची तरूणाई असेल तर कसे असेल आपल्या देशाचे भविष्य?

**–माधुरी संजय शिंदे**
एस.वाय.बी.कॉम

# स्त्री जन्माची कहाणी

"किती रूपे, किती त्याग, स्त्रीच फुलविते फुलांची बाग"

माता, भगिणी, देवी, पत्नी, कन्या अशा अनेक स्वरूपात स्त्री दिसते. तिचे मूर्त रूप दुसऱ्यासाठी त्याग असेच असते. कोणत्याही रूपात दुसऱ्यांना सुखविणे हाच त्या स्त्रीचा हेतू असतो.

"मुलगी झाली म्हणून आणू नकोस कपाळावरअठी
अहो तिच होईल तुमच्या म्हतारपणाची काठी॥"

तिला पाहिजे तसा मान, सन्मान, तिच्या कार्याची जाण करणारा कोणीच मिळत नाही. ती मात्र आपली चाकोरी समजून त्याच मार्गावर चालते. घरामध्ये भाऊ असल्यास सर्वस्वी हक्क त्याचाच असतो. तरीही ती समाधान व्यक्त करते. जर मुलीने काही मागितले तर म्हटले जाते पोरीच्या जातीला कशाला हवी? हा हक्क फक्त मुलांचा. तो त्यालाच मिळावा. कपडे देखील तिला साधारण आणतात. शिक्षणाच्या बाबतीत उदासिनता असते. जास्त शिकून काय करणार? चूल आणि मूल. हुशार मुलींनाही जास्तीत-जास्त १२ वी पर्यंत शिकविले जाते. एखादे स्थळ पाहुन लग्न लाऊन देतात. लग्न ठरवताना वेगळेच वातावरण असते. मान, पान, हुंडा, लग्नातील जेवण अशा न संपणाऱ्या यादीची मागणी केली जाते. बिचारी मुलगी स्वतःला गुन्हेगार समजून जे-जे होईल ते-ते पाहते. जिथे सांगेल तिथे राहते. ती स्वतःच्या मनाशी म्हणते माझा काय दोष देवा? मला तू मुलगी केले आणि मुलाला गौरविले.

जन्मापासूनच सर्वांनी दाखविली नाराजी. लाड, कौतुक करण्यास कुणी नव्हते राजी. मिळाले त्यात समाधान, मिळाला जरी अपमान, तरी मी केला सर्वांचाच सन्मान. आईच्या कामात मदत केली. मलाच दिले संस्काराचे धडे अन् माझा पूर्ण कोंडमारा केला. मुलगी विवाहानंतर सासरी जाते. तिथेही पळसाला पाने तीनच. सून घरात येताच तिच्यावर सत्ता केली जाते. सून असतांना ती म्हणते आगीतून निघाली अन् फुफाटयात पडली. सगळ्याचं हित जाणूनही मला अपयश मिळाले. कधी शिव्या, मार, जाळपोळ तर कधी फाशी.

"नराधमांचा हा जमाना संपेल कधी।
माझे सौभाग्याचे लेणे, नको त्यांचे उणे-दुणे॥
हेच माझे जीवनसाथी, त्यांच्याबरोबर आता राहणे।
जातील निघून दिवस, सौख्य मला लाभले॥
आयुष्यातील भोग माझे, मी आनंदाने भोगले॥"

**– आरती बाबासाहेब ताडे**
एस.वाय.बी.कॉम

# भारत व आंतरराष्ट्रीय संबध

दोन सार्वभौम राष्ट्रांमध्ये राजकीय, आर्थिक, औद्योगिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात येणाऱ्या सलोख्याचा तटस्थेचा किंवा संघर्षाच्या संबंधाना व्यापक अर्थाने 'आंतरराष्ट्रीय' संबंध असे म्हणतात. एका राष्टातील व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या समूहाचा दुसऱ्या राष्ट्रातील व्यक्तीशी अथवा व्यक्तींच्या समुहाशी अनेक कारणांनी संबंध येतो. या संबंधाचे परस्परांच्या हिताच्या दृष्टीने नियमन करण्याचे कार्य शेवटी शासनाच्या कार्यक्षेत्रात येते. त्यामुळे साधारपणे दोन अगर अधिक स्वतंत्र राष्टांमधील राजकीय संबंधाना 'आंतरराष्ट्रीय संबंध' म्हणतात.

जागतिक राजकारणात अपरिहार्यपणे अनेक राष्ट्रांचे परस्परांशी संबंध व संघर्ष निर्माण होत असतात. केवळ स्वतःच्या भौगोलिक मर्यादेत राहून कोणत्याही राष्ट्राला अलिप्तपणे सुखी व संपन्न जीवन जगणे शक्य नसते. अशा प्रकारचे आंतरराष्ट्रीय संबंध प्राचीन काळापासून अस्तित्वात असले, तरी विसाव्या शतकात या संबंधांना जागतिक राजकारणात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. प्रत्येक राष्ट्र आपल्या राष्ट्रीय सामर्थ्याच्या अधिष्ठानावर जागतिक राजकारणात आपले स्थान निश्चित करीत असते. भौगोलिक परिस्थिती, लोकसंख्या, नैसर्गिक साधनसामग्री, आद्योगिक व शास्त्रीय प्रगती, लष्करी सुसज्जता, राष्ट्रीय चारित्र्य, मनोधैर्य, स्थिर राजव्यवस्था व जीवनविषयक तत्त्वज्ञान इ. गोष्टीवर राष्ट्रीय सामर्थ्य अवलंबून असते.

'आंतरराष्ट्रीय संबंध' या अभ्यासघटकामध्ये प्रामुख्याने भारताचे इतर देशाची व आंतरराष्ट्रीय संघटनांशी असलेले संबंध, आंतरराष्ट्रीय संघटना, जगभरामध्ये मोठया संख्येने असलेले परदेशस्थ भारतीय या विविध घटकांचा समावेश होतो. हा अभ्यासघटक समकालीन असल्याने भारताशी संबंधीत आणि भारताच्या हितसंबंधावर प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष परिणाम करणाऱ्या जगभरातील घडामोडींचा नियमितपणे मागोवा घेणे श्रेयस्कर ठरते.

'भारत व शेजारील देश यातील संबंध' यामध्ये भारताचे चीन, पाकिस्तान, अफगाणिस्तान, भूतान, नेपाळ, बांगलादेश श्रीलंका, मालदीव या देशांशी असणारे संबंध.

दुसऱ्या महायुध्दानंतर आंतरराष्ट्रीय संबंधाच्या क्षेत्रात भांडवलशाही व साम्यवादी असे दोन परस्परविरोधी सत्तागट निर्माण झाले. लष्करी अगर राजकीय सहकार्य, आर्थिक मदत व वैचारिक प्रचार इ. अशा प्रकारच्या अव्याहत प्रचारामुळे व कृतीमुळे आंतरराष्ट्रीय संबंधात शीत युद्धाला सुरुवात झाली आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर स्थापन झालेली संयुक्त राष्ट्रे ही आंतरराष्ट्रीय संघटना, आंतरराष्ट्रीय संबंधाना विचारविनिमयाने स्थिरता व सुसंबद्धता प्राप्त करून देण्याच्या दृष्टीने प्रयन्तशील आहे. भांडवलशाही व साम्यवाद ह्या दोन्हीही सत्तागटांपासून अलिप्त राहणारा भारत, स्वीडन, स्वित्झर्लंड इ. अलिप्तवादी राष्ट्रे जगात शांतता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न करताना दिसतात. लष्करीदृष्टया ह्या देशांना महत्त्वाचे स्थान आहे. आंतरराष्ट्रीय परिषदांवर सर्व प्रश्न सोडवण्यासाठी नवे मार्ग अवलंबिले जात आहेत. केवळ आंतरराष्ट्रीय परिषदांवर सर्व प्रश्न न सोपविता, काही महत्त्वाच्या प्रश्नांसाठी राष्टप्रमुखांच्या बैठका घेण्याचा मार्गही हल्ली अवलंबिण्यात येतो.

भारत आणि रशियाचे संबंध दृढच राहतील - रशिया आणि भारत हे एकमेकांचे जुने सहकारी असून त्यांचे परस्पर संबंध हे उभय राष्ट्रांच्या दक्षिण आशियाविषयक धोरणाचा महत्त्वाचा भाग आहेत. त्यामुळे चीनशी रशियाची वाढती जवळीक अथवा भारत आणि अमेरिका यांचे वाढते सहकार्य याचा या द्विराष्ट्रीय संबंधांवर कोणताही परिणाम होणार नाही; असा विश्वास परराष्ट्रीय विभागाच्या वरिष्ठ सूत्रांनी व्यक्त केला. रशियाचे चीनबरोबर आणि भारताचे अमेरिके बरोबर संबंध अधिक दृढ करण्याचे प्रयत्न असले तरीही भारत आणि रशिया यांचे परस्परसंबध पूर्वीपासूनच दृढ आहेत. या दोन देशांमध्ये सातत्याने विविध पातळयावर सुसंवाद सुरू असून त्यामधून जागतिक राजकारणात परस्परांना सहकार्य करण्यासाठी पावले उचलली जात आहे. विशेषतः आशियामधील रशियाच्या हितसंबंधांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिने भारताशी सलोख्याचे संबंध ठेवणे त्यांना अनिवार्य असून त्याची त्यांनाही सुस्पष्ट जाणीव आहे असे या सूत्रांनी सांगितले. चीन आणि रशियाची कितीही जवळीक वाढली अथवा रशियाने पाकिस्तानला शस्त्रपुरवठा केला तरी भारताला रशियाने यापूर्वीच दिलेल्या वचनापासून त्यांना दुर जाता येणार नाही. रशियाने सध्या पाकिस्तानला शस्त्रपुरवठा करणे हा त्या दोन राष्ट्रांमधील 'व्यवहार' आहे.

चीन आणि भारताचे संबंध:- कोमिंगटॉग या चीनच्या सत्ताधारी राष्ट्रीय पक्षाचे नेते चँग - काई शेख यांची सत्ता माओ-त्से-तुंग यांच्या नेतृत्वाखाली कम्युनिस्ट फौजांनी पूर्णतः उलथली (१९४८-१९४९) व एका सरंजामशाहीचा शेवट झाला. त्यामुळे आता चीनमधील अंतर्गत परिस्थिती सुधारेल व चिनी जनतेला सुखा समाधानाचे दिवस येतील, या भोळसट समजुतीला अनुसरून आपण चीनला केवळ मान्यताच दिली नाही, तर संयुक्त राष्ट्रसंघात जुन्या राष्ट्रवादी चीनच्या सुरक्षा परिषदेच्या वाटयाची जागा कम्युनिस्ट चीनला मिळावी, असा आग्रह आपण कम्युनिस्ट चीनकडून फारशी आग्रहाची विनंती नसतानाही केला. ही जागा साध्यासुध्या सदस्याची नव्हती तर नकाराधिकाराचा (व्होटोचा) अधिकार असलेल्या महाशक्तीची होती! तरीही भारताने चीनसाठी एवढा आग्रह केला.

विकसित व विकसनशील देशांच्या धोरणांचा भारताच्या हितसंबंधावर होणारा परिणाम. उदा. अमेरिका - इमिग्रेशन विधेयक. एच १ ई व्हिसा. बौद्धिक संपदा अधिकार याबाबतची धोरणे. तसेच सौदी अरेबिया, चीन, इ. देशांच्या देशांतर्गत धोरणे भारतावर परिणाम करतात. विविध देशांमध्ये वास्तव्यास असणारे परदेशस्थ भारतीय नागरिक यासंबंधीच्या ओसीआय, पीआयओ , अनिवासी भारतीय, नागरिकत्वा संबंधीचे मुद्दे इ.

भारताचे द्विपक्षीय संबंधः भारताचे जपान, रशिया, अमेरिका, जर्मनी, फ्रान्स, ब्रिटन, आदी देशांबरोबरचा संबंध भारताच्या ऊर्जा सुरक्षिततेसाठी आहे.

पश्चिम आशिया आणि मध्य आशिया या प्रदेशातील देशांसोबतचे संबंध:- भारताच्या प्रादेशिक गटांबरोबर असलेल्या संबंधामध्ये सार्क, इब्सा, ब्रिक्स, बिम्स्टेक, असियान आदी प्रादेशिक गटांसोबतचे संबंध, जागतिक व्यापार संघटना, जी-२०, संयुक्त राष्ट्रसंघ, एशियन डेव्हलपमेंट बँक, ईस्ट एशिया समीट, अॅपेक ओईसीडी नाटो आदी आंतरराष्ट्रीय गटांसोबतचे संबंध, उपरोक्त संबंध, सीमावाद, बौद्धिक संपदा अधिकार, जागतिक पर्यावरणीय वाटाघाटी, व्यापारविषयक वाटाघाटी व विवाद, दहशतवादाशी सामना, संरक्षण व सुरक्षाविषयक करार, जागतिक शांतता. या संदर्भात भारत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. तरीही भारताला या पुढील काळात अधिक सावधपणे पुढील वाटचाल करावी लागेल असे सद्य परिस्थितीवरून सांगावेसे वाटते.

**– वैशाली संजय वाकचौरे**
टी.वाय.बी.एस्सी

# स्त्री – भ्रूण हत्या

**''हृदयाच्या सुंदर बागेत**
**प्रेमाच्या सुंदर वेलीवर**
**फुलाफुलांत फुललेले पुष्प**
**म्हणजेच स्त्री होय''**

स्त्री-भ्रूण हत्येसारख्या निर्दयी आणि लांच्छनास्पद प्रकाराने आपल्या समजाचा सुसंस्कृत पणाचा बुरखा केव्हाच फाटलाय. समाजसेवी संघटना, सरकार व इतर काही माध्यमातून या प्रकाराला आळा घालण्यासाठी सज्ज असल्याचा आवाज उठतोय. मुळात हा प्रकार १०० टक्के केवळ डॉक्टरांमुळेच होतोय. कारण गर्भलिंग तपासणे हे इतर कोणालाही अशक्य आहे. गरोदरपणातच काही तपासण्या करून, गर्भाला जन्मतः असणाऱ्या काही व्याधींपासून गर्भाची सुटका करण्यासाठी ज्या तंत्रज्ञानाचा शोध लावल्यावर मानवजातीची मान उंचावली होती, तीच मान केवळ तो गर्भ एका स्त्रीचा असल्यामुळे आणि त्याच तंत्रज्ञानाचा वापर करून नष्ट केल्यामुळे शरमेने किती झुकली आहे याची कल्पनाही करवत नाही.

स्त्री-भ्रूणहत्या हा विचार करणारा कोणी एक नाही, हा विचार कोणा एकाकडून तडीस जात नाही.'मुलगी नको' या विचाराने ग्रस्त आणि त्रस्त झालेला पिता. गर्भपात करून घेणारी माता. गर्भपात करणारा भारतीय डॉक्टर. हे प्रकार रोखण्यासाठी नेमलेली शासकीय यंत्रणा. अशा प्रकारात जे लोक सापडतात,त्या लोकांना पाठिंबा देणारे सरकारी दलाल व हे सगळं उघडया डोळ्यांनी पाहून, वृत्तपत्रातून वाचून आणि टी.व्ही. वर पाहूनदेखील थोडेही गरम न होणारे पराकोटीचे थंड रक्त धमन्यातून बाळगणारे आम्ही हे सारे याचेच घटक आहोत! स्त्री-भ्रूणहत्ये विरोधी चळवळ ही केवळ कोणत्याही एकाच घटकाला जबाबदार धरून यशस्वी करता येणार नाही. एखादया डॉक्टरला पकडून किंवा त्यांची मशीन सील करून काय होणार

आहे? आम्ही आमच्या समाजातून या विचाराला जो पर्यंत हद्दपार करीत नाहीत, स्त्रीला सन्मान देत नाही, मुलींची जोपासना करीत नाही, स्त्रीच्या सुरक्षेसाठी खवळून उठत नाही, स्त्रीवर अत्याचार करायचे थांबत नाही, जोपर्यंत लोक स्वतःच्या मनाशी ही खूण गाठ घट्ट बांधत नाहीत, सन्मान होण्याकरीता स्त्रीला कोणताही दबाव-जबरदस्ती अथवा आमिष वापरणार नाही,तोपर्यंत स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यात कुणालाच यश येणे कठीण आहे.

शतकानुशतकांपासून स्त्री-भ्रूणहत्येसारख्या विकट प्रकाराने समाजाला जखडून ठेवले आहे. आजही मुली 'सुरक्षित' नाहीत. त्यांना त्यांचे हक्क तरी कुठे आहेत? ५०% आरक्षण फक्त कागदावर आहे. खेडयात पहा सरपंचबाईंचा नवराच सगळा कारभार पाहत असतो. एकट्या स्त्रीकडे समाज कोणत्या नजरेने पाहतोय? स्त्री अधिकारी असलेल्या तिच्या हाताखाली काम करणारी पुरूष मंडळी कशी वागताहेत? कोणत्याही प्रकारच्या अडचणीत असलेल्या एकट्या स्त्रीला निरपेक्ष वृत्तीने मदत करणारे कुणी महाभाग आहेत काय? ही चालू शतकातील स्थिती डोळ्यांनी पाहून कोणाही सामान्य माणसाला ती सहन करावी लागते परंतु स्त्री-भ्रूण हत्यासारखे पाप होताना त्या गर्भातील मुलीच्या आत्म्याला काय वाटत असेल? त्या मुलीच्या मनातील वेदना समजून घेण्याचा कुणी प्रयत्न केलाय का? ती चिमुरडी तिच्या आईला एकच विनवणी करीत असते.

**"जन्माला येण्याआधी,**
**का मारण्याची घाई**
**या लहानग्या जीवाला**
**विसरू नको ग आई."**

**– उर्मिला संभाजी घोगरे**
एफ.वाय.बी.कॉम

# बाप

आई घराचं मांगल्य असते तर बाप घराचं अस्तित्व आहे. पण या घराच्या अस्तित्वाला खरंच आम्ही कधी समजून घेतलय का? बापाला जास्त महत्त्व असूनही त्याबद्दल जास्त लिहिलं जात नाही, बोललं जात नाही. कोणताही व्याख्याता आई विषयीच बोलतो. संत महात्म्यांनी आईचेच गोडवे गाईले. लेखकांनी, कवींनी आईचेच कौतुक केले. चित्रपट तयार झाले तेही आईचेच. मोठमोठे पुरस्कार दिले जातात तेही आईच्या नावाने. चांगल्या गोष्टींना उपमा दिली जाते तीही आईचीच. पण बापाबद्दल काय? काही लोकांनी बाप रेखाटला पण तामसी, व्यसनी, मारझोड करणारा. समाजात एक - दोन टक्के बाप असेही असतील पण चांगल्या बापाबद्दल काय?

आईकडे अश्रूंचे पाट असतात, पण बापाकडे संयमाचे घाट असतात. आई रडून मोकळी होते पण सांत्वन बापालाच करावे लागते. रोजच्या जेवणाची सोय करणारी आई आपल्या लक्षात राहते. पण आयुष्यच्या शिदोरीची सोय करणारा बाप आपण सहज विसरतो. सर्वांसमोर आई मोकळ्या मनाने रडू शकते पण बापाला रडता येत नाही. म्हणून बाप रात्री उशित तोंड खुपसून मुसमुसतो.

जिजाबाईंनी शिवबा घडविला असे अवश्य म्हणावे, पण त्याच बरोबर शहाजी राजांची झालेली ओढाताण विसरून चालणार नाही. देवकीचे यशोदेचे कौतुक अवश्य करावे, पण यमुनेच्या पुरातून मुलाला (कृष्णाला) डोक्यावर घेवून जाणाऱ्या वसुदेवाला विसरून चालणार नाही. कौसल्याचं रामाविषयी प्रेम अवश्य सांगावं पण पुत्र वियोगाने मरणाऱ्या दशरथाला विसरून चालणार नाही.

बापाचं मुलांवरती किती प्रेम असतं हे बाप झाल्याशिवाय कळत नसतं. घरातील आजारी व्यक्तींना दवाखान्यात नेतात पण आपण स्वतः आजारी पडले तर दवाखान्यात जात नाही. ते आजाराला घाबरत नाही पण डॉक्टर एखादा महिना आराम करण्यास सांगतील याची त्याला भिती वाटते. कारण मुलीचं लग्न, मुलाचे शिक्षण बाकी असते.

छोट्या संकटा करिता आई असते तर मोठ्या संकटा करिता बाप असतो. हाताला चटका लागला, ठेच लागली तर आई ग! शब्द बाहेर पडतो पण एखादा रस्ता ओलांडताना एखादी गाडी अचानक आली तर बाप रे! शब्द बाहेर पडतो.

कोणत्याही परीक्षेचा निकाल लागल्यावर आई जवळची वाटते. कारण ती जवळ घेते, कवटाळते, कौतुक करते पण गुपचूप जाऊन पेढे आणणारा बाप आपण का विसरतो? प्रसूती काळात आईच्या संवेदनाची जाणीव सर्व जण सांगतात पण दवाखान्याच्या आवारात पत्नीसह बाळाची सुखरूप सुटका व्हावी या करिता देवाला मनापासून प्रार्थना करणारा बाप का कळत नाही? कोणत्याही मंगलप्रसंगी घरातील सर्व मंडळी जातात पण अंत्यविधी प्रसंगी बापालाच जावं लागतं. मुलांच्या जन्मापासून मोठे होईपर्यंत आई चांगले संस्कार करते पण मुलांना चांगले वळण लागावे म्हणुन धडपडणारा बाप असतो. म्हणुन घरात बाप असणे महत्त्वाचे असते या रूपाने बापाची जाणीव ठेवून सेवा करावी हीच अपेक्षा.

**– आश्विनी सुरेश मंचरे**
एफ.वाय.बी.कॉम

# गुगलची माहिती

गुगल (किंवा गुगल इनकॉर्पोरेटेड) (इंग्लिशः google, नॅसडॅक : GOOG ) नावाची अमेरिकन कंपनी गुगल शोधयंत्र, ऑर्कुट, युटयूब, ॲडसेन्स व इतर अनेक सेवा पुरवते.

ब्रीदवाक्य :- डोन्ट बी इवील
प्रकार :- सार्वजनिक कंपनी
उद्योगक्षेत्र :- इंटरनेट, संगणक, सॉफ्टवेर
स्थापना :- मेन्लो पार्क, कॅलिफोर्निया
७ सप्टेंबर १९९८
मुख्यालय :- माउंटन व्हयु, कॅलिफोर्निया, अमेरिका
महत्त्वाच्या व्यक्ती :- सुंदर पिचाई, मुख्य कार्यकारी अधिकारी संचालक, सर्जी ब्रिन, सहसंस्थापक, तंत्रज्ञान अध्यक्ष
महसुली उत्पन्न :- १०,६०४ अब्ज अमेरिकन डॉलर (२००६)
संकेतस्थळ :-www.google.com

## गुगल कंपनी विशेपत:

आंतरजाल-शोध व आंतरजाल-जाहिराती या क्षेत्रात सेवा पुरविते. डिसेंबर ३१-२००६ रोजी गुगल मध्ये १०,६७४ लोक काम करीत होते.

एरिक शिमट हे गुगलचे मुख्य कार्यकार अधिकारी आहेत. गुगल हे नाव google या मूळ इंग्रजी नावावरून आले आहे. एकावर शंभर शुन्य ह्या मोठया संख्येने google हे नाव आहे. या गोष्टी तुम्हाला माहित आहेत का? इंटरनेट वरील आपल्याला हवी असलेली माहिती आपल्याला गुगल शोधून देऊ शकतो. हे सगळयांना माहितीच आहे. पण गुगल वर कसं सर्च करावं म्हणजे गुगल आपल्याला हवी असलेली माहिती देईल हे सुद्धा माहित असणे महत्त्वाचे असते. गुगल वर सर्च करण्याच्या बाबतीत बऱ्याच जणांचा समज चुकीचा असतो. सुरुवातीला हे आपल्याला समजून घ्यायला हवे की गुगल हे एक ॲप्लिकेशन आहे. अर्थात एक निर्जीव गोष्ट आहे. गुगल एखादी व्यक्ती नाही की आपल्याला जी माहिती हवी आहे ते आपल्याकडून नीट समजून घेईल आणि नंतर आपल्याला हवी असलेली माहिती पुरवेल.

गुगल तुम्ही दिलेल्या शब्दावरून तुम्हाला हवी असलेली गोष्ट सर्च करतो. गुगल कोणी माणूस नसल्याने त्याला व्याकरण कळत नाही. गुगल हा लोक प्रिय ॲप आहे.

**– पूनम शेळके**
एफ.वाय.बी.सी.एस

# शेतकरी कर्जमाफी

भारत देश हा कृषिप्रधान आहे. देशातील एकुण लोकसंख्येपैकी सूमारे ६०% लोकसंख्या शेतीवर अबलंबून आहे. त्यामुळे देशाचा विकास करायचा असेल तर शेती क्षेत्राला प्राधान्य देणे गरजेचे आहे. आपल्या देशात मात्र शेती व शेतकरी या दोन्ही गोष्टीकडे राज्यकर्ते फारसे लक्ष देत नाही. परिणामी देशातील शेती व शेतकरी यांची दुरावस्था झाली आहे. आपल्या दुःखात कोणीच सहभागी होत नाही या भावनेने त्याने आत्महत्या करण्याचा मार्ग स्वीकारलेला आहे. गेल्या वर्षभरामध्ये महाराष्ट्रासह संपूर्ण देशात अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे रोज वर्तमानपत्रात येत आहे. सरकार केवळ आत्महत्या केलेल्या व्यक्तीच्या कुटुंबाला सहानभूतीने तुटपुंजी रक्कम देऊन सांत्वन करीत आहे परंतु त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना करताना दिसत नाही. त्यासाठी शेतकरी समस्यांच्या मुळाशी जाऊन शोध घेणे आवश्यक आहे तरच या समस्या सुटू शकतील.

आज आपण महाराष्ट्रापुरता विचार केला तर शेतीशी निगडित अनेक प्रश्न निर्माण होतात. येथील हवामान शेतीला पोषक असले तरी ते लहरी स्वरूपाचे आहे. शेतात उत्तम पीक आले असता अचानक गारपीठ, वादळ, रोगराई अशा अस्मानी संकटामुळे हाता तोंडाशी आलेल्या पिकाची धुळधाण होते. याबाबत सरकारकडून फारशी मदत मिळत नाही. परिणामी अशा संकटामुळे शेतकरी कर्जबाजारी होतो. त्याला पुन्हा शेती उभी करण्यासाठी बँकेकडून ताबडतोब कर्ज मिळत नाही. त्यामुळे दामदूप्पट दराने खाजगी सावकरांकडून कर्ज काढावे लागते. शेतीतून पीक आल्यावर मालाला बाजारभाव मिळत नाही. त्यामुळे कांदा, टोमॅटो, भाजीपाला अशी पिके भर रस्त्यावर फेकून देऊन त्याला घराची वाट धरावी लागते. जोडधंदा म्हणुन केलेल्या दुधाच्या धंदयाचाही बऱ्याचदा असाच अनुभव शेतकऱ्यांना येतो.

शेतीमध्ये झालेले हे नुकसान भरून काढण्यासाठी त्याला खऱ्या अर्थाने मदतीची गरज असते. असे असताना त्याला वीज वापरल्याबद्दल वीज बील येते.त्यातच ट्रान्सफार्मर जळाला की वीज बील भरल्याशिवाय तो जोडला जात नाही. त्यातही त्याच्या दैनंदिन समस्या असतातच. शेतीसाठी बियाणे, खते, मजूर, मुलांचे शिक्षण, आरोग्य, लग्न, सण-उत्सव, अशा अनेक समस्यामुळे त्याचा मानसिक ताण प्रचंड वाढतो. या शिवाय येथील लहरी हवमानाप्रमाणेच सतत पडणारा दुष्काळ हा त्याला मेटाकुटीला आणतो. त्यामुळे त्याचे कर्ज वाढत जाते. ते कर्ज वेळेत न फेडल्यामुळे त्याला अनेक ठिकाणी सर्वासमक्ष अपमानाला सामोरे जावे लागते.

शेतकऱ्यांच्या वरील समस्या बरोबरच आणखी काही अडचणी आहेत. त्यामध्ये शेतीचे होणारे विभाजन ही एक समस्या आहे. दिवसेंदिवस प्रत्येक माणसागणिक शेतीचे असे क्षेत्र घटत आहे. त्यामुळे बैल पाळणे किंवा ट्रॅक्टर घेणे अवघड झाले आहे.तसेच निरक्षरता व अज्ञान ही एक गंभीर समस्या आहे. अलिकडच्या काळात प्रदूषित हवेमुळे कोणताही माल औषध फवारणी केल्याशिवाय येत नाही. शेतकरी हा मोठया प्रमाणात निरक्षर तसेच जुजबी शिक्षण घेतलेला असल्यामुळे त्याचे सर्व बाजूने शोषण होते. म्हणून सरकारने अशा शेतकऱ्यांना मानधन देऊन त्याला शेती विषयीचे ज्ञान तज्ज्ञ व्यक्तींकडून देणे गरजेचे आहे. परंतु बऱ्याचदा अशा कार्यशाळा कागदोपत्री होतात अथवा श्रीमंत शेतकरीच त्याचा फायदा घेतात. या शिवाय शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी त्याला मोठया प्रमाणात खर्च करावा लागतो. त्यावेळी त्याचे उत्पन्न किती आहे याचा विचार फारसा कोणी करत नाही. त्यामुळे प्रसंगी आपली जमीनही तो विकून टाकतो. याबरोबरच सरकारी धोरणेही शेतकऱ्याला अडचणीत आणतात.

या सर्व गोष्टीचा विचार केला तर महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्या का थांबत नाही हे लक्षात येईल. या गंभीर गोष्टीचा विचार शासनाच्या लक्षात आणण्यासाठी अनेक शेतकऱ्यांनी आंदोलने केली. अखेर सरकारला नमते घेऊन कर्जमाफी करण्यास भाग पाडले. परंतु तरीही शेतकरी आजही आत्महत्या करीत आहेत. यावर तात्पुरता इलाज म्हणुन सरकारने शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी केली पाहिजे. ही कर्जमाफी केल्याने समस्या सुटणार नाही. त्यासाठी बाजारभावासह पाणी, वीज, मुलांचे शिक्षण, बी-बियाणे, आरोग्य या समस्यांचाही गंभीरपणे विचार केला पाहिजे. ज्याप्रमाणे मोठमोठया उद्योगधंदयाना कमी व्याजदरात कर्ज दिले जाते. त्याप्रमाणे सामुदायिक शेतीचा प्रयोग राबविता येईल का? याचाही विचार करणे आवश्यक आहे. अन्यथा भविष्यात येथील शेती व शेतकरी नष्ट झाल्याशिवाय राहणार नाही. त्याचे गंभीर परिणाम सर्वांनाच भोगावे लागतील असे मला वाटते.

**– आशा मदन मोरे**
टी.वाय.बी.कॉम

# एडवर्ड जेन्नर

इंग्लंड मधील ग्लुसस्टरशायर मधल्या बर्कली नावाच्या एका छोट्याशा गावात एडवर्ड जेन्नर यांचा जन्म १७ मे १७४९ रोजी झाला. एडवर्ड यांच्या वडिलांचे नाव स्टीफन जेन्नर हे होते. ते धर्मोपदेशक होते. बर्कलीजवळ त्यांच्या मालकीची बरीचशी जमीन होती. एडवर्ड मिळून एकूण आठ भावंडे होती. एडवर्ड सर्वात लहान होता. एडवर्ड ५ वर्षाचा असताना त्याची आई वारली. पुढे दोन महिन्यांनी वडीलही वारले. पुढे त्याचा सांभाळ त्याच्या दोन मोठया भावांनी व तीन बहिर्णीनी केला. त्याचा एक भाऊ स्टीफन वडिलांसारखा धर्मोपदेशक झाला. या वयातच एडवर्ड यांना वनस्पती व प्राणी यांचे अवशेष शोधण्याचा छंद जडला होता.

एडवर्ड आठ वर्षाचा असताना त्यांना बोर्डिंग स्कूलमध्ये दाखल केले. घरची परिस्थिती बेताची म्हणुनच अनाथ झालेल्या जेन्नर भावंडांनी हा निर्णय घेतला होता. काही कारणामुळे एडवर्डला त्याच्या भावंडांनी तेथून काढुन एका लहान खासगी शाळेत घातले. तेथे त्याने ग्रीक, लॅटिन याचबरोबर धार्मिक शिक्षणही घेतले. एडवर्ड यांची इच्छा डॉक्टर होण्याची होती. पण त्यावेळी डॉक्टर होण्यासाठी दुसऱ्या डॉक्टरच्या हाताखाली काम करता करता शिकणे हा एकच मार्ग होता. सर्जनचा साहाय्यक होण्यासाठी जेवढे हवे तेवढे शिक्षण एडवर्ड त्याचे झाले होते. त्याने प्रथम डॅनियस लुडलो यांच्या हाताखाली वयाच्या १४ व्या वर्षी कामाला सुरुवात केली व सात वर्षे काम केले. मग ते पुढे लंडनच्या सेंट जॉर्ज हॉस्पिटलमध्ये सुप्रसिद्ध सर्जन जॉन हंटर यांच्याकडे शिकायला गेले. हंटरचा त्याच्यावर लोभ जडला. शिक्षणपूर्ण झाल्यावर जेन्नर ग्लसेस्टर शायरला परत आला व त्याने प्रॅक्टिस सुरू केली.

त्यावेळी देवी रोग हा फार चिंतेचा विषय होता. एडवर्ड जेन्नरने याच विषयावर संशोधन करण्याचे ठरविले. जर्मनी देशातील गोवर रोगाने त्याचे लक्ष वेधून घेतले. हे गोवर मुलाला येऊन गेले की, पुन्हा आयुष्यात होत नाही. आणखी एका गोष्टीने त्यांचे लक्ष वेधून घेतले. जो माणूस देवीची लागण होऊन वाचतो त्याला पुन्हा देवी होत नाहीत. याचा अर्थ त्याने असा लावला की, अशा माणसाच्या शरीरात देवीच्या जंतूंचा बिमोड करण्याची शक्ती निर्माण होते.

त्या काळी इंग्लंडमधील पूर्वेकडचे लोक याचा फायदा घेत. ते देवीच्या फोडातली लस मुद्दाम शरीरात टोचीत. त्यामुळे सौम्य देवी येऊन जात व तो माणूस देवींना कायमचा अभेदय-इम्यून बने परंतु ही पद्धत सर्रास कामी येत नसे. कित्येक जण मरण पावत असत. ग्लेसेस्टर शायर मधल्या लोकांना माहिती होते की, गाईच्या देवीची लागण होऊन बरा झालेला माणूस असेल तर त्याला देवी येत नाहीत. जेन्नर ने या गाईच्या देवींवरच लक्ष केंद्रित करायचे ठरविले. त्याकाळी देवीमुळे होणारा प्रार्दुभाव इतका मोठा व प्रचंड होता की, जवळ-जवळ ६०% लोकांना देवीची लागण होत असे. लागण झालेल्या लोकांपैकी २०% लोक तर मृत्यूमुखी पडत असत. त्याचप्रमाणे चेहरा विद्रूप होऊन दृष्टीवर परिणाम होणे या सारख्या गोष्टी घडून येत.

देवी या रोगावर उपाय शोधण्याचा विचार करत असताना त्याच्या नजरेस एक गोष्ट पडली.गाईची धार काढणाऱ्या स्त्रियांना या रोगाची लागण झाली तरी त्यांच्यावर होणारा परिणाम खूपच कमी असे. या निरीक्षणावर विचार करताना त्याच्या डोक्यामध्ये अशी कल्पना आली की, गाईंना होणारा देवीचा प्रादुर्भाव आणि त्यांच्या संर्पकातील स्त्रियांना होत नसलेला प्रार्दुभाव यामध्ये काहीतरी रहस्य दडलेले असावे. गाईच्या संपर्कात आल्यामुळे स्त्रीयांना या रोगापासून बचाव करण्याची क्षमता प्राप्त होत असावी हे अनुमान तपासण्यासाठी त्याने एक धाडसी प्रयोग केला. गाईला झालेल्या देवीच्या व्रणातील स्त्राव त्याने एका १८ वर्षाच्या तरूणाच्या शरीरात टोचला. त्याचाच परिणाम असा झाला की, त्या तरूणाला देवीची लागण झाली नाही. असाच प्रयोग त्याने इतर २३ व्यक्तिंवर केला. त्यामध्येही समाधानकारक यश मिळाले. असे होऊन संशोधकांनी मात्र त्याचा शोध मान्य केला नाही. शेवटच्या प्रयोगात त्याने या चाचणीमध्ये आपल्या ११ महिन्याच्या मुलाचा सामावेश केला. त्याने सातत्याने केलेल्या या प्रयोगामुळे संशोधकांना त्याची दखल घ्यावी लागली. अखेर त्याचे अनुमान मान्य होऊन देवीच्या रोगांवर प्रतिबंध लस तयार झाली. इंग्रजीमधील vaccination हा शब्द vacca म्हणजे गाय या शब्दापासून तयार झालेला आहे. देवीच्या व्रणातील स्राव शरीरामध्ये टोचल्यामुळे मानवाची प्रतिष्ठा कमी होते असा आक्षेप घेण्यात आला. मात्र या रोगामुळे हजारो लोक मृत्यूमुखी पडतात या बाबत मात्र त्यांनी

आस्था दाखविली नाही. जेन्नर याची कल्पकता आणि त्याची धाडसी वृत्ती यामुळे हे वरदान प्राप्त झाले.

डॉक्टर जेन्नर यांच्या पद्धतशीर प्रयत्नांनी लसीकरणाची नवीन पद्धत अमलात आली. आधुनिक वैद्यकीय इतिहासात इ.स.१८०२ साली ब्रिटिश डॉक्टर एडवर्ड जेन्नर देवीच्या लसीचा शोध लावून त्याचा यशस्वी वापर केल्यामुळे तेथून देवी रोगाच्या निर्मूलनाच्या लढाईची सुरुवात मानतात. या देवीलसीमुळे इंग्लड पार्लमेंटने त्याचा गौरव केला व त्याला २००० पौडांचे बक्षिस दिले व रशियाच्या झारने त्याला सोन्याची अंगठी दिली. तसेच ऑक्सफर्ड विद्यापीठाने त्याला मानद पदवी दिली व नेपोलियनने त्याचा गौरव केला.

जेन्नर इ.स.१८२३ साली मरण पावला. तेव्हापासून या प्रकाराने अनेक रोगांवर नियंत्रण मिळविण्याचे उपाय शोधून काढण्यात शास्त्रज्ञांना यश मिळाले. डॉ. जोन्स साल्क याने पोलिओची लस शोधुन काढली. ती जेन्नरच्या तत्त्वावरच.

**– प्रा. बी.बी मताडे**
वनस्पतीशास्त्र विभाग

# विद्यार्थी करिअर

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत मारूतरावजी घुले पाटील महाविद्यालय अ.नगर २००९ पासुन पदवी स्तरावारील शिक्षणसाठी कार्यरत आहे. विद्यार्थ्याच्या दृष्टिने पदवी स्तरावरील शिक्षण हे फार महत्त्वाचे समजले जाते. कारण विद्यार्थ्याचे करिअर पदवी स्तरावर घडत असते. तसेच जीवनाचे ध्येय हे विशषेतः पदवी स्तरावर निश्चित होत असते. २१ व्या शतकात शिक्षणाचे अनेक मार्ग उपलब्ध आहेत. या अनेक मार्गातून आपले करिअर ठरविता आले पाहिजे. त्यासाठी ध्येय ठरविणे फार आवश्यक आहे. जर ध्येय नसेल तर विद्यार्थी यशस्वी होण्याचे प्रमाण कमी असते. म्हणजे असे होईल एस.टी.स्टॅण्डवर गेलो आहोत पण कुठे जायचे ते जर माहित नसेल तर बस येतील व जातील पण आपण कुठेच पोहचणार नाही. कारण स्वतःला कुठे पोहचायचे हे माहित नसते. ध्येय असेल तर त्या दिशेने मार्ग सापडत जातात. म्हणजेच ध्येय पक्के असेल तर विद्यार्थी यशस्वी होत असतो. करिअर निवडताना सर्वात महत्त्वाचे असते ती म्हणजे स्वतःची आवड. आपल्या आवडीचे क्षेत्र विद्यार्थ्यांनी निवडले पाहिजे.

विद्यार्थ्यांचे करिअर निवडताना आई वडिलांची भूमिका फार महत्त्वाची असते. आजच्या पालकांना असे वाटते की, माझ्या मुलाला जणू १०० टक्के मार्क पडले पाहिजे. हा लेख जर पालक वाचत असेल तर त्यांना मी आर्वजून सांगेन की सगळेच विद्यार्थी फार हुशार असू शकत नाही. प्रत्येक विद्यार्थ्याची बौध्दिक पातळी ही वेगवेगळी असते. तसेच प्रत्येकाची मानसिक क्षमता ही वेगळी असते. पण त्याचबरोबर प्रत्येकाकडे मात्र काहीतरी वेगळा गुणही असतो. हा गुण विद्यार्थ्याला, पालकाला किंवा शिक्षकांना ओळखता आला पाहिजे. या गुणाची त्यांनी पारख केली व त्या प्रमाणे त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तर करिअर घडवण्यासाठी उपयुक्त ठरू शकते.

सध्या तर जो तो आयआयटी कोचिंग वा नीट कोचिंग क्लासेसची गगनाला भिडलेली फी देण्याच्या धावपळीत मग्न झालेला आहे. अशा शिकवणी वर्गावर लाखो रूपये खर्च करताना ज्या संस्थांमध्ये प्रवेश मिळवायचा आहे; तेथील जागा तरी किती आहेत याचा विचार पालकांनी करणे आवश्यक आहे. असा विचार करून आपल्या मुलाची बौध्दिक मर्यादा तसेच स्वतःच्या आर्थिक मर्यादा ओळखायला हव्यात. तसे झाले तर पालक आणि विद्यार्थ्याच्या हिताचे ठरू शकते.

सध्या M.P.S.C व U.P.S.C तसेच अन्य स्पर्धा परीक्षा करणाऱ्या विद्यार्थ्याची संख्या वाढती आहे. करिअर साठी हे क्षेत्र सर्वोकृष्ट आहे. या क्षेत्रातून पत, प्रतिष्ठा सर्व काही मिळते. पण M.P.S.C साठी जागा मर्यादित असतात व उमेदवारांची संख्या हि खूप मोठी असते. त्यामुळे कष्ट करण्याची तयारी व अभ्यासात सातत्य असणारे विद्यार्थी यशस्वी होतात. त्यामुळे हे क्षेत्र निवडताना विद्यार्थ्याने मनाशी पक्का विचार करूनच हे क्षेत्र निवडावे नाहीतर जीवनाचे

महत्त्वाचे वर्ष व पैसा वाया गेल्या शिवाय राहणार नाही. तसेच करिअर विषय असणाऱ्या आकर्षक जाहिरातीपासून विद्यार्थ्यांनी दूर राहिले पाहिजे.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे करिअर घडविताना सर्वात मोठा अडथळा कोणता असेल तर तो म्हणजे मोबाईल व त्यात असणारे फोर जी इंटरनेट. मोबाईलवर विद्यार्थ्यांचे रोज ४ ते ५ तास सहज निघून जातात. मोबाईल वापरू नये असे मी म्हणणार नाही. ती काळाची गरज आहे. पण अतिरिक्त वापर टाळला पाहिजे. विद्यार्थ्यांनी नियमित चांगले वर्तमान पत्र जसे- लोकसत्ता, सकाळ, महाराष्ट्र टाईम्स, The Indian Express मासिके तसेच अवांतर वाचन केले पाहिजे. यातून चांगले विचार समजत जातात व करिअरसाठी हे उपयुक्त ठरू शकते.

महाविद्यालयीन शिक्षणाबरोबर एखादी कला, व्यवसाय, गायन, वादन, पेंटींग, चित्रकार, गीतकार, लेखक, किर्तनकार, खेळ, संगीत, कवी, वक्तृत्व अशा अनेक क्षेत्रात करिअर होऊ शकते. क्षेत्र कोणतेही असो त्यात कष्ट करावे लागतात. त्यात अपयश हे येत असते. अपयश आले किंवा पेपर अवघड गेला तर काही विद्यार्थी आत्महत्या सारखे टोकाचे पाऊल उचलतात. विद्यार्थ्यांनी असा विचार करण्याअगोदर आपले आई वडील व कुटुंब यांचा विचार केला पाहिजे. जीवनात यश-अपयश हे येतच असते. जगात ज्या व्यक्ती महान झाल्या आहेत; त्या सर्व व्यक्तींनी अपयशाचा सामना केला आहे. उदाहरण सांगायचे झाले तर अमिताभ बच्चन यांचा आवाज चांगला नाही म्हणून त्यांना रेडिओच्या नोकरी वरून काढून टाकले होते. पण तोच आवाज त्यांची सर्वात मोठी ताकत आहे. तेव्हा अपयशाच्या मार्गातून यशाचा मार्ग निघत असतो. विद्यार्थ्यांनी आपले आवडीच क्षेत्र निवडावे व निवडलेल्या क्षेत्रात करिअर करताना त्या क्षेत्राशी प्रामाणिक राहून कष्ट केले तर यश हे मिळत असते. यावर हिंदी कवी हरिवंशरय बच्चन यांच्या कवितेतील एक सुंदर पद आहे.

नन्हीं चींटी जब दाना लेकर चलती है,  
चढती दीवारों पर, सौ बार फिसलती है।  
मन का विश्वास रगों में साहस भरता है,  
चढकर गिरना, गिरकर चढना न अखरता है।  
आखिर उसकी मेहनत बेकार नही होती,  
कोशिश करने वालों की कभी हार नही होती।।

महाविद्यालयात कला, वाणिज्य, विज्ञान व संगणक विज्ञान या शाखेअंतर्गत महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय डॉ.टी.एम वराट यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व प्राध्यापक विद्यार्थ्यांच्या करिअरसाठी अविरत परिश्रत घेत आहेत. यासाठी आपणा सर्वांचे सहकार्य व मार्गदर्शन तितकेच महत्त्वाचे आहे असे मनापासून वाटते.

**– प्रा. के.बी. ताके**  
वाणिज्य शाखा

# A Call For-Equal Rights For Women.

'India' :- a developing nation where people of various caste, culture, religion reside in with certain peace and harmony. The traditions followed by them by are since ages. so, it is difficult for any one to make a drastic change in it . if a person tries to make a change or divert peoples mind to the modern generation thinking; he/she gets a bad time in the society with numerous taunts passed on.

'God - the almighty' has created this beautiful universe with have the living as well as non living things depending upon various life cycles. Male and female are said to be the essential elements which play a vital role in continuation of such cycles.

While creating the humans no discrimination was made by god in the same way we don't have any right to create it. In spite of that the discrimination between men and women is given more importance. Man is respected but a woman is treated as slave. According to the mentality of people men are stronger, they can work for hours, earn money & feed their family but women are just meant for cooking food and giving birth to children.

The efforts taken by Savitribai Phule and Jotirao Phule have slowly change the mind set of people. Girls have started becoming educated individuals. It is rightly said that when a boy is educated only be himself is said to be educated but when girl is educated the whole family educated. This small change affects the behaviour of the society at large.

Department of chemistry has well equipped laboratories. In academic year 2017-18 fifty four students has selected, chemistry as special subject because of its industrial importance as well as major subject in science faculty.

In academic year 2017-18 department of chemistry organized two day's state level seminar on "Recent trend's In chemistry & It's applications" on 12th & 13th February. The seminar was sponsard by university Prin. Dr. B.H. Zaware, Prin. Dr. D.D. Patil, Prin. Dr. S.R. Kuchekar, Dr. A.E. Athare, Dr. S.R. Thopate, Dr. R.M. Naval, Dr. M.E. Navgire was invited as Resource person's in seminar. The state level seminar wasvery much useful for participated teacher's and student's of the chemistry.

Department has also Organized Guest lecture of Prof. Mrs. M.R.Sawant she has given lecture on "Carrier Opportunities in chemistry"

The Department has arranged educational excurtion for practical knowledge of chemistry subject to the Student. There are four teaching faculty member in the department.

**Academic Activity of the Faculty -**

1) **Prof. A.U. Dongare -** (Msc -NET)
   a) Participated in National Leval Conference on "Bioinspired Material in Science" held at New Arts, Commerce & Science College, A.Nagar.
   b) Worked as Co-ordinator for two Day's state level seminar Organized by college.
2) **Prof. A.N.Sangale -** (Msc.Bed)
   a) Visited at IMS College A.Nagar for "Fest-Dertech" on 23rd August 2017
   b) Worked as Organising secretory for two day's state level seminar organized by college.
3) **Prof. B.S. Pawale -** (Msc)
   a) Invited as a Judge for competition 'Rangoli' at Ekta college, A.Nagar
   b) Participeted In NSS ETC training programm 138th batch as programme officer at Ahmednagar college
   c) Actively participated in two day's state level seminar Organised by college.
4) **Prof. P.A.Saindanshiv -** (Msc)
   a) Actively participated two day's state level seminar Organised by College.

**Prof. A.U. Dongare**
Head, Dept. of Chemistry

# DEPARTMENT OF BOTANY

The Botany department is one of the important department in college. For the academic development of students the department organized various programmes such as educational excusion and guest lectures under the quality improvement scheme.

In academic year 2017-18 for the first year of BSc 144 students choose Botany as a general subject and in S.Y. BSc 69 Students select the same subjec.The results of the department are satisfactory. In the academic and extra co curricular activity of the college department students has participated actively

The following activities has carried out by the department.

**1) Educational Tour -**

The Educational Tour of S.Y.BSc Class was arranged on 22nd Jan. 2018 for the field work and practical knowledge of various Botanical plants and visiting places of Botanical importance.

The route of the tour was Devgad, Ghrushneshwar, Verul, Bhadramaruti, Mhaismal, Siddharth Garden, Bibi-ka Maqbara, Ahmednagar During the tour students has collected lot of information of various plants and photograph for their report.

**2) Guest Lecture -**

During this academic year the department has organised guest lecture

Prof. B.A.Karle from New Arts Commerce and Science College, Ahmednagar invited for guest lecture She has deliverd lecture on "importance of Botany and Employment Opportunities"

**3) National Science day (28th Feb. 2018)**

The department has organized National Science Day on this occasion Honorable Principal Dr. T.M. Varat given contents students and appeal students to focuse on research.

**4) Academic Activities**

Prof.B.B.Matade Participated in national Conference on" Role microorganism in agriculture and plant science for sustainable Development"at Smt. S.K. Gandhi Art Amolak Science and P.H. Gandhi Commerce College, Kada, Dist. Beed on 10/12/2018

**Prof. B.B. Matade**

Head, Department of Botany

# DEPARTMENT OF ZOOLOGY

In academic year 2017-18 for the first year of BSc 95 students choose Zoology as a optional subject and in S.Y.B.Sc 51 Students Select the same subject. The results of the department are satisfactory. In the academic and extra-co Curricular activity of the college department students has participated actively. The following activities has carried out by the department.

1) **Educational Tour-**

The Educational Tour of S.Y.B.Sc class was arranged on 22nd Jan 2018 for the field work, practical knowledge of various animals and visiting places of Zoological importance.

The route of the tour was Devgad, Ghrushneswar, Verul, Bhadramaruti, Mhaismal, Siddharth Garden, Ahmednagar. During the tour students has collected lot of information of Various animals and photograph for their report.

**2) National Science day (28th Feb. 2018)**

The department has organized National science day on this occasion. Honorable principal Dr. T.M. Varat given counser student and appeal students to focuse on research.

**-Prof. K.D. Jagtap**
Head, Dept.of Zoology

# DEPARTMENT OF PHYSICS

Physics department is one of the Important department of this college & has been running successfully on the path of progress. In every Academic year, the result of the department are satisfactory and the students has passed with higher marks in the subject.

There are two teaching faculty member's in the department.

1) **Prof.S.B. Doiphode**

a) Participated in International level conference held at K.T.H.M. College Nashik on the subject "Advances In Functional Materials (I CAFM - 2018) on 12th and 13th January 2018.

b) Participated in two days state level seminar on subject "Recent Trends In Smart Materials" held at Dhokeshwar College, Takli - Dhokeswar on 24th and 25the January 2018.

2) **Prof. D.R.Gaikwad**

participated in two dys's state level seminar on subject" Recent Trends In smart Materials" held at Dhokeswar College, Takli -Dhokeswar on 24th and 25th Jan 2018

**Academic Activites -**

The student's of F.Y.B.Sc, Vishun Phalane, Gaurav Sathe and Sahil Thokal are Participated in " Zonal Level Avishkar" On 12th Dece 2018 at Radhabai Kale College, Ahmednagar

The Students of F.Y.B.Sc Class Dhale Kartikesh and smitesh Gadge Presented a project on " Sundile " and " Mangetic Electricity. The Future of Electricity" and warded IInd prise in GMRT Science day Exhibition held on 28th Feb. and 1st March 2018, at the 'GMRT' observatory, Khodad, Tal. Junner. Dist. Pune.

For the improvement of students personality and to face the challanges of competative world, we arrange guest lectures, Educational tour's and celebrate National Science day.

**- Prof. S.B.Doiphode**
Head, Deparment of Physics

## DEPARTMENT OF MATHEMATICS

Mathematics is one of the most important subjects in science faculty. Today there is a bright future for Mathematics Student. Our Mathematics department always tries to encourage students to take Mathematics and learn Mathematics with great interest.Generally students avoid to take Mathematics, ,because they suppose that Mathematics is hard subject. But I feel proud to say that there is exactly opposite position in Marutraoji Ghule Patil College. Every year we find there is increment in number of students in Mathematics. Our students say," We feel easy to make our career in Mathematics." We teach Mathematics basically and in friendly atmosphere, due to this students take great interest in Mathematics. Dear students if you are ready to work hard you are always welcome to our Mathematics Department. I am sure you have a great opportunity in your hand to make a career in Mathematics.

Department of Mathematics.

**Prof. Khan N.F.**
(M.Sc. Maths. B.Ed)

**Prof. Khan F.B.**
(M.Sc. Maths, M.A. Eng.)

# ग्रंथालय विभाग


ग्रंथालय हे महाविद्यालयाचा आत्मा असून ग्रंथालयामुळेच विद्यार्थी व शिक्षकांच्या ज्ञानात वाढ होते. तसेच त्यांचा बौध्दिक स्तर उंचावतो. त्यामुळे महाविद्यालयातील ग्रंथालयात विद्यार्थी व प्राध्यापकांसाठी पाठ्यपुस्तके, ग्रंथ, संदर्भग्रंथ, अवांतर वाचन यासाठी प्रत्येक वर्षी नवनवीन पुस्तकांची खरेदी केली जाते. याशिवाय विद्यार्थ्यांना व शिक्षकांना शालाबाह्य ज्ञान मिळण्यासाठी स्पर्धा परीक्षात्मक पुस्तके, मासिके, नियतकालिके, संशोधन पत्रिका, अशा विविध स्वरूपाची पुस्तके महाविद्यालयातील ग्रंथालयात घेतली जातात सध्या महाविद्यालयातील ग्रंथालयात एकुण ''तीन हजार सातशे शेहेचाळीस'' (३७४६) पुस्तके असून 'आठ' नियतकालिके, 'सहा' मासिके 'सहा' संशोधन पत्रिका उपलब्ध आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी ग्रंथालय विभाग नेहमीच विविध उपक्रम राबवित असतो. विद्यार्थ्यांना शिक्षणामध्ये रूची वाढावी यासाठी त्यांना विविध सुविधा ग्रंथालयाच्यावतीने देण्यात येतात. तसेच नाविण्यपूर्ण उपक्रम राबविले जातात. त्यानुसार महाविद्यालयात वाचनकक्ष, ग्रंथालय भेटी, ग्रंथ प्रदर्शन, व्याख्याने असे उपक्रम घेतले जातात. दिनांक १२/०१/२०१८ रोजी स्वामी विवेकानंद जयंती निमित्त ग्रंथालय व वाड्मय मंडळाच्यावतीने ग्रंथालयात ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या ग्रंथप्रदर्शनात विविध विषयावरची मौलिक पुस्तके ठेवण्यात आली होता. या ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी.एम. वराट यांचे शुभहस्ते करण्यात आले. या ग्रंथप्रदर्शनास विद्यार्थी व प्राध्यापकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

महाविद्यालयातील पुस्तकांची संख्या वाढविण्यासाठी प्राचार्यांच्या मार्गदर्शनानुसार देणगी स्वरूपात पुस्तके घेणे हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. त्या नुसार संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री. डॉ.नरेंद्र घुले पाटील साहेब यांनी महाविद्यालयातील ग्रंथालयास निवडक एकोणसाठ (५९) पुस्तके देणगी स्वरूपात भेट दिली. तसेच महाविद्यालयातील तृतीय वर्ष शास्त्र शाखेतील विद्यार्थ्यांनी निरोप समारंभ प्रसंगी ग्रंथालयास एकुण बावीस (२२) पुस्तके देणगी स्वरूपात दिली. त्याबद्दल ग्रंथालय विभाग त्यांना मनापासून धन्यवाद देत आहे.

शैक्षणिक वर्षे २०१७-१८ मध्ये महाविद्यालयास नवीन इमारत लाभल्यामुळे ग्रंथालय विभागाचा पुढील काळात विद्यार्थ्यांना अधिक दर्जेदार सुविधा देण्याचा मानस आहे.

**प्रा. श्रीमती के.व्ही.येवले**
ग्रंथपाल



# DEPARTMENT OF COMPUTER SCIENCE

- The need of the hour is excellence in every field of operation and particularly "Information Technology". Realizing this need with the new challenge and demand of the students Janata Shikshan Prasarak Mandal, MGP College has taken a step in the field of Information technology by starting the department of Computer Science on 2010-11.
- The Faculty is enthusiastic and easily approachable.
- The support structure of the department provides all the required non-academic support to the students and the faculty.
- Department also takes care to ensure that the basic scientific principles of Computer Science are presented to the student and actively tries to point out the differences between the Computation as a science and software.
- College has hi-tech well equipped computer laboratories with client server connection, Wi-Fi and all latest technologies so that our student connected with technical world.
- Department had procured all necessary licensed software's.
- We have seminar hall equipped with LCD Projector.
- College library has good collection of books, journals and periodicals to cater the varied academic needs of the students

**Following Teaching methods adopted to improve student learning**

★ Presentations with the help of LCD projector

★ Laboratory books designed for B.Sc.(Computer Science) Practicals

★ Demonstration of practical assignments with help of simulation and program Modules

**Participation and Extension activities**

★ Department Support for various activities and programs arranged at College Level.

★ Department Teachers and computer science students co-operated for organizing state level seminar of Chemistry.

★ Prof.M.S.Gaware actively participated in technical work and preparation for presentation slides during state level seminar of chemistry.

★ Prof R.B.Tambe and Prof. Sayyed actively participated in technical work of LCD projector and seminar organization.

★ Computer Science students inspired from "Soft Skills and Careers" program of Prof.Sontakke S.G. and Shiv-Jayanti program of College

★ Students and Teachers of Computer Science also actively participated in NSS Camp.

★ Computer Science Students participated in Science Day celebrated by college.

★ Computer Science Students attended lectures organized by Nirbhay kanya abhiyan and Bahishal Committees.

**COMPUTER LAB SETUP**

- H/W-Department has well equipped hi tech Computer Lab, Latest Dell Inspiron computer with configuration as PC-Dell-3252-INS-QC-4GB/1TB/-DELL-E1916HV-18.5
- Processor: Intel Pentium-IV CPU J3710 @ 1.60 Ghz
- Installed memory(RAM):4.00 GB
- System Type: 64-Bit Operating System, X64 Based Processor.
- S/w- C,C++,JAVA, PHP, PostgreSQL, MYSQL.
- Internet Facility-Department has a Broadband Connected Internet ready lab with nodes

- Internet Lab- Well Equipped separate internet lab with 10 nodes with broadband Internet Connection

**Operating System Details**

1] Windows 10 PRO

- ★ QUICK HEAL ANTIVIRUS
- ★ VM WARE Workstation UBUNTU 16
- ★ Centos
- ★ Red Hat Linux

2] Linux-BUNTU 17.10

**STAFF ACHIVEMENTS**

- PROF M.S.GAWARE
- Published a research paper entitled "The Formal Metaphases for Conformity Assessment of Information Security in WAN" at Anantrao Pawar College of Engineering and Research College Pune" for "National Conference on Technical Revolution"
- Published a research paper entitled "Big Data Analysis Research and study with Hadoop & its Tools" at "Dr. D.Y. Patil Arts Commerce and Science College,Pimpri Pune on a National Conference on Advancement in the field of computer Science and IT. This research paper also publish in "International research journal of multidisciplinary studies".
- Attended Two days seminar on "Big Data & Business Intelligence" at New Arts,Commerce & Science College, Shevgaon
- Work for Discipline Committee of college.
- Member of Cultural department of college and help to organize various cultural functions of college.

PROF.R.B.TAMBE

- Attended state level seminar on "Big Data & Business Intelligence" at New Arts,Commerce & Science College,Shevgaon .
- Attended Two days seminar on "Health & Nutritional Status of Women" at Women's College of Home Science & BCA,loni.
- Published a research paper entitled "Psychological Stress among IT Sector women"at womens college of Home Science & BCA Loni.

- PROF.H.S.SAYYED
- Attended state level seminar on "Electronic Science Project Selection, Designing ,Building ,Report Writing and presentation" at New Arts,Commerce & Science College, Ahmednagar.
- Designed and build "Automatic College Bell" For College.

**Objectives:**

- To provide Excellent career opportunities for Computer Science students
- Prepare students for global competency

**Future Plans :**

- Increase collaboration with IT industries
- Initiate placement and consultancy activities in the college

**Prof. M. S. Gaware**
Head, Dept. of Computer Science

# क्रीडा विभाग

महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ पासून क्रीडा विभाग कार्यरत आहे. सुरुवातीपासूनच जिमखाना विभागात विविध खेळाचे साहित्य उपलब्ध आहे.

* शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून या वर्षी महाविद्यालयाच्या नवीन इमारतीत जिमखाना तसेच प्रशस्त क्रीडांगण उपलब्ध आहे.
* शैक्षणिक वर्ष २०१७-१८ या वर्षी महाविद्यालयाच्या विद्यार्थी खेळाडूंनी विविध खेळात सहभाग नोंदवला.
* शैक्षणिक वर्ष २०१७-१८ यावर्षी झालेल्या आंतरमहाविद्यालय क्रीडा स्पर्धेत छत्रपती शिवाजी महाराज महाविद्यालय श्रीगोंदा येथे झालेल्या कबड्डी स्पर्धेत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.
* न्यु आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज पारनेर येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन बॉक्सींग स्पर्धेत (६० कि.ग्रॅ.) गटात महाविद्यालयाचा विद्यार्थी लोंढे आशुतोष याने दुसरा क्रमांक मिळवून त्याची विभागीय पातळीवर निवड झाली.
* विभागीय पातळीवर बी.जे.एस. कॉलेज वाघोली येथे झालेल्या स्पर्धेत लोंढे आशुतोष याने चमकदार कामगिरी केली.

**शारीरिक शिक्षण क्षमता चाचणी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या निर्देशानुसार शैक्षणिक वर्षे २०१५-१६ पासून शारिरिक शिक्षण क्षमता चाचणी प्रथम वर्ष सर्व वर्गांसाठी अनिवार्य करण्यात आलेली आहे. त्यानुसार आपल्या महाविद्यालयात प्रथम वर्ष सर्व वर्गांतील विद्यार्थ्यांची शारीरिक शिक्षण क्षमता चाचणी परीक्षेचे आयोजन दि. ७/३/२०१८ व ८/३/२०१८ या रोजी करण्यात आले होते. या क्षमता चाचणीसाठी बहीस्थ परीक्षेक म्हणून डॉ. मगर सर व लाटे सर यांनी काम पाहिले. महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

**प्रा. अे. के. आहेर**
**क्रीडा विभाग प्रमुख**



# क्रीडा विभाग

महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ पासून क्रीडा विभाग कार्यरत आहे. सुरुवातीपासूनच जिमखाना विभागात विविध खेळाचे साहित्य उपलब्ध आहे.

* शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून या वर्षी महाविद्यालयाच्या नवीन इमारतीत जिमखाना तसेच प्रशस्त क्रीडांगण उपलब्ध आहे.
* शैक्षणिक वर्ष २०१७-१८ या वर्षी महाविद्यालयाच्या विद्यार्थी खेळाडूंनी विविध खेळात सहभाग नोंदवला.
* शैक्षणिक वर्ष २०१७-१८ यावर्षी झालेल्या आंतरमहाविद्यालय क्रीडा स्पर्धेत छत्रपती शिवाजी महाराज महाविद्यालय श्रीगोंदा येथे झालेल्या कबड्डी स्पर्धेत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.
* न्यु आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज पारनेर येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन बॉक्सींग स्पर्धेत (६० कि.ग्रॅ.) गटात महाविद्यालयाचा विद्यार्थी लोंढे आशुतोष याने दुसरा क्रमांक मिळवून त्याची विभागीय पातळीवर निवड झाली.
* विभागीय पातळीवर बी.जे.एस. कॉलेज वाघोली येथे झालेल्या स्पर्धेत लोंढे आशुतोष याने चमकदार कामगिरी केली.

### शारीरिक शिक्षण क्षमता चाचणी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या निर्देशानुसार शैक्षणिक वर्षे २०१५-१६ पासून शारीरिक शिक्षण क्षमता चाचणी प्रथम वर्ष सर्व वर्गासाठी अनिवार्य करण्यात आलेली आहे. त्यानुसार आपल्या महाविद्यालयात प्रथम वर्ष सर्व वर्गातील विद्यार्थ्यांची शारीरिक शिक्षण क्षमता चाचणी परीक्षेचे आयोजन दि. ७/३/२०१८ व ८/३/२०१८ या रोजी करण्यात आले होते. या क्षमता चाचणीसाठी बहीस्थ परीक्षेक म्हणून डॉ. मगर सर व लाटे सर यांनी काम पाहिले. महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

**प्रा. अे. के. आहेर**
क्रीडा विभाग प्रमुख

# वाङ्मय मंडळ

मारूतरावजी घुले पाटील महाविद्यालयात विद्यार्थ्यांना भाषा व साहित्याची आवड निर्माण व्हावी तसेच त्यांच्या अंगी असणाऱ्या साहित्यिक गुणांचा विकास व्हावा यासाठी महाविद्यालयात वाङ्मय मंडळ सदैव कार्यरत असते. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये लोकनेते मारूतरावजी घुले पाटील यांचे जयंतीनिमित्त महाविद्यालयात वाङ्मय मंडळ व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत एकुण ३१ विद्यार्थीनी सहभाग घेतला. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. पी.ए. फटांगरे व प्रा.डॉ. के. आर. पिसाळ यांनी काम केले. या स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय विजेत्यांना प्राचार्य डॉ. टी.एम. वराट यांचे शुभहस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. त्यानंतर दि. १२/१/२०१८ रोजी स्वामी विवेकानंद जयंती निमित्त मराठी वाङ्मय मंडळ व ग्रंथालय विभागाच्यावतीने महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन घेण्यात आले. या ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. टी.एम. वराट यांचे शुभहस्ते करण्यात आले. या ग्रंथ प्रदर्शनास विद्यार्थ्यांनी भेट देऊन चांगला प्रतिसाद दिला. त्यानंतर दि. ११/१२/२०१७ रोजी चां.ता.बोरा महाविद्यालय, शिरूर येथील मराठी विभाग प्रमुख व मालवणी साहित्याचे अभ्यासक प्रा.डॉ. बाळकृष्ण रामचंद्र लळीत यांचे शुभहस्ते वाङ्मय मंडळाचे उद्‌घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट हे होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. के.आर.पिसाळ यांनी केले. याप्रसंगी डॉ.बाळकृष्ण लळीत यांनी मराठी साहित्याचा समग्र पटच विद्यार्थ्यांना उलगडून सांगितला तसेच विद्यार्थ्यांच्या साहित्यिक गुणांना वाव देण्यासाठी महाविद्यालय वार्षिक अंक 'क्षितिज' ही एक संधी असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**– प्रा.डॉ. के.आर.पिसाळ**

वाङ्मय मंडळ प्रमुख

# सांस्कृतिक मंडळ

मारूतरावजी घुले पाटील महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग कार्यरत असून या विभागाच्यावतीने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळावे म्हणून महाविद्यालयात निबंध, रांगोळी, वक्तृत्त्व काव्यवाचन अशा अनेक स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. या बरोबरच महाविद्यालयात थोर महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी कार्यक्रम साजरे केले जातात.

शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ मध्ये महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्यावतीने घेण्यात आलेले कार्यक्रम पुढील प्रमाणे

* दि. ८/७/२०१७ रोजी स्व. मारूतरावजी घुले पाटील यांची १५ वी पुण्यतिथीचा कार्यक्रम घेऊन अभिवादन करण्यात आले.
* दि. ५ सप्टेंबर २०१७ रोजी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती 'शिक्षक दिन' म्हणून साजरी करण्यात आली.
* दि. १५ सप्टेंबर २०१७ रोजी स्व. लोकनेते मारूतरावजी घुले पाटील यांची ८७ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या जयंती निमित्ताने महाविद्यालयात रांगोळी व निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे मा. श्री. मच्छिंद्र काळे हे उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी.एम. वराट हे उपस्थित होते. मा. श्री. मच्छिंद्र काळे यांनी मारूतरावजी घुले पाटील यांचे जीवन व कार्य विद्यार्थ्यांना विशद केले. या प्रसंगी निबंध व रांगोळी स्पर्धेतील प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्रक व बक्षिस वितरण करण्यात आले.

* दि. २८/१२/२०१७ रोजी चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय शिरूर या ठिकाणी घेण्यात आलेल्या 'संभाजी महाराज राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत महाविद्यालयातील कु. केंगार स्वाती दत्तात्रय व वैराळ सिताराम रवींद्र हे दोन विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यांनी ''आजची शिक्षण पध्दती योग्य की अयोग्य'' या विषयावर अनुकूल व प्रतिकूल मते मांडली. या स्पर्धेत त्यांना तृतीय क्रमांक मिळाला. या वेळी त्यांना प्रशस्तिपत्र स्मृतीचिन्ह मा. प्राचार्य डॉ. मोहीते यांचे शुभहस्ते देऊन गौरविण्यात आले.

* दि. १२/१/२०१८ रोजी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे न्यु आर्टस कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेज शेवगाव या ठिकाणी 'करवीर छत्रपती चौथे शिवाजी स्मृती करंडक स्पर्धेत महाविद्यालयाचे विद्यार्थी कु. स्वाती केंगार व ओमकार खुंटाळे हे सहभागी झाले होते. त्यांनी 'सरकारने राबविलेले शेतकरी कर्जमाफीचे धोरण देशाच्या प्रगतीस योग्य की अयोग्य' या विषयावर अनुकूल व प्रतिकूल मते मांडली. या स्पर्धेत त्यांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

* दि. ७/२/२०१८ ते ९/२/२०१८ या कालावधीत महाविद्यालयात विविध प्रकारचे 'डेज' साजरे करण्यात आले या डेज ला सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यातील विजयी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांचे शुभहस्ते पारितोषिक देण्यात आले.

* दि. १९/२/२०१८ रोजी महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. के.के. आंबाडे तसेच शिवव्याख्याते प्रा. एस.एल. नवथर आणि अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी.एम. वराट उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या वेळी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्रक देण्यात आले.

* दि. ८/३/२०१८ रोजी जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. त्या निमित्ताने प्राचार्य डॉ. टी.एम. वराट व सर्व प्राध्यापक यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये संपूर्ण वर्षभर विविध कार्यक्रमांचे यशस्वीपणे आयोजन सांस्कृतिक विभागाच्यावतीने प्राचार्य डॉ. टी.एम. वराट यांचे मार्गदर्शनाखाली केले आहे. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर सेवकवृंद व विद्यार्थी यांचे अनमोल सहकार्य लाभले.

– प्रा. के.आर.ढोबे

सांस्कृतिक विभाग प्रमुख

# राष्ट्रीय सेवा योजना

राष्ट्रीय सेवा योजना हा विभाग महाविद्यालयात कार्यरत असून या विभागास शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये ५० विद्यार्थ्यांच्या एककास मान्यता मिळाली होती. शै. वर्ष २०१४-१५ ते २०१६-१७ या कालावधीत रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी म्हणून प्रा. नेटके आर.ए. यांनी काम पाहिले. त्यानंतर शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये वाढीव ५० एककाची अनुदानित मान्यता महाविद्यालयास मिळाली. तसेच रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी म्हणुन प्रा. डॉ. पिसाळ के.आर. यांची नियुक्ती करण्यात आली.

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत महाविद्यालयात विविध उपक्रम व कार्यक्रम घेण्यात आले. यामध्ये प्रथम वनमहोत्सव व स्वच्छता पंधरवडा हे उपक्रम घेण्यात आले. त्यानंतर २४ सप्टेंबर २०१७ रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिनी अहमदनगर जिल्हा माजी रा.से.यो. समन्वयक प्रा.डॉ. मच्छिंद्र मालूंजकर यांचे शुभहस्ते रा.से.यो. उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.टी.एम. वराट हे होते.त्यानंतर नियमित कार्यक्रमांतर्गत महाविद्यालयात शिक्षकदिन, आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन, मारूतरावजी घुले पाटील जयंती, महात्मा गांधी जयंती, डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम जयंती, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती, स्वामी विवेकानंत जयंती, युव सप्ताह, शिवजयंती आदी कार्यक्रम घेण्यात आले.

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये विशेष श्रमसंस्कार शिबीर कर्जुने खारे ता. नगर जि. अ.नगर येथे दि. २६/११/२०१७ ते २/१२/२०१७ या कालावधीत घेण्यात आले. या शिबिरासाठी राष्ट्रीय सेवा योजनेतील ५० स्वयंसेवकांची निवड करण्यात आली होती. यामध्ये मुले २१ व मुली २९ सहभागी झाले होते. या शिबिरात पर्यावरण जनजागृती, स्वच्छता अभियान, जलसंवर्धन, वृक्षारोपण, महिला सबलीकरण, व्यक्तिमत्त्व विकास, ग्रामसर्वेक्षण आदी उद्दीष्ट्ये ठेवून कार्यक्रम घेण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन श्री. काकासाहेब शिंदे, जनरल मॅनेजर ज्ञानेश्वर सह. साखर कारखाना भेंडे ता. नेवासा जि. अ.नगर यांचे शुभहस्ते करण्यात आले. यावेळी एम.आय.डी.सी. नागापूर पोलीस स्टेशनचे पी.एस.आय. श्री. विनोद चव्हाण हे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम.वराट हे होते. या प्रसंगी श्री. अंबादास शेळके, भाऊसाहेब तांबे, श्री. अनिल देशमुख, श्री. अमोल निमसे, श्री. लहानु बोरूडे, मुख्याध्यापक वसंत पिसे तसेच ग्रामस्थ, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. के.आर. पिसाळ यांनी केले व आभार प्रा. एस.व्ही. मरकड यांनी मानले.

या शिबीर काळात कर्जुने खारे येथील प्राथमिक शाळेचा परिसर स्वच्छ करून तेथे वृक्षारोपण करण्यात आले. तसेच गावातील रस्त्यावरून वाहणारे सांडपाणी गटारे तयार करून त्यात सोडण्यात आले. याशिवाय गावातील विठ्ठल मंदिर व स्मशानभूमी परिसर स्वच्छ करून तेथे वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षांना कोणत्याही प्रकारची इजा होऊ नये त्यासाठी त्यांना एल. ॲण्ड टी. कंपनी व ग्रामस्थांच्या सहकार्याने लोखंडी जाळ्या बसविण्यात आल्या. अखेर शिबीराच्या शेवटच्या दिवशी रा.से.यो. विद्यार्थ्यांनी पथनाट्याद्वारे समाज प्रबोधन केले.

शिबीर काळात दुपारी २ ते ४ या वेळेत रा.से.यो. विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान मालेचे आयोजन करण्यात आले होते. त्यानुसार सोमवार दि. २७/११/२०१७ रोजी प्रा. शेख जमीर, धन्वंतरी कॉलेज ढवळपुरी यांनी 'जलसंवर्धन काळाची गरज', मंगळवार दि. २८/११/१७ रोजी प्रा. दहातोंडे एस.बी. यांनी 'महिला सबलीकरण', दि. २९/११/२०१७ रोजी प्रा. सायंबर अमोल यांनी 'व्यसनमुक्ती व युवक', दि. ३०/११/२०१७ रोजी प्रा. त्रिपाठी आनंद (अहमदनगर कॉलेज) यांनी राष्ट्रउभारणी व युवक, दि. १/१२/२०१७ रोजी प्रा.डॉ. देशमुख मोहन (अ.नगर) यांनी 'महात्मा गांधी विचार व स्वच्छता' आदी विषयावर मान्यवरांची व्याख्याने घेण्यात आली.

विशेष श्रमसंस्कार शिबीराचा सांगता समारंभ शनिवार दि. २/१२/२०१७ रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या

अध्यक्षस्थानी नगर तालुका खरेदी विक्री संघाचे संचालक मा.श्री. अंबादास शेळके हे होते. तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा.डॉ. शरद बोरुडे (अ.नगर कॉलेज) व प्रा.डॉ. आर.आर. सासवडे (समन्वयक, मारुतरावजी घुले पाटील शिक्षण संस्था, भेंडे) हे होते. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी.एम. वराट, ग्रामस्थ, प्राध्यापकवृंद व रा.से.यो. विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. के.आर. पिसाळ यांनी केले. तर आभार प्रा.एस.ए. काळे यांनी मानले. हे शिबीर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, जनता शिक्षण प्रसारक मंडळ, ग्रामस्थ, प्राध्यापकवृंद व विद्यार्थी या सर्वांच्या सहकार्याने यशस्वीरित्या संपन्न झाले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व सहकार महर्षि भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालय, संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने संगमनेर येथे दि. ८/१/१८ ते १०/१/२०१८ या कालावधीत विद्यापीठस्तरीय कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेसाठी रा.से.यो. विद्यार्थी नवघरे नवनाथ बापुराव व वैराळ सीताराम रवींद्र सहभागी झाले होते. तसेच एम.आय.डी.सी. नागापूर येथील 'युवा निर्माण' संस्थेच्यावतीने अहमदनगर येथे दि. १०/१२/२०१७ रोजी आंतर महाविद्यालयीन पथनाट्य स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी सहभागी झाले होते. 'मुली व महिलांवर होणारे अत्याचार' या विषयावर सादर केलेल्या पथनाट्यास उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. यानंतर दि. ४/२/२०१८ रोजी युवान संस्थेच्यावतीने अहमदनगर येथे कॅन्सर जनजागृतीसाठी मॅक्झिमस नगर राईझिंग मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. या मॅरेथॉनच्या आयोजनास सहकार्य करण्यासाठी महाविद्यालयातील रा.से.यो. विद्यार्थी सहभागी झाले होते. सदर उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा.आ. नरेंद्र घुले पाटील यांनी सर्व स्वयंसेवकांचे कौतुक केले.

**प्रा.डॉ. के. आर.पिसाळ**
राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी

## विद्यार्थी विकास मंडळ

शै. वर्ष २०१७-१८ वर्षात विद्यार्थी विकास मंडळातर्फे विविध कार्यक्रम घेण्यात आले. यामध्ये विद्यापीठामार्फत वेळोवेळी निर्देश केलेले कार्यक्रम संविधान दिन, लोकशाही पंधरवडा, वाचन प्रेरणा दिन, मराठी भाषा दिन यासोबतच शासनस्तरावरून राबविण्यात येणाऱ्या वृक्षसंवर्धनाची मोहिम हाती घेण्यात आली.

विद्यार्थी विकास मंडळातून 'कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना' राबविली जाते. यामध्ये विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना महाविद्यालयातील विविध विभागामध्ये कामाची विभागणी करून काम देण्यात आले. यामध्ये ग्रंथालय ऑफिस, विज्ञानशाखेच्या प्रयोगशाळा तसेच महाविद्यालयाचा परिसरात विद्यार्थ्यांनी काम केले. या योजनेचा विद्यार्थ्यांना निश्चित उपयोग होत असून यातून स्वावलंबी शिक्षणाचे धडे विद्यार्थ्यांस मिळतात. या योजनेतून जुलै ते फेब्रुवारी महिन्यापर्यंत महाविद्यालयात विविध कामे करण्यात आली आहेत.

विशेष मार्गदर्शन योजनेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाशी निगडित विषयांशी त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तीची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. यामध्ये कला, वाणिज्य, शास्त्र या तिन्ही शाखेतील विद्यार्थांना निश्चित लाभ मिळाला असून अस अशा कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांस विषय समजण्यास मदत होत आहे. दि. ११/१२/२०१७ ते २८/१२/२०१७ या कालावधीमध्ये हे विशेष मार्गदर्शन व्याख्याने आयोजित केली होती.

विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकास या कार्यशाळेमध्ये विद्यार्थाच्या अभ्यासासोबतच व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगिण विकास व्हावा हा

हेतू समोर ठेवून महाविद्यालयात दि. ३१/१०/२०१८ रोजी ही कार्यशाळा घेण्यात आली. यामध्ये प्रा. बी.एन. शिंदे यांचे 'विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास' या विषयावर व्याख्यान झाले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी.एम.वराट हे होते. यानंतर प्रा.डॉ. मंगेश वाघमारे यांचे 'सोशल मिडियाची भूमिका या विषयावर व्याख्यान झाले. या कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

'निर्भय कन्या अभियान' महाविद्यालयात घेण्यात आले. या कार्यक्रमामध्ये दि. २६/०२/२०१८ रोजी उद्घाटन सत्रात जि.प. उपाध्यक्षा सौ. राजश्रीताई घुले पाटील यांनी उद्घाटन करून मार्गदर्शन केले. यावेळी प्रथम व्याख्यान श्रीमती स्मिता पासरे यांचे सामाजिक विषयावर झाले. दि. २७/०२/२०१८ रोजी अॅड. अनिता दिघे यांनी 'महिला कायदेविषयक माहिती' या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच दि. २८/०२/२०१८ रोजी डॉ. वैशाली किरण यांनी 'महिला आरोग्य' या विषयावर विद्यार्थ्यीनींना मार्गदर्शन केले. दैनंदिन जीवन जगताना विद्यार्थीनींना तसेच महिलांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते, याचा विचार करून महाविद्यालयातर्फे हे अभियान घेण्यात आले. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यीनींचा चांगला प्रतिसाद मिळाला. या मार्गदर्शनाचा त्यांना त्यांच्या पुढील आयुष्यात निश्चित उपयोग होईल असे वाटते. विद्यार्थी विकास मंडळातर्फे सर्व कार्यक्रम विद्यार्थी हा विकासाचा केंद्रबिंदू ठेवून यशस्वीपणे घेण्यात आले.

**प्रा. आर.ए. नेटके**
विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी

## बहि:शाल विभाग

जनता शिक्षण प्रसारक मंडळ, संचलित, मारूतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय अहमदनगर, व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने बहि:शाल शिक्षण मंडळ अंतर्गत सन २०११ पासून 'डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेचे' तर २०१७-१८ पासून 'ज्ञान-विज्ञान वाचन चळवळ' या विषयावरील व्याख्यानांचे महाविद्यालयात आयोजन करण्यात आले.

महाविद्यालयीन अभ्यासक्रमाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधीलकी निर्माण व्हावी, त्यांच्यात सामाजिक समस्या विषयी जाणीव जागृती निर्माण होऊन सामाजिक व वैयक्तिक समस्या सोडविण्यास ते सक्षम व्हावेत या उद्देशाने महाविद्यालयात 'डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला' अंतर्गत अनेक तज्ज्ञ प्राध्यापकांची व्याख्याने आयोजित करण्यात आली.

महाविद्यालयात दि. २०/१२/२०१७ ते दि. २२/१२/२०१७ या कालावधीत 'डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. प्रा. डॉ. टकले एन.जी. यांनी 'ग्राहक राजा जागा हो,' बाबासाहेब खराडे यांनी 'हसण्यासाठी जीवन आपुले' तर प्रा. स्वाती चौधरी यांनी 'स्त्री-हक्क' या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

तसेच दि. ०८/०३/२०१८ ते दि. १०/०३/२०१८ कालावधीत 'ज्ञान-विज्ञान वाचन चळवळ' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाविषयी गोडी निर्माण व्हावी, वाचनाचे महत्त्व त्यांना कळावे हा या चळवळीचा उद्देश आहे. या व्याख्यानमालेअंतर्गत पं. अशोक डोले यांनी 'एक होता कार्व्हर', प्रा. डॉ. सुधाकर शेलार यांनी 'वैज्ञानिक दृष्टीकोन व आपण' तसेच प्रा.डॉ. अतुल बाबासाहेब मोरे यांनी 'भगवान गौतम बुद्ध व त्यांचा धम्म' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वरील दोन्ही कार्यक्रमास सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

**प्रा. जी. एस.सोनवणे**
बहि:शाल केंद्रकार्यवाहक

# स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र

आज प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा वाढलेली असून विद्यार्थ्यांना केंद्र व राज्य परीक्षेतून प्रशासन सेवेत संधी मिळून चांगले काम करण्यासाठी स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

तहसिलदार, पी.एस.आय. एस.टी.आय. गटविकासअधिकारी, आय.ए.एस., आय,पी.एस., आय.एफ.एस. अशी एक ना अनेक उच्च अधिकाराची पदे या माध्यमातून मिळवता येतील परंतु हे सर्व यश मिळवण्यासाठी प्रामाणिक कष्टाबरोबरच अचूक व योग्य मार्गदर्शनाची नितांत आवश्यकता असते. स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून प्रशासन सेवेत येऊ पाहणाऱ्या ग्रामीण भागातील सर्व विद्यार्थ्यांना ध्येय साध्य करण्यासाठी असे अचूक, योग्य, मार्गदर्शन व्हावे हाच महाविद्यालयाचा प्रयत्न आहे. त्याची पूर्व तयारी करण्यासाठी महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा केंद्र चालविले जाते.

महाविद्यालयामध्ये प्राचार्य डॉ. टी.एम. वराट यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची सुरुवात शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये करण्यात आली. दि. १३/०२/२०१७ रोजी स्पर्धा परीक्षा केंद्राचे उद्‌घाटन मा. प्राध्यापक ए.बी.उगले, (भूगोल विभाग प्रमुख) न्यु आर्टस्‌ कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

या स्पर्धा परीक्षा केंद्राअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये पूर्व प्रवेश परीक्षा घेवून ५० विद्यार्थ्यांची गुणवत्तेनुसार निवड करण्यात आली. या वर्षामध्ये वेळापत्रकानुसार नियमित प्रत्येक दिवशी व्याख्याने घेण्यात आली. स्पर्धा परीक्षा केंद्रामार्फत विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी नियमित सर्व वर्तमानमत्रे, मासिके, विविध पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली आहे. केंद्रातील सर्व विषयाच्या प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमानुसार नियमित मार्गदर्शन केले.

स्पर्धा परीक्षा केंद्र प्रमुख प्रा. साबळे पी.एस. व प्रा. मेघडंबर एस.व्ही. यांनी दि. १३/१०/२०१७ रोजी एस.एम. जोशी कॉलेज, हडपसर, पुणे येथे भेट देऊन तेथील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची पाहणी केली व तेथील प्राचार्य डॉ. अरविंद बुरुगले व स्पर्धा परीक्षा केंद्राच्या समन्वयक डॉ. शकुंतला सावंत यांच्याकडून मार्गदर्शन घेतले. त्याप्रमाणे महाविद्यालयातील केंद्रासाठी विविध उपक्रम राबविण्यास मदत झाली.

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये काही तज्ज्ञ व्याख्यात्यांचे विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित करण्यात आली.

१) प्रा. एस.जी. सोनटक्के यांनी दि. २४/०२/२०१८ रोजी 'Skill Development' या विषयावर व्याख्यान दिले.

२) प्रा. गोयल एन.जी. यांनी दिनांक २७/१२/२०१७ रोजी 'करिअर आणि विद्यार्थी' या विषयावर मार्गदर्शन केले.

या विभागात शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून स्पर्धा परीक्षा तयारीसाठी व अभ्यासासाठी विविध प्रकाशनांचे अंक व अधिक पुस्तके उपलब्ध करून देण्याचा मानस आहे.

या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात करिअर घडविण्याची संधी मिळेल व भविष्यात कर्तबगार, जबाबदार, प्रशासक नागरिक तयार होतील यासाठी स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन केंद्राचा उपयोग होणार आहे.

**प्रा. पी.एस. साबळे**
स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र प्रमुख

## प्रसिद्धी विभाग

महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून हा विभाग कार्यरत आहे. या विभागाअंतर्गत विविध उपक्रमांना प्रसिध्दी दिली जाते. यामध्ये स्थानिक वर्तमानपत्रात महाविद्यालयातील विविध कार्यक्रमांचा गोषवारा, फोटो, बातमी देण्यात येते. ज्या विभागाचा उपक्रम आहे किंवा कार्यक्रम घेतला आहे. त्या विभागाकडून त्या उपक्रमाची सविस्तर प्रेस नोट तयार करून या विभागाकडे दिल्यानंतर विविध वर्तमानपत्रांमध्ये बातमी दिली जाते.

सदर कामासाठी प्रा. डॉ. के.आर. पिसाळ, प्रा. एस.बी.दहातोंडे , श्री. पी.व्ही.दळवी तसेच इमेज फोटोग्राफर श्री. अशोक मुकिंदे यांची मदत घेतली जाते. सदर बातमी वर्तमानपत्रात प्रसिध्द झाल्यानंतर विद्यार्थी नोटिस बोर्डला लावली जाते. अशाप्रकारे बातमी कात्रण फाईल महाविद्यालयाच्या स्थापनेपासून तयार करून ठेवली आहे. तसेच महाविद्यालयातील विविध उपक्रम व कार्यक्रमांचे फोटो संग्रहित करून महाविद्यालयीन वार्षिक अंक 'क्षितिज' यामध्ये समाविष्ट करून उपक्रमाची माहिती दिली जाते. या विभागामुळे सर्व उपक्रमांना प्रसिध्दी दिली जाते. महाविद्यालयाचा हा अनमोल ठेवा दरवर्षी प्रसिध्दी विभागाच्यावतीने संग्रहित केला जातो. याकामी प्रसिध्दी विभागातील सदस्य तसेच सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर सेवकांचे सहकार्य मिळते.

**– प्रा. एस.व्ही.मरकड**
प्रसिद्धी विभाग प्रमुख

## पर्यावरण जाणीव जागृती उपक्रम

आपल्या महाविद्यालयामध्ये गेल्या अनेक वर्षापासून पर्यावरण जाणीव जागृती हा विषय शिकवला जात आहे. विद्यार्थ्यामध्ये पर्यावरणाविषयी जाणीव निर्माण होवून त्याविषयी जागृती निर्माण करण्याविषयीची माहिती यामध्ये दिली जाते. त्यामध्ये पर्यावरणाचा होणारा ऱ्हास जागतिक तापमान वाढ यावर कशी मात करावी याबद्दल माहिती दिली जाते.

''पर्यावरण जाणीव जागृती'' हा विषय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्याकडून द्वितीय वर्षातील कला, वाणिज्य, विज्ञान आणि संगणकशास्त्र यांच्यासाठी अनिवार्य करण्यात आलेला आहे.

पर्यावरण विभागामध्ये कला शाखेत ४१, वाणिज्य शाखेत ५६, विज्ञान शाखे ९० व संगणकशास्त्र शाखेत ०७ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

'विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जाणीव जागृती निर्माण करणे हे पर्यावरणाचे मुख्य उद्दिष्टये आहे. पर्यावरणाचा शाश्वत विकास करून संरक्षण करणे हे पर्यावरण विभागाचे उद्दिष्ट्य आहे.

**प्रा. व्ही. डी. मोरे**
पर्यावरण विभाग प्रमुख

# महिला तक्रार निवारण समिती

शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये महिला तक्रार निवारण समितीची स्थापना करण्यात आली. या समितीअंतर्गत मुलींच्या समस्या जाणून घेऊन त्या समस्येवर उपाय करून त्यांना शिक्षणास प्रवृत्त केले जाते. त्याचप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये महाविद्यालयातील विद्यार्थीनींच्या समस्या या समितीच्या अंतर्गत सोडविण्यात आल्या. यामध्ये विशेषतः महाविद्यालयाकडून दिल्या जाणाऱ्या सुविधा तसेच मुलींच्या अडचणी याची दखल महिला तक्रार समितीद्वारे घेतली जाते. महाविद्यालयातील शैक्षणिक वातावरण आनंदी व आल्हाददायक राहण्यासाठी ही समिती शिस्त कमिटीलाही मदत करते.

दि. १ मार्च २०१८ रोजी विद्यार्थीनींना निर्भयकन्या अंतर्गत सक्षम बनविण्यासाठी महाविद्यालयात आदरणीय सौ.'राजश्रीताई घुले पाटील' जिल्हा परिषद उपाध्यक्ष, अहमदनगर यांनी विद्यार्थीनींना स्वसंरक्षण विषयक प्रबोधन केले. तसेच सौ. स्मिता पानसरे यांनी 'सामाजिक जागृती' या विषयी मार्गदर्शन केले. तसेच ॲड. 'अनिता दिघे' यांनी महिला कायदेविषयक सबलीकरण या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी.एम. वराट हे उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी विद्यार्थींनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

**महिला तक्रार निवारण समिती**

| | | |
|---|---|---|
| १) | प्रा. पाऊलबुध्दे ए.आर. | प्रमुख |
| २) | प्रा. सोनवणे जी.एस. | सदस्य |
| ३) | प्रा. सांगळे ए. एन. | सदस्य |
| ४) | प्रा. ढोबे के.आर. | सदस्य |
| ५) | कु. कराळे डी. डी. | सदस्य |
| ६) | कु. पाटोळे टी. पी. | सदस्य |
| ७) | कु. भोर के. बी. | सदस्य |
| ८) | कु. भोर पी. बी. | सदस्य |

# परीक्षा विभाग

महाविद्यालयात विद्यापीठ परीक्षा, अंतर्गत परीक्षा तसेच प्रात्यक्षिक परीक्षा विद्यापीठाच्या अंतर्गत पार पडतात. शै. वर्ष २०१२-१३ पासून प्रा.एस.बी. दहातोंडे हे परीक्षा अधिकारी म्हणून काम पाहत आहेत. महाविद्यालयाच्या नूतन इमारतीत सुसज्ज असा परीक्षा विभाग तयार करण्यात आला असून त्यामध्ये झेरॉक्स, इंटरनेट आदी सुविधा आहेत. नवीन इमारतीत विद्यार्थी संख्येनुसार आसन व्यवस्था अतिशय सुसज्ज आहे. महाविद्यालयात विद्यापीठीय परीक्षा निकोप वातावरणात घेतल्या जातात. महाविद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम आहे. शै. वर्ष वर्ष २०१४-१५ पासून महाविद्यालयीन स्तरावर पदवीग्रहण समारंभ आयोजित केला जातो. यानुसार संस्था पातळीवर जिजामाता महाविद्यालय भेंडे येथे पदवीग्रहण समारंभ आयोजित करण्यात आला. या शैक्षणिक वर्षी महाविद्यालयाच्या पदवीग्रहण समारंभात २४ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली.

नूतन इमारतीमध्ये विद्यापीठाच्या परीक्षांसाठी परीक्षा केंद्र सुरु करण्याबाबत प्रस्ताव दाखल करण्यात आला होता. त्यानुसार मा. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अशोक चव्हाण व डॉ. प्रमोद भडाकवाडे यांनी महाविद्यालयास भेट दिली. परीक्षा विभागातील सर्व सुविधांची पाहणी करून मान्यता देण्यात आली. त्याचप्रमाणे विज्ञान प्रात्यक्षिक परीक्षांसाठी प्रस्ताव दाखल करण्यात आला होता. विद्यापीठाकडून नेमलेल्या समितीद्वारे प्रयोगशाळेचे मूल्यमापन करून प्रात्यक्षिक परीक्षा केंद्र मंजूर करण्यात आले आहे. अशाप्रकारे या शै. वर्षी सर्व प्रकारच्या विद्यापीठ परीक्षांसाठी परीक्षा केंद्र म्हणून महाविद्यालयास मान्यता मिळाली आहे.

या शै. वर्षी महाविद्यालयात ऑक्टोबर/नोव्हेंबर २०१७, विद्यापीठ परीक्षा मार्च/एप्रिल २०१८, विद्यापीठ परीक्षा तसेच विद्यापीठ प्रात्यक्षिक परीक्षांबरोबरच अंतर्गत परीक्षा घेण्यात आल्या. ऑक्टोबर परीक्षेसाठी २४७ तर मार्च परीक्षेसाठी ७८२ परीक्षार्थी उपस्थित होते. अशाप्रकारे या शैक्षणिक वर्षामध्ये महाविद्यालयात अंतर्गत, प्रात्यक्षिक व विद्यापीठ परीक्षांचे आयोजन करण्यात आले. यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी.एम. वराट व सर्व महाविद्यालयीन प्रशासकीय कर्मचारी व प्राध्यापक यांनी अनमोल असे सहकार्य केले.

**प्रा. एस.बी. दहातोंडे**

महाविद्यालय परीक्षा अधिकारी

# शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील निवडक प्रसिद्ध बातम्या

## मारुतराव घुले पाटील विद्यालयाच्या वतीने 'क्षितिज' अंकाचे प्रकाशन

नगर, दि. २५ (प्रतिनिधी)- जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव माजी आमदार चंद्रशेखर घुले यांच्या वाढदिवसानिमित्त जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मारुतराव घुले पाटील महाविद्यालय (ता. नगर) येथे क्षितिज अंकाचे प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.



क्षितिज अंकाचे प्रकाशन संस्थेचे प्रशासकीय अधिकारी के. के. पवार यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी डॉ. आर. आर. लवांडे, प्राचार्य डॉ. टी. एम. वराट ... उपस्थित होते. ...

**अहमदनगर**

### मा. आ. नरेंद्र घुले यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएच.डी प्रदान




**पुण्य नगरी** शुक्रवार, १८ ऑगस्ट २०१७ | अहमदनगर | 5

### मारुतरावजी घुले पाटील महाविद्यालयाच्या क्षितिज वार्षिक अंकाचे प्रकाशन

अहमदनगर / प्रतिनिधी: जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव मा. आ. चंद्रशेखर घुले पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त ...

### जिल्हा मराठा विद्या प्रसारक मंडळाच्या सल्लागारपदी डॉ. टी. एम. वराट





'क्षितिज' वार्षिक अंकाचे प्रकाशन



खारे कर्जुने (ता. नगर): जनता शिक्षण प्रसारक मंडळाच्या मारुतराव घुले पाटील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिरास बोलताना सहाय्यक पोलिस निरीक्षक विनोद चव्हाण. या वेळी ... प्राचार्य टी. एम. वराट, ...

### श्रमसंस्कार शिबिर जीवनाला कलाटणी देणारे : चव्हाण



### युवतींनी स्पर्धा परीक्षेवर लक्ष केंद्रित करावे

राजश्री घुले: निर्भय कन्या अभियान

### घुले महाविद्यालयाचा शैक्षणिक अभ्यास दौरा





### मारुतरावजी घुले पाटील महाविद्यालयात शिवजयंती उत्साहात

**गुड मॉर्निंग**



### घुले महाविद्यालयाच्या स्विलेश गाडगेची वैज्ञानिक स्पर्धेत निवड

## युवतींनी स्वकर्तृत्वावर पुढे येण्याची गरज : घुले

नगर, दि. १ (प्रतिनिधी) - "सध्याच्या युगात युवतींनी स्वकर्तृत्वावर ... " असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्षा राजश्री घुले यांनी केले. ...






# ।। पसायदान ।।

आतां विश्वात्मकें देवें । येणे वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ।।१।।
जे खळाची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ।।२।।
दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जें वांछिल तो तें लाहो । प्राणिजात ।।३।।
वर्षत सकळमंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ।।४।।
चलां कल्पतरुंचे आरव । चेतना चिंतामणींचे गांव ।
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ।।५।।
चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ।।६।।
किंबहुना सर्वसुखी । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं ।
भजिजो आदिपुरुखीं । अखंडीत ।।७।।
आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें ।
दृष्टादृष्टविजयें । होआवें जी ।।८।।
येथ म्हणे श्री विश्वेशरावो । हा होईल दानपसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया झाला ।।९।।


# महाविद्यालयातील प्राध्यापक व सेवकवृंद




महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांचे समवेत कलाशाखा व वाणिज्य शाखेतील प्राध्यापकवृंद



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांच्या समवेत शास्त्र शाखा व संगणक शास्त्र शाखेतील प्राध्यापकवृंद



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांचे समवेत कार्यालयीन सेवकवृंद



## महाविद्यालयाची ठळक वैशिष्ट्ये

- भव्य व सुसज्ज इमारत
- अनुभवी व उच्चशिक्षित प्राध्यापकवृंद
- समृद्ध ग्रंथालय व अभ्यासिका
- अद्ययावत स्वतंत्र प्रयोगशाळा कक्ष
- अद्ययावत संगणक कक्ष
- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
- प्रशस्त क्रीडांगण
- राष्ट्रीय सेवा योजना
- विद्यार्थी समुपदेशन केंद्र
- महिला तक्रार निवारण समिती
- वहि:शाल शिक्षण केंद्र
- विद्यार्थी विकास मंडळ
- गुणवत्ता सुधार योजना
- विद्यार्थी विमा योजना
- विविध सांस्कृतिक उपक्रम
- विद्यार्थ्यांसाठी इंटरनेट सुविधा
- शैक्षणिक सहलींचे आयोजन
- डॉ. क.भा.पाटील कमवा व शिका योजना
- विविध विषयाच्या चर्चासत्रांचे आयोजन
- अनुकूल व आनंददायी शैक्षणिक वातावरण


जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव ने संचलित

**मारूतरावजी घुले पाटील महाविद्यालय, अहमदनगर**

श्री राघवेंद्र स्वामी मंदिराजवळ, बोल्हेगाव रोड, अ.नगर

Online College Code No - C02430 ID No. PU/AN/ACS/111/2009 College Code No. 893 Pun. Code-CAAA017120

फोन : ०२४१-२७७९४९७, Email : mgpcollege@gmail.com / website : www.mgpcollege.com